
उत्तरायण
भाग : १
डॉ. सुहास पेठे

* उ त्त रा य ण *

भाग : १

(जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ. पेठे यांनी दिलेली उत्तरं)

डॉ. सुहास पेठे

एम्.ए.,पीएच्.डी.(तत्त्वज्ञान)

* उत्तरायण : भाग १

पुस्तकरूपाने प्रकाशित चौथी आवृत्ती : जुलै २०१४
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :
वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

*

जीवन प्रत्यक्ष जगताना जिज्ञासेची ज्योत
वर्षानुवर्षं जागृत ठेवून
प्रश्नरूपानं, उत्तरांच्या माध्यमातून
त्या विचारांचा लाभ इतरांना देणाऱ्या
सर्व जिज्ञासू साधकांना –

आणि

प्रश्नांच्या उत्तरांची बुद्धी देणाऱ्या
श्री परमेश्वराला व श्री संतांना –

कृतज्ञतापूर्वक अर्पण...

...सुहास पेठे

*

उत्तरायण

माणसाच्या शिकण्याच्या प्रक्रियेत जिज्ञासा, शंका, प्रश्न, निरसन यांना मोलाचं स्थान आहे. याची सुरुवात अगदी लहानपणापासून होते. ती प्रक्रिया मनानं जिज्ञासू व्यक्तींच्या बाबतीत उत्तरायुष्यातही सुरू राहाते.

तिच्या स्वरूपात काही वेळा चिकित्सेला एक विशिष्ट अपरिहार्य स्थान असलं तरी ते तिचं उद्दिष्ट नसतं, असू नये. कारण नुसत्या चिकित्सेनं पदरात काही न पडता अखेर 'संशयात्मा विनश्यति' एवढं झालेली कित्येक माणसं आपल्याला दिसतील. मूळ उद्दिष्ट जर ज्ञानप्राप्तीचं असेल, प्रपंचाचं स्वरूप, व्यवहार, शेवट समजून घेऊन, तो नेटकेपणानं करून परमार्थाकडं जाण्याचं असेल तर अशा शंका-प्रश्नांची खूप मदत होते. डोक्यात अडकलेले विचार मोकळे होऊन जीवन व विचारप्रवास सुखरूप होत राहातो.

तेच परमार्थातल्या शंकाप्रश्नांचंही आहे. तिथंही असलेल्या शंकांचं ध्येय हे उत्तर मिळाल्यावर त्यावर विचार करून प्रत्यक्ष कृतीचा-साधनेचा मार्ग चालण्याचं असतं. म्हणजे एकेक पाऊल देवाकडं जात राहाता येतं. अशांती, क्षोभ, संदेह कमी कमी होऊन समाधान-शांती वाढत जाते.

म्हणून इथं शंका-प्रश्नांना शिबिरात, महिन्याच्या उपासनेत एक दिवस व अन्य व्यक्तिगत भेटींत एका मर्यादेत स्थान देण्यात आलेलं आहे. या शंकांची उत्तरं काही कुठला अभ्यास करून दिलेली नाहीत. उत्स्फूर्त आहेत, आयत्या वेळची आहेत. फक्त त्यांचं वेळोवेळी ध्वनिमुद्रण, आवश्यक ती निवड व संपादन डॉ. धनंजय व डॉ. सुचेता यांनी वर्षानुवर्षं कष्टपूर्वक केलं आहे. प्रश्नांची विषयवार विभागणी करण्याऐवजी प्रश्नसूची बरोबर विषयसूचीही देण्याचा प्रयत्न केला आहे.

ही उत्तरं म्हणजे मी अंतिम शब्द किंवा निकाल समजत नाही.

अनेकदा उत्तरांना वेळेच्या व सामूहिकतेच्या मर्यादा असतात. त्यामुळं अनेक मुद्यांचा समावेश उत्तरांत होऊ शकला नाही, हे वाचकांनी कृपा करून समजून घ्यावं अशी प्रार्थना आहे. माझी भूमिकाही कुणा मार्गदर्शकाची नाही. शोधकाची आहे. शोधताना, जाताना सापडलं ते समोर ठेवलं आहे. म्हणून याला शंकानिरसन म्हटलं असलं तरी काहींचं पूर्ण निरसन कदाचित होणार नाही, पण उत्तराच्या दिशेनं विचारसूर्याचा प्रवास - उत्तरायण - तरी सुरू व्हावं, एवढी नम्र भूमिका आहे.

इथं प्रश्नकर्त्याला नाव द्यावं लागत नाही. घरी संतछाया हॉलमध्ये असलेल्या प्रश्नपेटीत आपली शंका कागदावर लिहून टाकता येते. महिन्याच्या प्रश्नोत्तरसत्राच्या दिवशी पेटी उघडून त्या प्रश्नांची उत्तरं उपासनेच्या वेळीच नेहमीच्या साप्ताहिक निरूपणाऐवजी दिली जातात. त्यामुळं प्रश्न विचारणाऱ्या बरोबरच इतर तशाच शंका असणाऱ्यांचं व भविष्यात तशा शंका येऊ शकणाऱ्यांचंही समाधान होतं.

अगदीच व्यक्तिगत प्रश्न असतील तर त्यांचा समावेश त्यात केलेला नसतो. नुसत्या बौद्धिक शंकांनाही स्थान नसतं. प्रापंचिक व पारमार्थिक असं वेगळं विषयांचं बंधन मुद्दामच ठेवलेलं नाही. कारण दोन्हीही, विशेषत: प्रापंचिक प्रश्न पारमार्थिक प्रवास करणाऱ्याला भेडसावीत असतात. कारण तोच अधिक सावधपणे जगायचा प्रयत्न करतो, असा अनुभव आहे. म्हणून अनेक प्रश्नांच्या विषयांना बंधन दिसणार नाही. त्याचा उपयोग होतो, म्हणून ते तसेच ठेवले आहेत.

कुणा जिज्ञासूला हे उपयोगी पडले तर ईश्वरानं केलेल्या कृपेबद्दल मला धन्यता वाटेल. संकलनाचं काम प्रचंड आहे. त्याचा श्रीगणेशा या पहिल्या भागानं करणाऱ्या डॉक्टरांचा तसंच प्रकाशनाशी निगडित सर्वांचा मी ऋणी आहे.

- सुहास पेठे

प्रश्नानुक्रम...

१. साधनेची ओढ लागलेली आहे, पण प्रापंचिक जबाबदाऱ्याही आहेत. जोडीदाराचा विरोध नसला तरी अनुकूलताही नाहीये.या प्रसंगाचा कसा सामना करावा, जेणेकरून दोन्ही गोष्टी साध्य होऊ शकतील ? ...१३

२. मुलांनी जप करणं योग्य आहे का ? या वयात त्याची गरज आहे का ? ...१४

३. जगात दु:ख का दिसतं ? सगळे प्रापंचिक लोक त्याबद्दल तक्रारी का करीत असतात ? परमेश्वरानं एवढं दु:खमय जग का निर्माण केलं आहे ? प्रपंच नाही केला तर चालेल का?परमार्थात भाव हा शॉर्टकट आहे का ?...१५

४. परमार्थाला लागल्यावर प्रपंचातली काही माणसं, संबंध दुरावतात हे का व कसं ? ...२१

५. भगवंताचा शोध घेताना अनेक मार्ग सांगितले जातात. त्या मार्गांपैकी एक मार्ग म्हणजे मीचा शोध (आत्मशोध) हा आहे का ? त्या मार्गात कोणकोणत्या पायऱ्या आहेत ? सर्वसाधारण साधकाला या पायऱ्यांवरून जाता येईल का ? येत असल्यास कसं जाता येईल ? साधक बरोबर मार्गावरून जातो आहे याच्या खुणा त्याला पडताळून पाहाता येतात का ? ...२९

६. लहानपणापासून देवाची आवड आहे, श्री महाराजांचं वाचायची आवड आहे. पण माझे माझ्या बाबतीतले सर्व निर्णय चुकीचे झाले याला काय कारण असावं ? ...३१

७. सद्गुरू कृपा करतात म्हणजे काय करतात ? ...३३

८. देवांच्या जुन्या फ्रेमचं काय करावं ? त्या खराबही होतात व टाकण्याचीही भीती वाटते. ...३४

९. आजवरचं आयुष्य मी चुकीच्या पद्धतीनं घालवलं. आता वय झालं आहे. उरलेल्या थोड्या आयुष्यात उद्धार होईल का व कसा होईल, याची चिंता लागते. काय करावं ? ...३५

१०. आत्मज्ञान झाल्यावर माणसाच्या जीवनात कोणते बदल होतात ? ध्येय, कार्य, बुद्धीच्या विविध क्षमतांत काय बदल होतो ? देहबुद्धी नाहीशी झाल्यामुळं झोपेची गरज किती असते ? भूक लागते का ?...३६

११. संसारातील खरेदीकडं बघण्याचा दृष्टिकोन काय असावा ? ...३८

१२. ईश्वराच्या इच्छेनं सर्व घडत असतं, आपला हात लागतो इतकंच. अशा स्वरूपाचंही श्री महाराजांचं वचन आहे. या वचनाशी आपल्या दैनंदिन कर्तृत्वाचा मेळ कसा घालावा ? ...३९
१३. माझा जप संतछायेत आल्यावर होतो, पण घरी होत नाही, ही मानसिकता कशी बदलेल ? ...४०
१४. कृपा झाली हे कसं समजावं ? ...४०
१५. श्री महाराजांनी श्री दत्तगुरूंचं मंदिर बांधलं, त्याच्या शेजारी नृसिंहाची स्थापना केली याचा उद्देश काय असावा ? ...४१
१६. ईश्वरी कृपा होणं म्हणजे नक्की काय ? ती कोणावर होते ? पारमार्थिक वाटचालीत मानवी प्रयत्नांचं महत्त्व किती ? ...४३
१७.आणीबाणीचे प्रसंग, युद्ध, बाँबस्फोट इ. प्रसंगी साधकाची भूमिका काय असावी ? ...४५
१८.मृत्यूची भीती काढून टाकायला नामस्मरणाचा कसा उपयोग करून घ्यावा ? ...४७
१९. जोपर्यंत एखादी गोष्ट अमुक तऱ्हेनं घडून यावी असं वाटतं आहे तोपर्यंत व्यवहारानं योग्य प्रयत्न करणं जरूर आहे. या महाराजांच्या वचनाचा अर्थ कसा लावावा व त्यात कोणतं कर्तृत्व अभिप्रेत आहे? ...४९
२०.विद्यार्थ्यांना अभ्यास करताना नेहमी एकाग्रतेविषयी सांगितलं जातं. मग तसंच नाम घेणाऱ्याला जपाच्या गुणवत्तेबद्दल का सांगितलं जात नाही? ...५०
२१. सत्याचा मार्ग धरून जर चाललं तर व्यवहाराशी सांगड घालणं अवघड जातं. यासाठी काय करावं ? ...५२
२२. साधना कशासाठी करायची असते ? ...५४
२३.जगामध्ये चांगली स्थिती येणं हे कधी होणारच नाही का ? हे अशक्य आहे का ? ...५५
२४.जर असं असेल तर सामाजिक कार्याला काही महत्त्व आहे का ?५५
२५.आपल्याला कुणी नमस्कार करीत असेल तर काय करावं ? ...५६
२६. विकारांचं आपल्या जीवनातलं स्थान काय ? ...५७

२७. श्री गोंदवलेकर महाराजांचं नामाचं प्रेम प्रचंड असतानाही त्यांनी त्यांचा एका शब्दातला परमार्थ सावधानता असा का सांगितला ?...५९
२८. एकच नाम घेतल्यानं ते खोलवर जातं व मुरतं असं म्हटलं जातं. मग संतछायेतील उपासनेच्या वेळी आपण वेगवेगळी नामं घेण्याचा हेतू स्पष्ट करावा. ...६०
२९. योगमार्ग, भक्तिमार्ग सर्व मार्ग परमेश्वराकडंच नेतात. योगमार्गात दिवसेंदिवस शरीर बळकट होत जातं. पण भक्तिमार्ग हा प्रभावी असूनही कुठल्यातरी कारणानं भक्तिमार्गात देहभोग सोसावे लागतात. या देहभोगांना भक्तिमार्गात काही संरक्षण नाही का ? ...६१
३०. परमार्थमार्गावर अर्ध्यावर गेल्यावर पुढं जाणारे साधक फार थोडे असतात, असं श्री महाराजांनी म्हटलं आहे. यामध्ये अर्धा टप्पा कुठला आणि त्यापुढं जाण्यामध्ये कोणते अडथळे असतात ? ...६४
३१. प्रार्थनेला मोठं महत्त्व आहे असं म्हणतात. दुसऱ्याचे आजार बरे व्हावे म्हणून, व्यसन सुटावं म्हणून प्रार्थना करावी का ? अशी दुसऱ्यासाठी प्रार्थना केल्यानं नामसाधना करणाऱ्या व्यक्तीची नामसाधना खर्ची पडते का ? ...६५
३२. साधनेत प्रगती होते की नाही हे कसं कळतं ? ...६६
३३. शिक्षणपद्धतीची सद्य:स्थिती लक्षात घेता शिक्षणाबद्दल विद्यार्थ्यांची व पालकांची भूमिका काय असावी ? ...६७
३४. भावाचा भावनिकतेशी कितपत संबंध आहे ? ...६८
३५.प्रपंच हा मोठा प्रश्न असून त्याचं निश्चित उत्तर कधीच सापडत नाही व सोडूनही देता येत नाही. प्रपंचाच्या अशा उत्तर न मिळालेल्या प्रश्नामुळंच आपण अपयशी ठरतो. अशा वेळी काय करावं ? ...६९
३६. मी काही दिवस एक नाम घेतो त्यानंतर नाम बदलतो. पुन्हा काही दिवस ते नाम घेतो. त्यानंतर पुन्हा दुसरं नाम घ्यावं असं वाटतं. हे योग्य आहे काय ? ...७०
३७. नामस्मरण करीत असताना नाम चालू आहे हे जाणवतं. पण त्याचवेळी मनोव्यापारही चालू असतो, असं जाणवतं. या दोन्ही गोष्टी मनाच्या कोणत्या स्तरावर चालू असतात आणि हे मनोव्यापार क्षीण होण्यासाठी काय करावं ? ...७१

३८. आम्हाला आपल्यासारखं होता येईल का ? त्यासाठी काय करावं ? काय करू नये ? ...७२
३९. अनेक वर्षं सत्संगात राहूनही साधनेशिवाय, नामाशिवाय माझं अडतंय, असं वाटत नाही. कल्पनेत मात्र नाम म्हणजे सर्वस्व असावं असं वाटतं. पण तशी कृती घडत नाही. यासाठी काय करावं ? ...७३
४०. प्रपंचात नेहमी न केलेल्या उपासनेशी निगडित अपराधीपणाची भावना असते. त्यासाठी काय करावं ? काय करू नये ? ...७६
४१. नामस्मरण काही वेळा खूप चांगलं होतं, काही वेळा ते चांगलं होत नाही.करणारे आपणच असूनही असं का होतं ? ते चांगलं व्हावं म्हणून काय करावं? ...७७
४२. प्रत्येकाला जीवनात अध्यात्माची गरज आहे काय ? असल्यास ती का आहे ? ...७८
४३. साधन करताना येणारे अनुभव खरे असतात का ? ...८०
४४. समाजात व्यवहार करताना प्रत्येकाचं व्यक्तित्व जाणण्याची गरज आहे का ? ...८१
४५. संतनमनमालेमध्ये पाचव्या ओवीत महाभूते आणि जाणीव एकचि आहे असं म्हटलं आहे, त्याचा अर्थ स्पष्ट करावा. ...८२
४६. बहुसंख्य बुद्धिमान व्यक्तींनी आत्मज्ञान करून घेतल्याचे दाखले इतिहासात सापडतात. उदा. विवेकानंद, समर्थ, ज्ञानेश्वर माउली, गुरुदेव रानडे, श्री महाराज इ. असं असूनही अडाणी माणसाला परमार्थ सोपा असं श्री महाराज का म्हणतात ? ...८३
४७. देव किंवा गुरू यांच्या फोटोकडं पाय करून झोपू नये असं म्हणतात, ते खरं आहे का ? ...८४
४८. झाडांना भावना असतात हे विज्ञानानं सिद्ध केलेलं आहे. त्यांच्यात भावना विकसित झालेली आहे का ? जर भावना विकसित झालेली नसेल तर त्यांच्यात स्पर्धा, द्वेष अशा गोष्टी कशा असतील ? व मग आपण ङ्कसृष्टिसंदेशङ्खमध्ये म्हणतो तसे संदेश ती कसे देऊ शकतील ?...८५
४९. उपासनेत किंवा वृत्तीत स्थिर होणं म्हणजे काय ? स्थिर झाल्याची लक्षणं कोणती ? ...८६

५०. कृमी, कीटक, मुंग्या, डास आपल्याकडून अजाणतेपणी मरतात
याबद्दल काय करावं ? ...८७
५१. देहबुद्धी कमी करण्यासाठी नेमकं काय करायला हवं ? ...८९
५२. प्रपंच आणि परमार्थ विरोधी आहेत काय ?
सामान्य प्रापंचिकांचा परमार्थाला विरोध का असतो ?
त्यांनी ती म्हातारपणची गोष्ट का ठरवली आहे ? ...९०
५३.जीवनात प्रपंच आणि परमार्थाची सांगड का व कशी घालावी? ...९४
५४. सृष्टीची, गुरुपदाची, विश्वात्मकाची इ. नव्या विविध आरत्या
करण्यात काही विशेष कारण आहे का ?
उपासनेसाठी त्याचा उपयोग कसा करता येईल ? ...९५
५५. शरीराला दुखापत झाल्यामुळं सारखा त्रास होऊ लागला. त्यावेळेला
एकदम ङ्कदेहेदु:ख ते सुख मानीत जावेङ्ख हा मनाचा श्लोक आठवला.
तर अशा देहदु:खाच्या वेळेला सुख कसं मानावं ? ...९६
५६. साधना करीत असताना सुटलेल्या वासना पुन्हा
चिकटण्याची शक्यता असते का ? ...१००
५७.आपल्या इथले संस्कार पाहाता, बाहेरील चंगळवादी,
भोगवादी परिस्थितीशी आम्ही कसं ॲडजेस्ट व्हावं ? ...१०१
५८. मंदिराची गरज आहे की नाही ?
आणि मंदिरांमुळं एवढे गोंधळ का दिसतात ? ...११३
५९. आत्मज्ञानासाठी सद्गुरूंची आवश्यकता आहे की नाही ? ...११५
६०. गुरुकृपा हा प्रयत्नाचा विषय की प्रारब्धाचा ? ...११६
६१. वृद्धत्वाची तयारी कशी करावी ? ...११७
६२. दुश्चित्तपणा म्हणजे काय ? ...११८
६३. घरात अनेक देव झाले असल्यानं त्यांची पूजाअर्चा नीट
होत नाही. रुखरुखही वाटते. अशा वेळी काय करावं ? ...१२१
६४. मुलांनी उपासना करावी का ? असल्यास का ?
व तिचं प्रमाण किती असावं ? ...१२२
६५.इच्छा नसताना अनेक गोष्टी कराव्या लागतात,
अशा वेळी मनाची भूमिका काय ठेवावी ? ...१२४

उत्तरायण - भाग : १

वि ष य सू ची

(संदर्भासाठी विषयापुढे प्रश्नक्रमांक दिला आहे.)

- अध्यात्म : गरज/ ४२
- आत्मशोध : मार्ग/५.१, पायऱ्या/५.२, सामान्य साधकाला शक्य/५.३, कसं जाता येईल/५.४, प्रगतीच्या खुणा/५.५, गुरूची आवश्यकता/५९, आत्मज्ञान व अडाणीपणा/४६ आत्मज्ञानानंतरचे बदल/१०
- आरत्या : नव्या आरत्यांची कारणं/५४.१, उपयोग/५४.२
- इच्छेविरुद्ध कामं/६५
- उपासना : न झालेली/४०, स्थिर होणं/४९.१, स्थिर झाल्याची लक्षणं/४९.२, उपासनेचं प्रमाण/६४.३, उपासना कशासाठी/६४.२, मुलांची उपासना/६४.१
- कृपा : अर्थ/७,१६.१, झाल्याची खूण/१४, कृपा कुणावर होते/१६.२, कृपेच्या बाबतीत प्रयत्न की प्रारब्ध/६०
- कृमी, कीटक अजाणतेपणी मारले जाणं/५०
- जपाची गुणवत्ता/२०
- जगणं : चुकीचं, त्याच्या चिंता, सुधारणेचे मार्ग/९
- जगातलं दुःख : दिसणं/३.१, निर्मिती/३.३, चांगली स्थिती येणं/२३
- जप : मुलांचा/२, विशिष्ट ठिकाणी चांगला होणं/१३
- तक्रारी : प्रपंचाच्या/३.२, निर्णय चुकल्याच्या/६
- त्याग व भोग : सांगड/५७
- दुश्चित्तपणा/६२
- देव : अनेक देव व पूजा/६३, जुन्या फ्रेम/८, फोटोकडं पाय न करणं/४७
- देवाची इच्छा व कर्तृत्व : मेळ/१२
- देहदुःख ते सुख कसे/५५

- देहबुद्धी कमी करण्यासाठी प्रयत्न/५१
- नमस्कार : त्यावरच्या प्रतिक्रिया/२५
- नाम : कल्पना व प्रत्यक्ष कृती/३९, चांगलं होणं, न होणं/४१
- नाम व मनोव्यापार/३७
- नामं : वेगवेगळी नामं/२८, ३६
- परमार्थ : शॉर्टकट/३.५, त्यामुळं माणसं दुरावणं/४, अर्धा टप्पा/३०
  परमार्थात प्रयत्नांचं स्थान/१६.३, १९
  प्रपंच व परमार्थातला विरोध/५२.१
  सामान्य प्रापंचिकांचा परमार्थाला विरोध/५२.२
  वृद्धपणी करण्याची गोष्ट आहे का/५२.३,
- प्रपंच : न करणं/३.४, प्रपंचातले अनुत्तरित प्रश्न/३५, प्रापंचिक खरेद्या/११
- प्रार्थना/३१
- भाव व भावनिकता/३४
- मृत्यूची भीती व नामस्मरण/१८
- मंदिर : गरज व समस्या/५८, उद्देश(दत्तगुरू व नृसिंह)/१५
- युद्ध, बॉम्बस्फोट इत्यादी प्रसंगी भूमिका/१७
- वासना व विकार : वासना पुन्हा चिकटणे/५६, विकारांचं स्थान/२६
- वृद्धत्वाची तयारी/६१
- व्यक्तिमत्त्वाचा वेगळेपणा/४४
- शरीर : योग व भक्तीशी संबंध/२९
- शिक्षणपद्धती : सद्य:स्थिती व उपाय/३३
- साधना : गरज/२२, जोडीदाराची साथ नसणं/१, प्रगती/३२,
  काकांसारखी साधना/३८, अनुभवांचा खरेपणा/४३
- सामाजिक कार्यं/२४
- सांगड : प्रपंच व परमार्थ/५३, सत्य व व्यवहार/२१
- सावधानता : महत्त्व/२७
- संतनमनमाला : खुलासा/४५
- सृष्टिसंदेश : खुलासा/४८

*

१. साधनेची ओढ लागलेली आहे, पण प्रापंचिक जबाबदाऱ्याही आहेत.जोडीदाराचा विरोध नसला तरी अनुकूलताही नाहीये. या प्रसंगाचा कसा सामना करावा, जेणेकरून दोन्ही गोष्टी साध्य होऊ शकतील ?

आपल्याला साधनेची ओढ लागलेली आहे, ही भाग्याची गोष्ट आहे, हे आपण प्रथम लक्षात घेऊ. प्रापंचिक जबाबदाऱ्या सांभाळणं हे तर आपलं कर्तव्यच आहे. जोडीदाराचा विरोध असणं ही बऱ्यापैकी सार्वत्रिक गोष्ट आहे. याला खूप लोकांना सामोरं जावं लागतं. एखाद्या चांगल्या गोष्टीला सहसा विरोध होत नाही किंवा जेव्हा विरोध असतो तेव्हा त्याला अनेक कारणं असू शकतात.

पहिलं कारण म्हणजे आपण जो परमार्थ करतो त्याच्या पद्धतीविषयी जोडीदाराचा आक्षेप असण्याची शक्यता असू शकते. उदा. आपल्या वैखरी जपानं दुसऱ्याच्या कामकाजात जर अडथळा निर्माण होऊ लागला तर तो विरोध करणारच. दुसरं कारण विशेषत: परमार्थ करूनसुद्धा काही सुधारणा होत नाही म्हणून विरोध होऊ शकतो. प्रत्येकाची परमार्थाची वेळ यायची असते म्हणून विरोध होऊ शकतो.

अशा वेळी असा विचार करावा की, आपणही काही परमार्थ करीतच जन्माला आलो नाही. कधीतरी काही कारणानं तो करू लागलो. म्हणजे त्यापूर्वी आपणही परमार्थ करीत नव्हतोच. तसाच ते आज परमार्थ करीत नाहीत, एवढं समजून घेतलं तरी खूप होईल.

आपल्यालासुद्धा जी परमार्थाची बुद्धी झाली ती आपल्या हातात होती की तीसुद्धा कुणाच्या तरी कृपेनं झाली किंवा आपली वेळ आली म्हणून झाली, याचाही विचार करावा. मग आपल्या जोडीदाराची तशी

वेळ कधी येते याची वाट पाहाणं हे आपलं काम आहे.

ज्याअर्थी आपल्या जोडीदाराचा विरोध आहे, त्याअर्थी त्याचीसुद्धा आपल्या परमार्थामध्ये काहीतरी भूमिका असली पाहिजे. मी जर खरा परमार्थी असेन तर माझ्या आयुष्यात घडणारी प्रत्येक गोष्ट माझ्या गुरूंच्या आज्ञेशिवाय, सत्तेशिवाय, इच्छेशिवाय घडणार नाही. आपल्या गुरूंना हा विरोध दिसतो आहे आणि तरीसुद्धा ते तो बदलत नाहीत याचा अर्थ अजूनही माझंच काहीतरी शिकायचं राहिलं आहे, असं समजायला हरकत नाही. या विरोधात आपण कितपत टिकतो हे त्यांना बघायचं असेल.

आपण देहानं प्रपंचात, कर्तव्यांत जोडीदाराला साथ देऊ, मनानं नाम घेऊ आणि जोडीदाराशी यावरून कुठलेही व्यावहारिक संघर्ष न करता टिकून राहाण्याची परीक्षा देऊ तर परमेश्वर आपल्याला पास करील आणि बक्षीस म्हणून त्यांनाही परमार्थबुद्धी देईल.

*

२. मुलांनी जप करणं योग्य आहे का ? या वयात त्याची गरज आहे का ?

मुलांनी मुलं असणं जसं योग्य आहे तसं ती मोठी होणंसुद्धा योग्य आहे ना ? त्या मुलांना चांगलं मन असणं आवश्यक आहे, असं आपल्याला वाटतं ना ? ती पुढं आपल्याला आणि समाजाला उपयोगी पडायला हवी आहेत ना ? ती मुलं स्वत:चं कल्याण करून घ्यायला समर्थ असायला हवी आहेत ना ? हे जर तुम्हाला पटत असेल तर मुलांनी या वयात जप करणं योग्य आहे. कारण जप हे सगळं साध्य करून द्यायला मदत करतो.

*

३. १. जगात दु:ख का दिसतं ?

२. सगळे प्रापंचिक लोक त्याबद्दल तक्रारी का करीत असतात?

३. परमेश्वरानं एवढं दु:खमय जग का निर्माण केलं आहे ?

४. प्रपंच नाही केला तर चालेल का ?

५. परमार्थात भाव हा शॉर्टकट आहे का ?

हे एका दहा-बारा वर्षांच्या लहान मुलाचे प्रश्न आहेत. गेली दोन-तीन वर्षं त्याचं परमार्थाचं चांगलं श्रवण घडतंय. त्या पार्श्वभूमीवर साधारण विषय त्याच्या लक्षात आलेला आहे. म्हणून हे अनेक सुसंबद्ध प्रश्न त्यानं विचारले आहेत. त्याचं म्हणणं असं की, ही जी मोठी माणसं एकत्र येतात त्यावेळी ती नेहमी तक्रारी आणि दु:खच सांगतात - हा तसा वागतो, तो असा वागत नाही वगैरे. तेव्हा मला असं वाटायला लागलंय की, जगामध्ये सगळीकडं दु:खच आहे.

इथं उपासनेला हे लोक येतात, भेटतात त्यात काही आनंद असतो, पण बाकी सर्व ठिकाणी स्पर्धा, दु:खं, तक्रारी हेच चालू असतं. दोन माणसं एकत्र आली की ती दु:खाबद्दलच बोलत असतात. जर सगळीकडं इतकं दु:ख असेल तर परमेश्वरानं ही सृष्टी निर्माणच का केली ?

हा प्रश्न त्यानं कशामुळं विचारला याची पार्श्वभूमी मला माहीत नाही. पण मुलाच्या पातळीवर त्याचं सोपं उत्तर असं आहे -

आता हे जे दु:ख दिसतंय त्याची निर्मिती ही आपली आहे, परमेश्वराची नाही. आपण सर्वांनी मिळून आनंद घ्यावा म्हणून परमेश्वरानं सृष्टी निर्माण केली आहे.

दु:ख निर्माण करणारे जे घटक आहेत, ते माणसाच्या ठिकाणी विद्यमान आहेत. उदा. तुलना, विकार इत्यादी. पण या घटकांचा वापर

जर मी योग्य तऱ्हेनं करेन - म्हणजे समजा माझी तुलना जर मी एखाद्या सद्‌गुणी माणसाशी केली तर या तुलनेच्या क्षमतेनं मी स्वत:ची आणखी प्रगती घडवू शकेन, पण जर हीच तुलना मी एखाद्या अनादर्श माणसाशी करेन तर आहे त्या पातळीवरूनही खाली घसरेन. हेच विकारांच्या बाबतीतही आहे. म्हणजे तलवार दिल्यावर ती शत्रूवर चालवण्याऐवजी स्वत:वर चालवण्याचा हा प्रकार आहे.

जे दु:ख दिसतं आहे, ते माणसानं निर्माण केलं आहे. परमेश्वरानं फक्त आनंद निर्माण करण्याची शक्ती माणसामध्ये ठेवली आहे आणि ती तो नीट वापरीत नाही म्हणून त्याला दु:ख होतंय. त्याला हे भानच असत नाही की, आपणच आपल्या दु:खाचे निर्माते आहोत. आपण आनंदाच्या निर्मितीसाठी जन्माला आलो आहोत व तेच परमेश्वराला अपेक्षित आहे.

एकट्या माणसाला वाटतं की दोन माणसं एकत्र आल्यावर आनंद होईल आणि म्हणून तो सगळा प्रपंचाचा व्याप करायला जातो. पण प्रत्यक्षात दु:ख पदरात पडतं. कारण आनंद टिकवण्यासाठी जे करावं लागतं ते त्याला माहीत नसतं आणि नुसतंच सर्व एकत्र आलो म्हणजे आनंद होईल असं त्याला वाटतं. पण प्रत्यक्षात मात्र त्याला दु:ख येतं.

एकत्र येऊन गप्पा मारल्या तर त्यासुद्धा निर्भेळ नाहीत, खाणंपिणं केलं तर ते शुद्ध नाही, एकत्र येऊन शांत राहाणं तर शक्यच नाही. म्हणजे आपल्याला एकत्र येऊन पुन्हा विकार-स्पर्धा-असूया-अशुद्धी हेच पदरात येतं. एकत्र येऊन ज्ञान-शुद्धी-शांतता-सहकार्य-भावबळ-भक्तिबळ वाढवता येतं, याची कल्पना आपल्याला येत नाही.

खरं तर लोकांना एकटं करमत नाही आणि ते मान्यही करवत नाही. एकत्र आले तरीही कसं जगावं हे त्यांना माहीत नसतं आणि तेही त्यांना मान्य करवत नाही. मग असे लोक एकत्र येऊन काहीतरी स्पर्धा-

असूयेचं काम करतात. म्हणजे थोडक्यात दु:ख निर्माण करतात. मग दु:ख होणारच.

त्यात तिसरी एक अडचणही असते की, हे दु:ख त्यांनीच निर्माण केलं आहे हे मान्य करण्याचा प्रामाणिकपणा आणि धैर्य हेही त्यांच्याजवळ नसतं.त्यामुळं मग फक्त उरते ती इतरांबद्दल तक्रार,जी सर्वजण एकमेकांबद्दल आणि परिस्थितीबद्दल सतत करतात. हे तो अनुभवतो आहेच.

म्हणूनच जगातल्या दु:खांची कारणं एकत्र येण्यामध्ये नसून एकत्र येऊन किती आणि काय काय विधायक गोष्टी करता येतील हे न कळण्यामध्ये आहेत. काय करायचं हे जर माणसाला वेळेत कळलेलं असेल तर सृष्टी आनंदच देईल आणि भगवंताचा तोच उद्देश आहे.

पुढं त्या मुलाचं म्हणणं असं आहे की, भगवंत शोधणं, आनंद शोधणं व प्राप्त करून घेणं हे जर आपलं ध्येय आहे तर आपण बाकीच्या गोष्टी करण्याची गरज आहे का ? आपण त्या त्या ध्येयाला अनुकूल असलेली जी साधनं आहेत तेवढीच केली तर काय होईल ?(अनुकूल साधनं म्हणजे नाम, ध्यान इ.) तेवढीच केली तर आपलं जे ध्येय आहे ते लवकर साध्य नाही का होणार ? प्रथम खूप काळ लोक घालवतात व नंतर वयाच्या साठीला हे सर्व करतात, ते लवकर नाही का करता येणार ?

ध्येय जरी तेच असलं तरी मनुष्य म्हणून आपण जन्माला आलो म्हणजे आपल्याला तहानभूक लागू झाली. तशा अनेक गोष्टी लागू झालेल्या आहेत.त्या ज्याला लागू नाहीत त्याला ते ध्येय लगेच साध्य होतं.आपल्याला जर त्या लागू असतील तर आपल्याला ते लगेच साध्य होत नाही.

तुम्हाला भूक लागते की नाही ? 'लागते', तहान लागते की नाही ? 'लागते', प्रत्यक्ष भगवंत हे तुझं ध्येय आहे ना ? मग पाण्याशिवाय तुला किती काळ राहाता येईल ? दोन-चार तास,पाच तास,कसंतरी करून

समजा बारा तास राहाता येईल. पण बारा तासांनी तुला पाणी लागेलच ना? म्हणजे ध्येय जरी भगवंत हे असलं तरी बारा तासांनी पाणी हे तुझं ध्येय होणार ना ? मग बारा तासांनंतरचं पाणी हे ध्येय तू कसं मिळवणार? ते कोण देणार ?

कारण आपलं शास्त्र असं आहे की, आपल्याला परावलंबी राहायचं नाही. स्वावलंबनानं तुला पाणी जरी मिळवायचं असलं तरी त्यासाठी काही गोष्टी करण्याची गरज आहे. पाणी आणण्याची विद्या जरी झाली, समजा एखादा पाणक्या आहे, तो नदीवरून पाणी आणतो. तर त्यासाठी भांडं पाहिजे, नदीवर गेलं पाहिजे. मग हे भांडं कुठून आणणार ? विकत घ्यायचं तर पैसे पाहिजेत. असं सगळं गणित आहे. म्हणून सर्व गोष्टी जोपर्यंत लागू आहेत तोपर्यंत त्याची व्यवस्था लावल्याशिवाय पुढं जाता येत नाही.

प्रवास करायचा हे जर ध्येय असेल तर घरातून उठला आणि प्रवासाला निघाला असं होत नाही. तो रिझर्व्हेशन करतो, तयारी करतो, बॅग भरतो - हे सगळं करून तो स्टेशन गाठतो. मग त्याचा प्रवास सुरू होतो. त्याला बिनतिकिटाचा प्रवास करता येत नाही, ते योग्यही नाही. एकदम उठून तो प्रवासाला जाऊ शकत नाही. कारण तिथं गेल्यावर त्याला गाडीत जागा मिळत नाही. उभं राहून, लोंबकळत जा म्हटलं तर ते शक्य होत नाही. त्यासाठी प्रथम रिझर्व्हेशन करावं लागतं. म्हणजे आज प्रवास करायचा ठरल्यावर दोन महिन्यांनी त्याला तो करता येतो.

साधं प्रवासाला जायचं हे जरी ध्येय असलं तरी त्यासाठी इतक्या गोष्टी करायला लागतात, तेव्हा कुठं दोन महिन्यांनी तो प्रवासाला जाऊ शकतो. एवढं सगळं केल्याशिवाय त्याला हा साधा प्रवास सुरू करता येत नाही, तर भगवंताचं ध्येय गाठायला जी तयारी आवश्यक आहे ती त्याला

करावीच लागेल. म्हणूनच माणसाच्या आयुष्याचा जो मधला काळ आहे तो ती तयारी करण्यासाठी दिलेला काळ आहे. तो काळ गेल्याशिवाय आपल्याला तिथं जाता येत नाही.

याला आता भाव हा शॉर्टकट कसा आहे, तर समजा एक बी आहे. ते जमिनीत टाकलं तर त्याला फळं, फुलं यायला काळ लागेल. त्या बीला अंकुर येऊन, तो मोठा होऊन, फूल लागून, फळ येणं याला काही काळ लागतो. तो जो काळ आहे तो प्रत्येक रोपाप्रमाणं वेगवेगळा आहे. एखाद्याला वर्षात फळ येतं, एखाद्याला आठ वर्षांनी, एखाद्याला पंधरा-वीस वर्षांनी येतं. त्या काळात फरक असू शकतो.

तसंच आपली चित्तवृत्ती कशी आहे, त्यानुसार प्रत्येकाला फळ यायला तेवढा वेळ लागतो. चित्तवृत्ती कशीही असली तरी फळ यायला काही वेळ लागतोच. आपण किल्ले करतो त्यावर आठ दिवसांत हिरवळ तयार व्हायला पाहिजे असेल तर आपण धने टाकतो आणि धने टाकल्यावर लगेच हिरवळ तयार होते. पण हेच जर इतर पीक शेतात लावलं तर ते पिकायला चार महिने लागतात.

तसं आपण कोणत्या धान्याचे प्रकार आहोत त्याप्रमाणं आपल्याला अंकुर येऊ शकेल. आपल्या चित्ताची स्थिती कशी आहे त्याप्रमाणं होईल. समजा एखाद्यानं नारळाचं झाड लावलं तर लगेच दुसऱ्या दिवशी नारळ येत नाहीत. आठ वर्षं थांबायला लागतं. तसंच प्रत्येकाच्या चित्तातला जो फरक आहे तेवढा मूळ काळ हा लागतोच.

त्याचं म्हणणं असं की, आत्तापर्यंत असं ऐकलं की, भावानं सगळ्यात लवकर काम होतं. नुसता भाव वाढवला तर लवकर काम नाही का होणार ?

भाव वाढवण्यानं काम होतं हे बरोबर आहे. पण तो आपल्याला

टिकवता येत नाही. भावानं तुमच्या झाडाला दहा वर्षांऐवजी दोन वर्षांत फळ लागू शकतं.एवढं भावाचं कार्य आहे. भावानं साठीची समज माणसाला सातव्या वर्षी येऊ शकते. भाव तुम्हाला शरीरानं साठ वर्षांचं नाही बनवीत, अंतरंगानं बनवू शकतो.भावात प्रगतीची वर्षं कमी करण्याचं सामर्थ्य आहे. फक्त त्यासाठी तळमळीची गरज आहे. तेव्हा भावाचा मार्ग चांगला.

फक्त त्या मार्गातसुद्धा अडचणी आहेत. भावाला स्थैर्य आहे की नाही यात भावाची परीक्षा आहे. मनुष्य प्रवचनं ऐकतो त्यावेळी तो मनाच्या अत्यंत उत्तम अवस्थेत असतो. जर सात्त्विक, शुद्ध ऐकलेलं असेल तर एक भजनसुद्धा माणसाच्या ठिकाणी भाव निर्माण करायला समर्थ असतं. भजन तीन मिनिटं चालतं. त्याक्षणी माणूस तीनशे मैलांचा प्रवास करून गेलेला असतो. पण दुसऱ्याच क्षणी तो पहिल्या पायरीवर आलेला असतो.

आता तो भाव कसा टिकणार ? ही अडचण भावाच्या मार्गात आहे. तो तसाच टिकला तर मनुष्य एका दिवसातसुद्धा उद्धरेल. पण एक दिवस तरी त्याला लागेलच. कारण भावामध्ये पुढं नेण्याचं सामर्थ्य असलं तरी टिकण्याची परीक्षा त्यात आहे.

आज शनिवारी जो भाव येतो तो पुढच्या शनिवारपर्यंत टिकेल का? असं झाल्यास तो एका आठवड्यातच उद्धरेल. एकदा आलेला भाव आपल्याला अर्धा तासही टिकवता येत नाही, तर मग तो लवकरचा मार्ग असला तरी तो फलित व्हायला आपल्याला काही काळ लागेलच ना?

इथं काळाचा आणि प्रगतीचा संबंध या अर्थानं नाही. भावानं लवकर जाता येतं, हे खरंच आहे. पण तो टिकण्याच्या परीक्षेनं लवकर जाता येतं. भावाच्या बाबतीत ही परीक्षा आहे, इतर साधनांत त्यांची त्यांची काळाची गणितं लागू आहेतच.

*

४. परमार्थाला लागल्यावर प्रपंचातली काही माणसं, संबंध दुरावतात हे का व कसं ?

परमार्थाला लागल्यावर काही माणसं तुटल्यासारखी वाटतात वा तुटतात. इथं विचार करण्यासारखा प्रश्न हा आहे की, ती मला हवी आहेत का ? आपल्याला जर ती हवीशी वाटत असतील तरच तुटल्याचा खेद वाटेल. म्हणजे समजा, आपण बाजारातून चाललो आहोत. एखादी वस्तू आपल्याला घ्यायचीच नाही, तर त्या दुकानावरून गेल्यावर आपण मागं वळून बघत बसतो का ? तर नाही. मनुष्य पुढंच चालत राहातो. पण त्याला जी वस्तू घ्यायची आहे, ती घेण्यासाठी तो ते दुकान जवळ आल्यापासून सावध असतो. हे रोजच्या व्यवहारात होतं.

या दृष्टीनं बघितलं तर पूर्वीची ही जी माणसं, साथीदार होती, इतर कुठल्या तरी क्षेत्रातली माणसं होती उदा. परमार्थ न आवडणारे नातेवाईक वा मित्र किंवा इतर लोक यांच्या दृष्टीनं आपण व आपला परमार्थ हा तुच्छतेचा विषय होतो. टीकेचा, उपेक्षेचा विषय होतो किंवा ज्यांना परमार्थाची थोडीफार कल्पना आहे, पण ते करण्याची मनाची तयारी नाही असे लोक-नातेवाईक फारसं आपल्याला नावाजत नाहीत. - ते काय त्यांच्या त्यांच्या मार्गात आहेत - अशा प्रतिक्रियाही देतात. मग ते तुटल्यासारखे वाटतात. खरं सांगायचं तर आपल्यालाच एक अपराधीपणा वाटतो.

याची कारणं आपण एका उदाहरणानं शोधू. समजा,आपण आईशी फारसं बोलत नाही किंवा भावाशी बोलायला आपल्याला फारसं आवडत नाही. तर अशा परिस्थितीत महाराजांना खरं काय अपेक्षित असेल तर खेळाऐसा प्रपंच मानावा. म्हणजे प्रपंच खरं खेळ म्हणून करता यायला

पाहिजे. हे सगळ्यांत आदर्श आहे.

पण हे आपल्याला जमत नाही. म्हणजे खेळासारखं - तो भेटला की त्याच्या विषयांतल्या गप्पा, हा भेटला की याच्या विषयांतल्या गप्पा - असं करता येत नाही. आपल्याला एकदा एखादा विषय आवडला की, त्याच्यातच राहावं असं वाटतं. हे स्वाभाविक आहे, हे होतंच. गाड्यांचे रुळ बदलताना खडखडाट होतो तसंच हे आहे. यापेक्षा फार महत्त्व याला नाही. तुम्ही रुळ बदल्याबद्दल तुम्हाला जर अस्वस्थता येत असली तर खडखडाटाची दखल घेण्याची गरज आहे. आता जो रुळ बदललेला आहे तो बरोबर आहे अशी जर तुम्हाला खात्री असेल तर खडखडाटाची तुम्ही उपेक्षा कराल. त्याकडं फार लक्ष देणार नाही.

खडखडाट केल्याशिवाय रुळ बदलल्याची खात्री कशी होईल? ज्यांनी रेल्वेतून प्रवास केला असेल त्यांना माहीत असेल, अमुक ठिकाणी आल्यावर अमुक गाड्या प्लॅटफॉर्म बदलतात. पण ठरावीक प्लॅटफॉर्म सोडून एखादी रेल्वे दुसरीकडंच चालली म्हणजे समजा आठ नंबरच्या प्लॅटफॉर्मऐवजी ती चुकून चार नंबरला जातीये असं वाटलं तर आपल्याला अस्वस्थता येते. आता काय करायचं असं वाटतं. म्हणजे रुळ बदलतात की नाही याकडं आपलं लक्ष असतं. आपल्याला जिथं जायचं असतं तिथं जायला आपले हे प्रपंचाचे रुळ बदलल्याशिवाय जाता येत नाही, ही अडचण आहे.

प्रपंचाची जी ठेवण आहे त्या ठेवणींच्या विरोधातच परमार्थाची ठेवण आहे. हे एका अर्थानं आहे. खरं पाहाता प्रपंच व परमार्थात विरोध नाहीच. पारमार्थिक माणसं प्रपंच करीत नाहीत असं नाही किंवा आलेल्या-गेलेल्या माणसांचं काही करीत नाही असं नाही. फक्त ज्या आवडीनं, आपलं विश्व विसरून, त्यात जीव ओतून आपण सहभागी होत होतो ते

होता येत नाही. मनच त्याला नको म्हणतं, हे होतं. हे लक्षण रुळ बदललेल्याचं आहे. तेव्हा ते नातेवाईक तुटले असं आपण का मानावं ?

दुसरं एक चांगलं उदाहरण सांगतो. मनुष्य समजा प्रवासाला कोरेगावला निघाला. इथून माहुलीपर्यंत गेला. आता साताऱ्याची घरं त्याला दिसत नाहीशी होतात. होणारच की ! तो समजा शाहुपुरीतून प्रवासाला निघालाय आणि पाच कि.मी. चाललाय तरी त्याला अजून शाहुपुरीचा चौक दिसतोय असं समजा झालं तर एकतर तो चालतच नसला पाहिजे किंवा आपण चालतोय हा त्याचा भ्रम असला पाहिजे. तेव्हा प्रवास आला की, त्याच्याबरोबर जे तुम्ही पुढं जाता त्यावेळी तुमचं पहिलं सगळं सुटणंच अपेक्षित आहे, त्याशिवाय प्रवास होणारच नाही.

पारमार्थिकांना जुने प्रापंचिक संबंध, प्रसंग सर्व उथळ वाटायला लागतात याचं कारण ते खरंच उथळ आहेत हे त्यांना कळायला लागतं. आपण इतके दिवस कसल्या आनंदात होतो, हे कळतं आणि हे झाल्याशिवाय उथळ जीवन आणि वास्तव जीवन यांतला फरकच कळत नाही. परमार्थ करूनही जर मी त्यात रमत असेन तर मी अजून त्यातून बाहेर आलेलो नाही, असं समजावं. बाकीचं सारं नकोसं वाटणं वा त्यात रस न वाटणं हे बरोबर मार्गाला लागल्याचं लक्षण आहे.

जसं एक गाव सोडल्याशिवाय दुसऱ्या गावाला जाताच येत नाही ही बेसिक अडचण आहे. याच गावी राहीन आणि परगावीही जाईन हे जमत नाही. तसं करताच येत नाही. याला त्यातली तडजोड म्हणा, साधनेची किंमत म्हणा किंवा परमार्थाची किंमत म्हणा काहीही म्हणा.

आता कल्पना करा की, याच प्रपंचाच्या ठेवणीमध्ये तुम्हाला चार नातेवाईक आहेत आणि त्यांतले दोन या परमार्थमार्गातले आहेत. तर ते दोन तुमच्या अधिक जवळ येतात असासुद्धा अनुभव येतो. मग तेही

प्रपंचातलेच असून अधिक जवळ यायचं कारण म्हणजे तुमचा मार्ग एक आहे. आपल्या चार नातेवाईकांपैकी दोन नातेवाईकांकडं आपलं जास्त येणंजाणं वाढायला लागतं, हे जसं प्रगतीचं लक्षण आहे, तसंच उरलेले दोन नातेवाईक, ज्यांना यात काहीही रस नाही, ते तुटणं हेसुद्धा प्रगतीचंच लक्षण आहे.

त्यामुळं याच्याकडं निगेटिव्ह बघायचं काही कारण नाही. नाहीतरी शेवटी 'सोडवीना बंधू, पाठीची बहीण...' हे आपण शिकलोच आहोत. पाठीचा बंधू, बहीण सोडवील असं प्रपंच सारखं सांगत असतो. पण आपल्याला कुणीतरी खडबडून जागं करतं, सावध करतं. मग जरा वाटायला लागतं की यांतलं कुणीच आपल्या कायमचं सोबत नाही.

हे लक्षात आलं की, एक मनाला अस्वस्थता येते. पण जर मीच चालायला लागलो तर जवळची झाडं मागं पडणार हे ठरलेलंच आहे. याचा विचार करायचं काहीच कारण नाही. एकच आहे की, व्यवहार सांभाळावा आणि तुम्ही या दिशेनं चालला आहात म्हणून त्यांनीही चालावं असं मात्र म्हणू नये.

आपण आता नातेवाईकांवर अवलंबून राहात नाही. मग आपण स्वतंत्र झाल्याचं त्यांना कदाचित दु:ख होईल, अस्वस्थता येईल असं आपल्याला वाटतं. हे आपण गृहीत धरावं. आपण त्यांच्यावर अवलंबून आहोत या गोष्टीचा त्यांना एक आनंद असतो. तो आपण यामुळं हिरावून घेतो. मग आता ते याचं उट्टं कुठंतरी काढणार, हेही गृहीत धरावं.

समजा, आपल्यावर एखादा प्रसंग आलाय आणि नेमकं तेव्हाच आपली परमार्थ मार्गातली नवीन जोडलेली माणसं आली नाहीत. तर त्या दिवशी हे नातेवाईक आपल्याला हे ऐकवायला नक्की येणार की बघा कुठं आहेत तुमची माणसं? हा तामस आनंद का होईना त्याक्षणी त्यांना मिळणार.

इथं महाराज असं होऊ देणार नाहीत याची आपण खात्री बाळगू. पण मुळात असं होऊ शकतं, हे आपण गृहीत धरायचं.

ही प्रत्येकाची पझेशन्स(स्वामित्व)आहेत. प्रपंचामधे पझेशन्स हा एक विचित्र भाग आहे. त्यापोटी दु:ख होतं.थोडा त्या नातेवाईकांच्या दृष्टीनं विचार करून बघू. ते काय म्हणतात की, तुमच्या घरात यायचं म्हटलं तर आधीच दहा माणसं बसलेली असतात, तुम्हाला बोलवायचं म्हटलं तर तुम्ही आधीच बिझी असता. तुम्ही आलातच तर लग्नात अगदी अक्षता टाकण्यापुरतं आल्यासारखं करता अन् निघून जाता.

असं झाल्यानं त्यांना आपण निवांतपणे उपलब्ध होत नाही याचं दु:ख त्यांना सारखं होत असतं. मग अशा त्यांच्या प्रतिक्रिया सहन कराव्या लागतात. त्या आपण किती कौशल्यानं कमी करू शकू, टाळू शकू हेच त्यातलं शिकण्यासारखं आहे.

असे नातेवाईक समजा आपल्या घरी आले तर त्यांना तासभर देऊन त्यांच्या आनंदात सहभागी झालं तरी खूप झालं. महाराज म्हणतात तसं प्रपंच खेळाऐसा मानावा म्हणजे आपण अर्धा तास जरी खेळलो तरी खूप झालं. म्हणजे मग शांतता राहाते, एवढंच.

एवढाच व्यावहारिक उपाय त्याला आहे. कारण त्यांना बदलणं आपल्या हातात नाही. बरं, आपणही अशी गॅरंटी नाही देऊ शकत की हा मार्ग अंतिम आहे, त्यावर मी शेवटपर्यंत जाऊ शकतो. कारण आपण आपल्या गुरूवर अवलंबून आहोत. शिवाय आपलं साधन काय आहे ते आपल्याला माहीत आहेच, त्यामुळं तेही उगीच मिरवण्यात अर्थ नाही. त्यामुळं तशी आपली पंचाईतच होते. हा परमार्थाचा धंदा बुडित धंदा आहे की फायद्यात आहे, काहीच कळत नाही.

ती एक रिस्क असल्यानं आपण असं धाडकन् सांगू पण शकत

नाही की, मी करतोय अन् तुम्ही पण करा. त्यामुळं आपल्याला मुकाट्यानं ते दिवस काढायला लागतात. एकदा तुम्ही त्यात व्यवस्थित सेट झालात की मग तुम्हाला चिंता उरत नाही. मग तीच माणसं तुमच्याकडं खेपा घालायला लागतात. नंतर असंही होतं की तेच विचारतात, 'हे तुम्हाला कसं साधलं, तुम्हाला आनंद कसा अनुभवायला आला' इ. आजपर्यंत जी वैषम्य वगैरे नकारात्मक भावना असतात त्या एकदम औत्सुक्याच्या सकारात्मक होतात.पण या सगळ्याची आपण अपेक्षा बाळगू शकत नाही.

प्रापंचिकांच्या पॅटर्नच्या विरोधात तुम्ही आहात. त्यांची जी आनंदाची कल्पना आहे त्याच्या विरोधात किंवा त्यापेक्षा वेगळ्या पॅटर्नमध्ये तुम्ही आहात. म्हणून हा त्रास आहे. तुम्ही जर अजून भरपूर पैसा मिळवायच्या पॅटर्नमध्ये काम करत असाल तर ते तुमचं कौतुक करतील. असंही म्हणतील, काय राबतोय हा ! असं राबलं पाहिजे. एक दहा मजली बिल्डिंग झालीच आहे, आता दुसरी होईल बघा !

या व्यापामुळं जर तुम्ही त्यांच्यासाठी उपलब्ध झाला नाहीत तरी त्यांना काही वाटत नाही. त्यांना असं वाटतं की किती व्यवस्थित चाललं आहे ! पण हेच जर कमी पगारात किंवा आहे त्या पगारात व्यवस्थित चालू आहे असं दिसलं की यांचं बिघडतं. एवढेच पैसे कसे पुरणार ? एवढ्यात कसं काय होणार यांचं ? असं त्यांना वाटतं.

कारण हे वागणं समाजाच्या पॅटर्नच्या विरोधात गेलं ना ! या पॅटर्नमध्ये पैशानं आनंद आणि जास्त पैशानं जास्त आनंद असं आहे. शिक्षणातसुद्धा मुलगा जर बारा तास अभ्यासाला बसला तर त्यांना आनंद होतो, पण तोच एक तास जरी जपाला बसला तर यांचं बिघडतं. कारण तो त्यांच्या पॅटर्नमध्ये नाही. त्यांना असं वाटतं की, यानं अजून कष्ट करावेत, अजून मार्क मिळवावेत, अजून मेरिटमधे यावं, अजून पुढं जात राहावं.

मग त्याला मोठी नोकरी, भरपूर पैसा मिळेल. असं असलं की ते यांच्या पॅटर्नमध्ये असतं.

त्यामुळं आनंदाच्या ज्या कल्पना आहेत तिथं विरोधाभास येतो. त्या बदलल्यामुळं त्यांना अस्वस्थता येते. समजा आज रविवार आहे आणि तुम्ही घरात आनंदात राहाणार, म्हणजे नुसतंच आनंदात राहाणार आहात. आनंदाकरता तुम्हाला काही लागत नाही. एक माळ घेऊन बसलं तरी तुम्ही आनंदात राहू शकता. तर अशा वेळी हे प्रापंचिक नातेवाईक म्हणतात की, असं कसं काय ? हे एकटेच कसे काय आनंदात राहाणार ? आम्ही इथं माणसं बोलावून गोळा करतोय तरी आम्हाला आनंद नाही.

म्हणजे सगळ्यांना गोळा करून, खाऊन, पिऊन, सिनेमा, टी.व्ही. बघून पुन्हा शेवटी दिवस आनंदात कसा संपेल याची त्यांना चिंता पडते. कारण बोलावलेली माणसं सात-आठ तासांनी खाणंपिणं झालं की निघून जातात. पुन्हा पुढचे चार तास कसे काढायचे असा त्यांना प्रश्न पडतो आणि या पारमार्थिकाला मात्र वाटतं की कुणी आलं नाही तर बरंच होईल. आज जपाला वेळ मिळेल.

हे आनंदाच्या कल्पना बदलल्यामुळं होतं. उपाधीचा आनंद आणि निरुपाधिक आनंद हे जे महाराज म्हणतात तोच हा फरक आहे. मूलभूत विरोध इथंच आलेला आहे. साध्या भाषेत 'आपण आनंदात असतो याचं त्या नातेवाईकांना दुःख होतं आणि विशेषतः - आम्ही नसताना हे आनंदात राहू शकतात - याचं त्यांना दुःख होतं.' ते, ते कबूल करत नाहीत.

महाराजांनी असं म्हटलंय, साधूंनी एखाद्याला सत्संगाला लावलं, त्याचं भलं केलं तर त्याच्या दहा नातेवाईकांचे शिव्याशाप त्याला घ्यावे लागतात. ही वस्तुस्थिती आहे. दहा नातेवाईक त्या साधूला म्हणतात, यांच्या नादानं यांचं हे असं सुरू झालं.वास्तविक याला माहीत असतं की,

साधूंची अशी कुठली विघातक भूमिका अजिबात नसते. साधूंनी याच्या आयुष्याचं कल्याण केलेलं आहे हे या नातेवाईकांनाही खरं तर माहीत असतंच. पण त्याला आपल्यापासून तोडल्याचं पातक ते साधूंच्या डोक्यावर घालत असतात. ही सत्पुरुषांची अवस्था आहे.

आपण या मार्गात आल्यावर आपला वाटा उचलायलाच लागतो. सत्पुरुष तर डोक्यावरचं सगळं ओझं घेतातच. आपण जर उपासनेच्या दृष्टीनं योग्य मार्गावर असू तर हा त्रास मात्र कमी होतो. आपल्याला विरोध करून हाणून पाडायच्या नातेवाईकांच्या ज्या सगळ्या कल्पना असतात त्या चालत नाहीत. त्यामुळं फार त्रास देता येत नाही.

थोडीफार बोलणी ऐकावी लागतात.- शिबिराच्या वेळेला तुम्हाला रजा मिळते,पण आमच्या लग्न, बारसं अशा कार्यक्रमांना मात्र वेळ नसतो- ही अगदी प्रातिनिधिक तक्रार.शिवाय दागिने,खरेद्या यांवर चर्चा करणं बंद होतं, याचं त्यांना दुःख होतंच. तो त्यांच्या चिंतेचा विषय होतो. तुमच्या गळ्यातले दोन दागिने गेले तरी तुम्हाला काही वाटत नाही, याचाही त्यांना फार त्रास होतो. - यांना स्वतःच्या वस्तू गेल्याचं दुःख नाही आणि आम्ही करतोय त्याचं कौतुक नाही - हे प्रश्न सारखे ऐरणीवर येत राहातात.

मुळात हे दोन स्वतंत्र मार्ग असल्यानं आपण जसं काही कारणानं परमार्थाकडं वळलो तसं त्यांच्या आयुष्यात काहीतरी आलं तर तेही तिकडं वळू शकतात. त्यामुळं आपण आपली बाजू नेहमी पाहावी की - आपल्याला दुःख नाही ना, आपल्याला अस्वस्थता नाही ना.

आपण इतर माणसांना सांभाळून घ्यायची इच्छा आणि तयारी ठेवावी अन् पुढं जात राहावं. कारण आयुष्य थोडं आहे आणि ते आता तरी बेसावधतेत घालवायचं नाहीये. प्रापंचिकांना ते घालवायचं स्वातंत्र्य आहे, हे जाणावं आणि पुढं चालावं.

*

५. १. भगवंताचा शोध घेताना अनेक मार्ग सांगितले जातात.त्या मार्गांपैकी एक मार्ग म्हणजे मीचा शोध(आत्मशोध)हा आहे का?

२. त्या मार्गात कोणकोणत्या पायऱ्या आहेत ?

३. सर्वसाधारण साधकाला या पायऱ्यांवरून जाता येईल का?

४. येत असल्यास कसं जाता येईल ?

५. साधक बरोबर मार्गावरून जातो आहे याच्या खुणा त्याला पडताळून पाहाता येतात का ?

स्वत:ला ओळखणं हा अध्यात्मातला अत्यंत निरुपाधिक, अत्यंत उत्तम दर्जाचा व खरं सांगायचं तर सर्वांना शक्य असलेला मार्ग आहे. पण तो अवघड म्हणून ओळखला जातो.

तो सोपा अशामुळं आहे की, देव, धर्म, पूजाअर्चा, साधना यांत बऱ्याच गोष्टी धराव्या लागतात, मतभेद असतात, शंका येतात. पण मी स्वत: आहे याबद्दल आपल्याला काही शंका नसते. मी स्वत:ला ओळखतो याबद्दलही शंका नसते. पण आत्ताची जी ओळख आहे ती बरोबर करणं एवढंच या मार्गाचं सार आहे व या मार्गाचं वैशिष्ट्य हे आहे की, त्याला इतर कुठल्या उपाधींची गरज नाही. हा निरुपाधिक मार्ग आहे. श्री रमणमहर्षी व श्री कृष्णमूर्ती ही या मार्गातली मोठी सिद्ध उदाहरणं आहेत. त्यांनी हा अनुभव स्वत: घेतलेला आहे. खऱ्या आनंदाचं, समाधानाचं, साक्षित्वाचं ध्येय या मार्गानंच साध्य होतं.

मी स्वत:ला जे मानतो ते टाकण्याची सर्वसामान्य साधकाची जर तयारी असेल तर या मार्गावरून जाता येईल. त्याच्या पायऱ्या म्हणजे -

१. मी स्वत:ला जे समजतो तसा मी नाही, हे पहिल्यांदा मन:पूर्वक मान्य करणं. उदा. चांगला, सात्त्विक, हुशार इ.

२. जे माझं नाही त्याचा त्याग करणं किंवा जे माझं आहे असं वाटतंय उदा. शरीर, घरदार, पैसावस्तू, लौकिक, अनुभव इ. ते माझं नाही असं मानून त्याचा मनानं त्याग करणं. कारण जर ते माझं असेल तर त्यावर माझी सत्ता चालली पाहिजे, पण तसं होत नाही.

३. आता काय माझं राहील हे शोधून काढणं.

४. ते जे शोधून सापडेल त्यात स्थिर राहाणं. म्हणजे नाशिवंत शरीर सुटून आत्मस्वरूपात राहाणं.

५. त्या आत्मस्वरूपात स्थिर राहून व्यवहार करणं. म्हणजे उदा. माझ्या नसलेल्या या शरीराचा गुडघा हा भाग आहे आणि समजा तो दुखतो आहे. तर त्या माझ्या नसलेल्या शरीराच्या गुडघ्याचं दुःख तो गुडघाच जाणे. म्हणजे मला - माझ्या आत्मस्वरूपाला - त्याचं काही सुख-दुःख न राहाणं. तसंच हाताचं दुःख हात जाणे, पायाचं दुःख पाय जाणे - असं आत्मस्वरूपात स्थिर राहून व्यवहार करणं होय.

आता साधक बरोबर मार्गावरून जातो आहे याच्या खुणा कोणत्या ते पाहू.

अस्वस्थता, अशांती, काळज्या, इतरांविषयी तुच्छता, इतरांशी तुलना ह्या गोष्टी कमी व्हायला लागल्या तर प्रवास योग्य दिशेनं चालू आहे, असं समजावं.

इतरांवर मनापासून प्रेम करता येत असेल, दुसऱ्यांसाठी सहजपणे झिजता येत असेल, कायम आनंदी राहाता येत असेल तर प्रवास योग्य दिशेनं चालू आहे, असं समजायला हरकत नाही. तसं असल्यास मला खऱ्या मीचा शोध लागला असून मी त्या मार्गानं बरोबर चाललो आहे याच्या त्या खुणा समजाव्यात.

*

६. लहानपणापासून देवाची आवड आहे, श्री महाराजांचं वाचायची आवड आहे. पण माझे माझ्या बाबतीतले सर्व निर्णय चुकीचे झाले याला काय कारण असावं ?

प्रथम आपण हे लक्षात घेऊ की, देवाचं, श्री महाराजांचं वाचन करायचं ते कशासाठी करायचं हे समजून घेऊन जर ते केलं असेल तरच त्याला महत्त्व आहे. नाहीतर ग्रंथ वाचल्यानंतर आपण उघडा ठेवीत नाही, नेहमीच्या व्यवस्थेप्रमाणं मिटवून ठेवतो तसं सर्व वाचलेले विचारही आपण मिटवून ठेवतो. त्यामुळं या विचारांचा व माझ्या निर्णयांचा काही संबंधच उरत नाही.

खरं तर ते विचार माझ्या निर्णयाची प्रक्रिया चांगली व्हावी म्हणून आहेत. ग्रंथांमधून आपल्याला एक दिशा मिळते. अनेक ग्रंथांमध्ये आपण आदर्श जीवन कसं जगावं, आपले निर्णय कशा प्रकारचे असावेत याबद्दलच्या सूचना व मार्गदर्शन असतं. त्या सूचनांचा वापर जर मी वेळोवेळी निर्णय घेताना केला नाही तर त्या अर्थानं त्या वाचनाचा काही उपयोग होणार नाही. ते निर्णय चुकले याचा अर्थ मी ते वाचन स्वतंत्र समजलो व हे निर्णय घेणं स्वतंत्र समजलो हा आहे.

अनेक लोकांना आपल्या उपासनेची आपल्या जीवनाशी सांगड आहे, हे समजतच नाही. त्या उपासनेची म्हणजे वाचनाची आणि आपल्या जीवनाची सांगड घालणं आवश्यक आहे. तशी ती घातली असेल तर निर्णय योग्य राहतील.

आपल्याला निर्णय चुकले असं वाटतंय, याचा अर्थ निर्णयाचे परिणाम किंवा त्यानुसार केलेल्या कर्मांची फळं चुकीची आली असावीत. आता याचा थोडा विचार करू. खरं म्हणजे निर्णयाचं बरोबर फळ मिळेल

की नाही हे आपल्याला सांगता येणार नाही. कारण फळ हे अनेक गोष्टींवर अवलंबून असतं.

उदा. आपण जरी आपल्या मुलावर योग्य संस्कार केले तरी तो पुढं बरोबर वागेल की नाही हे सांगता येत नाही. कारण ते बऱ्याच गोष्टींवर अवलंबून असतं - बाहेरचे संस्कार, त्याचं प्रारब्ध, मीपणा, दुसऱ्यांना - परिस्थितीला समजून घ्यायची, तिच्यानुरूप स्वत:त बदल घडवायची तयारी असणं इत्यादी.

आपण महाराजांचा सुबोध म्हणताना 'यत्न कसुन करिन मी, यश दे, रामा, न दे, तुझी सत्ता' हे नेहमी म्हणतो. पण आपण यात म्हटल्याप्रमाणं आधी जर यत्न कसून करीत नसू आणि त्यातून आलेलं यश किंवा अपयश म्हणजे जे फळ असेल ते रामाच्या सत्तेनं मिळालं आहे हे स्वीकारू शकत नसू तर ते ग्रंथ मिटवून ठेवल्याचंच लक्षण आहे.

आपल्या निर्णयांचा संबंध आपल्या विचारप्रक्रियेशी आहे. उदा. मी समजा प्रवचनात वाचलं की, - श्री महाराज म्हणत, प्रपंचात गुंतून राहू नका. फक्त प्रपंचाची कर्तव्यं करा - आणि ते नुसतंच वाचून मी प्रपंचात गुंतून राहिलो तर त्या वाचनाचा व आपला काहीच संबंध नाही, असं म्हणावं लागेल. महाराजांनी तटस्थतेनं राहायला सांगितलं आहे. मी जर तसं राहात नसेन तर त्या वाचनाचा काही उपयोग होणार नाही.

निर्णय घेणारं जे माझं चित्त आहे त्याच्यावर कोणत्या गोष्टी परिणाम करतात, त्यावर कशाकशाचे संस्कार होतात हे महत्त्वाचं आहे. समजा मी प्रवचन-ग्रंथ यांचं वाचन पंधरा मिनिटं करीत असेन आणि टी.व्ही. वरच्या मालिका जर तासभर बघत असेन तर मग जास्त परिणाम कशाचा होईल, हे वेगळं सांगायला नको.

एखाद्या फळ्यावर परमेश्वराचं चित्र काढलं आहे व नंतर ते पुसून

टाकायचं आहे तर कोणत्या कृतीला जास्त वेळ लागेल ? चित्र काढायला जर समजा अर्धा तास लागत असेल तर ते पुसण्याचं काम डस्टर एक मिनिटात करतो. तसंच चांगले संस्कार व्हायला वेळ जास्त लागतो, पण ते पुसायला मात्र काही मिनिटंही पुरतात.

निर्णय घेणं हा विचारांचा शेवटचा टप्पा आहे. जसे विचार होतात तसे निर्णय होतात. विचार चुकले की निर्णय चुकणं स्वाभाविक आहे. त्यामुळं योग्य विचार होणं हेच जास्त गरजेचं आहे. तेच ग्रंथ, संतवाङ्मय सांगत असतं.

माणसाचा कल हे वाचन नुसतं पुरं करण्याकडं असतो. ग्रंथ वाचून त्याच्या प्रकाशात मन आणि जीवन समजून घ्यायला सुरुवात करणं आवश्यक असतं. कुठं चुकत गेलं, कसं बदलता येईल हे जर मनुष्य श्री महाराजांच्या, समर्थांच्या, श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या प्रकाशात शिकेल, त्यानुसार वागत जाईल तर निर्णय चुकणार नाहीत.

*

७. सद्‌गुरू कृपा करतात म्हणजे काय करतात ?

साधकाच्या प्रयत्नांना योग्य प्रतिसाद देतात म्हणजे सद्‌गुरू कृपा करतात.

*

८. देवांच्या जुन्या फ्रेमचं काय करावं ? त्या खराबही होतात व टाकण्याचीही भीती वाटते.

मुळात देव हा फ्रेमच्या रूपात असला तरी आदर व प्रेमाचा विषय आहे. भीतीचा नाही हे लक्षात ठेवावं. शेवटी फ्रेम ही एक भौतिक वस्तू आहे. ती जीर्णशीर्ण होणारच. इतका उत्तम देहसुद्धा जीर्ण होतो आणि टाकावा लागतो तिथं फ्रेमचं काय ! पण देहाच्या विसर्जनाचासुद्धा व्यवस्थित विधी आहे. तसं आवाहन आणि विसर्जन ही भक्तीची अंगच आहेत.

फ्रेम ठेवताना जसं आवाहन करून ते ते देव त्या त्या ठिकाणी आहेत या कल्पनेनं उपासना सुरू केली तशीच काही कारणांनी ती फ्रेम जुनी झाली, टाकण्यासारखी झाली तर संकल्पपूर्वक अक्षता टाकून नमस्कार करावा. नवीन फ्रेम करायची असल्यास, तुमचं नवीन स्वरूप मला हवं आहे, अशी प्रार्थना करावी. मग शेवटची उपासना व नैवेद्य करावा. त्यानंच फ्रेमची सांगता झाली आहे.

आता ती फ्रेम हे एक मेटल, लाकूड, जीर्ण कागद, काच असं शिल्लक आहे, हे ध्यानी घ्यावं. कागद अग्नीत किंवा वाहत्या पाण्यात टाकता येईल, म्हणजे दोष लागणार नाही. ही कामं भीतीपोटी नोकर किंवा अशा दुसऱ्या कुणाकरवी करू नयेत. आता राहिलेलं लाकूड, काच, मेटल हे इतर कामासाठी वापरता येईल. कदाचित पॉलिश करून त्यामधून नवीन फ्रेम वा अन्य उपयोग होऊ शकेल.

यातलं काहीही केलं तरी ती त्याची योग्य सांगता आहे. त्यात भीती बाळगण्याचं कारण नाही. उलट ती त्या फ्रेमपुरती भावपूर्ण सांगता आहे, हे लक्षात ठेवावं.

*

९. आजवरचं आयुष्य मी चुकीच्या पद्धतीनं घालवलं. आता वय झालं आहे. उरलेल्या थोड्या आयुष्यात उद्धार होईल का व कसा होईल, याची चिंता लागते. काय करावं ?

ही अगदी चांगली प्रामाणिक अडचण आहे. ज्ञानेश्वरांनी सांगितलेलं उत्तरच त्याला उत्तम उत्तर आहे. खोलीत किती वर्षांपासून अंधार होता हे पाहिलं जात नाही. प्रकाश आत आणला की अंधार दूर होतो. जर आपल्याला सद्‌बुद्धी झाली असेल तर एक दिवसही मुक्त व्हायला पुरेसा आहे.

अमुक वर्षं साधना केली तरच हे होतं असं नाही. अनेक वर्षं चुकीच्या मार्गानं जाऊनसुद्धा त्यातून बाजूला व्हायला एक दिवसही पुरतो. आपण भौतिक गोष्टींची प्रमाणं परमार्थाला लावू नयेत. परमार्थाच्या गोष्टींमध्ये एक क्षणही पुरेसा असतो. कृष्णमूर्ती म्हणायचे समजा आपल्याला आसक्ती आहे तर ती सोडण्यासाठी क्षणही पुरतो. परमार्थात बदल हा मनाचा आहे. तो शरीराचा किंवा भौतिक गोष्टींचा भाग नाही. त्यामुळं पंचवीस वर्षं साधना केली म्हणून अमुक होईल हे सांगता येत नाही. साधना आपण कोणत्या भूमिकेतून केली, कोणत्या पातळीवरून केली, आपलं मन त्याच्यात होतं का - हे सगळं महत्त्वाचं आहे.

एखादी गोष्ट जर सुटायची असेल ती क्षणातही सुटू शकते याचा आपल्याला अनुभव असेलच. सर्व सोडून देणं इतकं सोपं नाही म्हणूनच आपल्याला साधना सांगितली आहे. आपल्या भावावर ती अवलंबून आहे. काळ कमी असेल तर मग साधनेत जास्त भाव आणण्याचा प्रयत्न करावा. कुठलीही चांगली गोष्ट ठरवली तर ती आजच करावी, उद्यावर ठेवू नये. मी रामाचा, महाराजांचा, समर्थांचा आहे, ते मला सांभाळतील, उद्धरून नेतील ही खात्री बाळगावी, म्हणजे चिंता लागणार नाही.

*

१०. आत्मज्ञान झाल्यावर माणसाच्या जीवनात कोणते बदल होतात ? ध्येय, कार्य, बुद्धीच्या विविध क्षमतांत काय बदल होतो ? देहबुद्धी नाहीशी झाल्यामुळं झोपेची गरज किती असते ? भूक लागते का ?

आत्मज्ञान व्हायच्या आधी मनुष्य स्वत:ला स्वतंत्र अस्तित्व आहे, हे गृहीत धरतो आणि स्वत:चा बुद्धीचा, अनुभवांचा, संस्कारांचा जो सारांश आहे त्याला धरून स्वत: स्वत:चं ध्येय ठरवतो. आत्मज्ञान झाल्यानंतर भगवंत त्या माणसाचं ध्येय ठरवतो. त्याप्रमाणं त्याला कार्य करावं लागतं. त्यामुळं ते अनेकदा मानवी क्षमतेच्या तर्कात बसतही नाही.

साक्षात्काराच्या आधी माणसाचं कार्य त्याच्या त्याच्या कुवतीप्रमाणं चालू असतं. नंतर मात्र कुवतीच्या पलीकडं कार्य घडतं. अपेक्षेपेक्षा कितीतरी जास्त कार्य घडतं. भगवंताची इच्छा व त्याची कुवत यांमुळं ही कार्यं होतात आणि म्हणूनच संतांची कार्यं अशी मानवी कुवतीच्या बाहेरची दिसतात. दिवसाच्या चोवीस तासांत बसू शकणार नाहीत अशी कार्यं संतांकडून होतात. नाहीतर श्री ज्ञानेश्वर माउली, विवेकानंद, तुकोबा, प्रभू यांच्याकडून इतक्या लहान वयात अशी कार्यं होणं शक्यच नाही.

बुद्धीला मर्यादा असतात. त्यामुळं बुद्धीच्या उपजत कुवतीप्रमाणंच माणसाला काम करता येतं. पण भगवंताच्या कार्याला जेवढी गरज असेल तेवढी बुद्धी आत्मज्ञानी माणसात निर्माण होते. ज्याचं ज्ञान होण्याची ज्यावेळी आवश्यकता आहे त्यावेळी ते ज्ञान उत्पन्न होतं. श्री तात्यासाहेब एकदा म्हणाले होते, 'ज्ञानाचा उगम जिथं आहे तिथं मी बसलेलो आहे. म्हणूनमला कोणत्याही विषयाचं ज्ञान होतं.'

पू. तात्यासाहेबांचीच एक गोष्ट आहे. एकदा एक मूल रडत होतं. काही केल्या ते थांबेना. तेव्हा तात्या म्हणाले की, त्याची मान लचकली आहे का ते पहा आणि खरंच त्या मुलाच्या मानेला औषध लावल्यावर ते रडायचं थांबलं. हे ज्ञान आत्मज्ञानामुळंच होऊ शकतं, हे लक्षात घ्यावं.

आत्मज्ञान झाल्यावर देहबुद्धी नाहीशी होते. देह नाहीसा होत नाही. त्यामुळं देहाच्या गरजा राहातात, पण त्या पुरवण्याचे आग्रह राहात नाहीत. त्या गरजा नाही पुरवल्या तरी नडत नाही.

स्वामी रामतीर्थ म्हणत की, रामला तहान लागली आहे, रामला भूक लागली आहे. म्हणजे राम नावाचा जो देह आहे त्याला भूक लागली आहे. काय द्यायचं, केवढं द्यायचं ते तुमचं तुम्ही बघा. नाही दिलं तरी फरक पडत नाही. कारण देहबुद्धी नाहीशी होते.

देहाच्या गरजा म्हणजे तहान-भूक-झोप या देह असल्यामुळं तशाच राहातात. फक्त त्या पुरवल्या गेल्या किंवा नाही गेल्या तरी आत्मज्ञानी माणसाला त्याचं सुख-दुःख राहात नाही. अमकंच पाहिजे, तमकं नाही चालणार, ही देहबुद्धी आहे. ती नाहीशी होते. म्हणजे देहाला धरून विचार करणारी जी बुद्धी आहे ती नाहीशी होते.

आत्मज्ञानी माणसाला जी प्रचंड कार्यं करायची असतात ती देहाच्या साहाय्यानं करावी लागतात. म्हणून देहाची गरज तेवढी शिल्लक राहाते.

*

११. संसारातील खरेदीकडं बघण्याचा दृष्टिकोन काय असावा ?

प्रापंचिक लोकांचा 'खरेदी' हा एक आवडता विषय असतो. त्यामुळंच यात बऱ्याच लोकांचा आयुष्यातील बहुमोल वेळ जात असतो.

पहिली गोष्ट म्हणजे अशा खरेद्या करताना आपली गरज पाहावी, कुवत पाहावी. क्रेडिट कार्ड मर्यादेबाहेर गेलं तर दिवाळखोरी आणतं हे आधीच सांगून झालं आहे. पण आता ते सिद्ध झालं आहे तर आता तरी मानावं. म्हणून खरेदी करायच्या आधी आपली पत पाहावी.

नीती, समाज व देश यांचा विचार करावा. इतर समाजाचाही विचारा करावा. आपली खरेदी फक्त स्वार्थासाठी नाही ना, हे पाहावं. मी एखादी गोष्ट घेतल्यानं जर ती चार लोकांना सुखाची होत असेल तरच तिला खरेदी म्हणावं. नाहीतर ती फक्त स्वार्थाची सोय आहे.

शक्यतो देशाचाही विचार करावा. ही वस्तू माझ्या देशाची आहे, याचा पैसा माझ्या देशातल्या लोकांकडं जाईल का याचाही विचार करावा. आज आपल्या आर्थिक नाड्या परकीयांच्या हातात गेल्या आहेत, हे आपण पाहातोच आहोत. म्हणूनच जर देश जगला तरच आपण जगू, हे लक्षात ठेवावं. देशाला राजकीय स्वातंत्र्य जरी मिळालं असलं तरी ते बरंचसं कागदावरच आहे आणि आर्थिक पारतंत्र्य मात्र रोज घरीदारी पाहायला मिळतं आहे. अशी आपली आजची स्थिती आहे. त्यामुळं खरेद्यांमागं हा दृष्टिकोनही असावा.

दुसरं म्हणजे आपली ध्येयं काय आहेत, त्या ध्येयांना अनुकूल अशा गोष्टी आपण करतो आहोत का, याचा विचार करावा. श्री महाराजांनी म्हटल्याप्रमाणं, गाठायचा आहे परमार्थ, वाचतो आहे कादंबऱ्या याचा मेळ कसा बसणार ?

म्हणून आपल्या ध्येयाला ही खरेदी पूरक आहे का ते पाहावं. खरेदीमध्ये मला गुंतवण्याची क्षमता असते. काय खरेदी करणार यावर ते अवलंबून आहे. उदा. समजा एक केरसुणी आणली तर त्यानं केर निघेल. त्यात कुणी गुंतून राहाणार नाही, हे बरोबर आहे, पण समजा जुना टी.व्ही. बदलून नवीन आणला तर घरातले सगळे सतत त्या टी.व्ही.समोरच बसतील, त्यात पूर्वीपेक्षा जास्त गुंतून राहतील.

एवढा फरक लक्षात घेतला तरी जाग येईल, खरेदीचा एक वेगळा, विधायक दृष्टिकोन तयार होईल. साधेपणा शिकता येईल.

*

१२. ईश्वराच्या इच्छेनं सर्व घडत असतं, आपला हात लागतो इतकंच. अशा स्वरूपाचंही श्री महाराजांचं वचन आहे. या वचनाशी आपल्या दैनंदिन कर्तृत्वाचा मेळ कसा घालावा ?

पहिल्या पातळीवर हे वचन कर्म घडल्यानंतर लक्षात ठेवावं. कर्मानंतर उत्तम यश येतं तेव्हा विशेषत: हे वचन आठवावं, म्हणजे कर्तृत्वाचा अहंकार होत नाही. अपयश आलंच तर हे वचन लक्षात असू द्यावं, म्हणजे सोपं पडतं, शिवाय निराशाही टळते.

दुसऱ्या पातळीवर खऱ्या कर्त्याची आठवण देण्याकरता हे वचन आहे. ते आपल्याला आळशी किंवा कर्तृत्वशून्य बनवण्यासाठी नाही तर अखंड कर्मयोग साधूनसुद्धा होणाऱ्या घटनांत भगवंताची इच्छा असल्याखेरीज झाडाचं पानसुद्धा हालवता येणार नाही, इतकं मानण्याइतपत निरहंकार होण्यासाठी हे वचन आहे.

१३. माझा जप संतछायेत आल्यावर होतो, पण घरी होत नाही, ही मानसिकता कशी बदलेल ?

'जप संतछायेत होतो' यातच याचं उत्तर आहे. जप करणं आणि होणं यांच्यात त्याचं उत्तर आलेलं आहे. संतछायेत संत जप करीत बसलेले असतात म्हणून आपला जप होतो. आपल्या घरी संतांना स्थान द्या म्हणजे आपला तिथंही जप होईल.

घरी मी आहे म्हणून जप होत नाही. घरी स्वत:ला बाजूला ठेवून संतांना ठेवा. 'संतछाया' केव्हा निर्माण होते ? जेव्हा तुम्ही संतांना डोक्यावर ठेवता, तेव्हा छाया निर्माण होते. संतांच्या पायाशी बसलं की, डोक्यावर त्यांची छाया निर्माण होते. घरी संतांच्या पायाशी बसा. जप नाहीतरी तेच करवून घेतात म्हणून होतो. तो घरीही होईल.

स्थानाला माहात्म्य येतं ते तिथं असलेल्या निष्काम, निस्सीम उपासनेनं, जी घरीही करता येईल. स्थानांची मदत घ्यावी, पण स्वतंत्र होण्याकरता, हे लक्षात आलं म्हणजे मानसिकता बदलेल.

*

१४. कृपा झाली हे कसं समजावं ?

आपण जे प्रयत्न केले त्याच्यापेक्षा जास्त यश आलं म्हणजे कृपा झाली, हे समजावं.

*

१५. श्री महाराजांनी श्री दत्तगुरूंचं मंदिर बांधलं, त्याच्या शेजारी नृसिंहाचीही स्थापना केली याचा उद्देश काय असावा ?

साधारणतः पंथा-पंथांमध्ये भेद असतात. पंथ म्हणजे वाट. आपल्याला पुढं जाण्यासाठी काहीतरी वाट लागते. तशी प्रत्येकाची भक्तीची काहीतरी वाट असते. ती म्हणजे पंथ. उदा.पांडुरंगाची, रामाची,दत्ताची इ.

पण माझी वाट मी चालत असताना दुसऱ्याच्या वाटेकडं लक्ष ठेवणं हा माणसाचा प्रापंचिक स्वभाव आहे. दुसऱ्याची वाट कमी किंवा जास्ती ठरवायची माणसाला उगीचच एक आवड असते. दुसऱ्याच्या वाटेपेक्षा माझी वाट कशी चांगली, त्याची कशी वाईट हे तो ठरवतो.

हे होऊ नये म्हणून बऱ्याच संतांनी आपलं जे उपास्य दैवत आहे त्याच्या बरोबरीनं दुसऱ्या पंथाच्या देवतेची स्थापना केली आहे. याची गरज संतांना नसून आपल्यासारख्या सामान्यांसाठी तो एक धडा आहे. संतांना याची काहीच गरज नसते. कारण ते जेव्हा सर्व पंथ, जाती, धर्म समान समजतात तेव्हाच गुरुपदाला पोचतात. आपली शिष्यमंडळी तिथं पोचावीत म्हणूनच संतांना हे करावं लागतं. संतांना त्यातून हेच सांगायचं असतं की, भेद ठेवू नका, त्यातून मार्ग घेऊन वाटचाल करा.

मुळात श्री दत्तगुरु हा स्रोत मानलेला आहे. आपल्या ज्ञात इतिहासात इतक्या प्रकारे शिकलेलं व गुरुपदाला गेलेलं उदाहरण आपल्याला मिळत नाही. म्हणून त्यांना गुरूंचे गुरू असं मानलेलं आहे. ते मुळात एक राजे आहेत. त्यांच्यापाशी वैराग्य आहे. वैराग्यानं ते शिकत आहेत. शिकावं कसं ते दत्तगुरुंकडून शिकावं. जो जो गुण ज्याच्याकडून त्यांनी घेतला त्याला त्यांनी गुरू केला. त्यांनी इतके गुरू केले की, ते स्वतःच गुरू बनले.

त्यांनी दोन्ही प्रकारचे गुरू केले आहेत - चांगले, ज्यांच्याकडून काय करावं हे शिकण्यासाठी आणि इतर, ज्यांच्याकडून काय सोडावं ते शिकण्यासाठी. सृष्टीतल्या असंख्य गोष्टींतून ते शिकले. गुरूंचे गुरू म्हणून महाराजांनी श्री दत्तगुरूंची स्थापना केली असावी.

नृसिहांची स्थापना अशासाठी केली असावी की, ज्यानं काही चांगलं करायचं ठरवलं आहे -विशेषत: देवाचं-नारायणाचं नाम ज्यानं कंठी प्राणपणानं धरलं आहे त्याच्यासाठी परमेश्वर आपले सर्व नियम मागंपुढं करून त्याच्यापर्यंत येऊन त्याचा उद्धार करायला तयार आहे. याचं उदाहरण म्हणजे नृसिंह. कुठलेही नियम उदा. सृष्टीचे नियम, एकतर तुम्ही माणूस असाल किंवा पशू तरी, हाही नियम मोडून ते तिथं यायला तयार आहेत. ते अशा पद्धतीनं प्रकट झालेले आहेत की, त्यांना सृष्टीचे कोणतेही नियम लागू होत नाहीत.

अशा पद्धतीनंसुद्धा जो नाम घेतो आहे, ज्याची निष्ठा आहे त्याच्यासाठी भगवंत सर्व नियम मोडून प्रकट होतो. आज दैत्याच्या उद्धारासाठी (प्रल्हाद हा दैत्याचा मुलगा होता) जर भगवंत प्रकट होत असेल तर आपल्यासारख्यांच्या उद्धारासाठी तो नक्कीच येईल. माझा प्रपंच कसाही असला तरी भगवंत त्यात प्रकट व्हायला तयार आहे, पण माझी मात्र भक्त प्रल्हाद व्हायची तयारी हवी.

याची जाणीव व्हावी म्हणून नृसिंह ठेवले आहे. आपल्या मनामध्ये सत्त्व, रज, तम तिन्ही गुण आहेत. तमोगुणाचे आधिपत्य असलेले राक्षस, रजोगुणाचे आधिपत्य असलेला माणूस आणि सत्त्वगुणाचं आधिपत्य असलेले देव आहेत.मी तमोगुणी असून मला जर सत्त्वगुणाची कास धरायची असेल, नाम घ्यायचं असेल तर भगवंत तिथं हजर व्हायला तयार आहे. याची जाणीव राहावी म्हणून नृसिंहाचं उदाहरण श्री महाराजांनी दिलं असावं.

*

१६. १. ईश्वरी कृपा होणं म्हणजे नक्की काय ?

२. ती कोणावर होते ?

३. पारमार्थिक वाटचालीत मानवी प्रयत्नांचं महत्त्व किती ?

मूलत: मानवाचे मुक्तीचे प्रयत्न यशस्वी व्हावे म्हणून ईश्वराची जी प्रेमळ, निरपेक्ष, निरंतर मदत आहे ती ईश्वरी कृपा होय. मुक्ती म्हणजे समाधान, आनंद. आहे त्या अवस्थेमध्ये चित्तानं मोकळं होणं म्हणजे मुक्ती. यासाठीच माणसाचे सर्व प्रयत्न चालू आहेत. हे प्रयत्न यशस्वी व्हावेत म्हणूनच ही ईश्वरी व्यवस्था आहे.

ईश्वरी कृपा ही असतेच. ईश्वरी कृपा होणं म्हणजे आपल्याच ते लक्षात येणं की ती कशासाठी आहे, काय आहे व तिचं मी काय करावं. ती कुणावरही होते. जसं श्री महाराजांच्या गाडीतून बिनतिकिटाची माणसंही जातात तशी ती कुणावरही होते. जो गाडीतून उतरत नाही व उतरला तरी कशातही न गुंतता परत गाडीत येऊन बसतो त्या सर्वांवर ही कृपा होते. म्हणजेच परमेश्वर कृपा करायला तयार असताना जे पळ काढीत नाहीत, ज्यांची त्याचा लाभ घेण्याची तयारी आहे त्या सर्वांवर कृपा होते.

पारमार्थिक वाटचालीत मानवी प्रयत्नांना अपार महत्त्व आहे. फक्त डोक्यावर हात ठेवून, मंत्र देऊन, दृष्टीनं बघून कुणी मुक्त होत नाही. होत असेल तर हात ठेवण्यासाठी जे करावं लागतं ते आधी त्यांनी केलेलं असतं, हे आपण लक्षात ठेवावं.

कृपा जर पावसासारखी असेल तर शेतकऱ्याच्या प्रयत्नांचं महत्त्व त्यानं लावलेलं पीक येण्यात जेवढं असेल, असतं, तेवढं महत्त्व मानवी प्रयत्नांचं पारमार्थिक वाटचालीत आहे. देह हे परमेश्वरानं दिलेलं शेत आहे. आता मशागत करणं, बी पेरणं हे वेळेवर करीत राहाणं हे शेतकऱ्याचं

काम आहे.तेच मानवी प्रयत्नांचं स्थान आहे. हे सारं करणाऱ्यांवर पावसाची कृपा होते तशी ती सगळ्यांवरच होते.पण यश मात्र हे सगळे प्रयत्न केलेल्यांनाच येतं, हे महत्त्वाचं.

परमेश्वराच्या कृपेनंच प्रत्येकाला देह आहे. प्रत्येकाला आपापल्या परीनं जेवढी बुद्धी मुक्ततेला लागते तेवढी दिली आहे. मुक्ततेला फार बुद्धी लागत नाही. कारण ते बुद्धीचं कामच नाही. मुळामध्ये हे कळण्याइतपतच बुद्धी लागते. मुक्तता हे श्रद्धेचं काम आहे, हे ओळखण्यापुरतीच बुद्धी लागते. विशिष्ट प्रकारचे जे प्रयत्न करायचे आहेत ते कोणते करायचे हे कळण्याएवढी बुद्धी लागते.

उदा. नाम घेणं. जो अखंड नाम घेईल तो उद्धरून जाईल किंवा आज्ञापालन असेल तर भाऊसाहेब महाराजांसारखं. त्यांना कुणी विचारलं की हे तुम्ही का करता आहात तर ते म्हणत श्री महाराजांनी सांगितलं म्हणून. एकदा श्री महाराजांनी त्यांना नेहमीच्या झोपायच्या जागी न झोपता दुसरीकडं झोपायला सांगितलं व त्यांनी ते केलं. म्हणून त्यांचा जीव वाचला, कारण त्या रात्री त्या जागी साथीचे उंदीर पडले व अनेक माणसं गेली. इथं भाऊसाहेबांना जीव वाचण्याचं काहीच कौतुक नाही, इथं का झोपला तर श्री महाराजांनी सांगितलं म्हणून. इतकं आज्ञापालन. इथं झोपल्यामुळं तुमचा जीव वाचला असं कुणी म्हटलं तर ते मला माहीत नाही, असं ते म्हणत.

परमेश्वरानं आपल्याला प्रत्येकाला देह हे शेत दिलेलं आहे. एखाद्याला देहच नाही असं होत नाही. त्या शेताची जर आपण मशागत केली नाही - संतग्रंथ वाचले नाहीत, कुणाचं मार्गदर्शन घेतलं नाही, स्वतः विचार केला नाही, नाम घेतलं नाही तर देव तरी काय करणार ? मानवी प्रयत्न करणाऱ्याला या कृपेचा उपयोग होतोच. ही कृपा सर्वांवर असते.

*

१७. आणीबाणीचे प्रसंग, युद्ध, बाँबस्फोट इ. प्रसंगी साधकाची भूमिका काय असावी ?

साधक असेल तर तो कोणत्याही येणाऱ्या परिस्थितीकडं परमेश्वराची इच्छा म्हणून पाहील. यात पलायनवाद वगैरे नाही. साधक म्हणून सहवेदना, श्रद्धांजली हे त्याचं कर्तव्य आहे. आपल्याकडं स्वधर्म सोडून सगळ्या धर्मांचा त्याग करायला सांगितलं आहे. यावेळी आपला स्वधर्म काय आहे ते पाहावं.

जो ज्या भूमिकेत आहे, त्यानं ते करायचं. जे सैनिक आहेत ते गोळ्या झेलतील, काही फक्त श्रद्धांजली वाहतील. काही धनिक साधक पैशाच्या रूपानं मदत करू शकतील. त्यासाठी सरकारनं मदत करण्याची वाट पाहू नये. प्रत्येकजण उठून काही सीमेवर लढण्यासाठी जाऊ शकणार नाही. नोकरी करणाऱ्यानं आपलं नोकरीतलं काम प्रामाणिकपणे करणं हा यावेळी त्याचा स्वधर्म आहे.

माणसाची जर लढण्याची ठेवण असेल तर मात्र त्यानं ते करावं. लढण्यासाठी जावं. मग तो साधक आहे याच्याशी ते विसंगत नाही. अर्जुनानं कृष्णाच्या सांगण्यावरून असंख्य वध केले आहेत. अगदी गुरूंपासून सर्वांचे. ते कृष्णरीतीनंही केले आहेत. परंतु त्यावेळी त्याचा तो स्वधर्म होता.

सैन्यामधे अगदी सामान्य ड्रायव्हर, आचारी, मदतनीस हेही अत्यंत महत्त्वाचे असतात. सामान्य नागरिकही ज्यांची लढायची तयारी नाही ते आपल्या सैन्याला अशी मदत करू शकतात. देशातल्या प्रत्येक घटकाचं अशा प्रसंगी काम आहे. माझं काम मी ओळखून करणं याला स्वधर्म जपणं असं म्हणतात.

युद्ध, बाँबस्फोट प्रसंगी अस्वस्थता, भीती, असुरक्षितता निर्माण होते. अशा वेळी संतसत्पुरुषांची त्यांच्या काळात झालेल्या महायुद्धांच्या वेळची चित्ताची परिस्थिती पाहावी. श्री महाराजांनी युद्धाच्या वेळी असं म्हटलं होतं की, कोळसा काळा आहे याचं मला दु:ख नाही. या गोष्टी घडत राहाणार.

महाभारताच्या वेळी जी परिस्थिती होती त्या परिस्थितीत आणि आजच्या परिस्थितीत काही फरक नाही. हे कधी बदललेलं नाही. स्वत:ला स्वत:पुरतं बदलण्याची क्षमता फक्त माणसांमध्ये आहे. संत उद्धरून गेले, पण परिस्थिती तशीच राहिली, कारण ती मिश्रणाची आहे. रज, सत्त्व, तम मिसळल्याशिवाय आकारच होत नाही. फक्त काळानुसार त्याचं प्रमाण बदलतं. सत्ययुगातही भांडणं होतीच, पण त्यांचं स्वरूप वेगळं होतं. मिश्रण, बदल व भ्रम या पलीकडं या वस्तुस्थितीत काही नाही.

उदा. एक माणूस दुसऱ्याला समजा म्हणाला, मी तुमची जी जमीन विकत घेतली त्यामधे एक हंडा सापडला आहे. तो तुमचा आहे. तर दुसरा माणूस म्हणतो की, मी ती जमीन तुम्हाला विकली आहे त्यामुळं तिचा अन् माझा संबंध संपला. आता तो तुमचा आहे. अशी ही सत्याच्या प्रभावाखालील भांडणं असत.

आज कलियुगात माझं सगळं तर माझं आहेच, पण तुझंही माझंच आहे किंवा तुझं आहे हे जरी मी लिहून दिलेलं असलं, तरी ते कोर्टात तू सिद्ध कर, अशी माणसं असतात.

माणसाच्या मनाची निकृष्ट अवस्था म्हणजे कलियुग व माणसाच्या मनाची उत्कृष्ट अवस्था म्हणजे सत्ययुग.

हे सारे विचार व विवेक जागे ठेवावे म्हणजे मनही अशा प्रसंगी शांत राहातं आणि योग्य ते कर्तव्यही करता येतं.

*

१८. मृत्यूची भीती काढून टाकायला नामस्मरणाचा कसा उपयोग करून घ्यावा ?

नाम हे आपल्या मनामध्ये एक स्वतंत्र केंद्र आहे. मी जो कुणी आहे, जो सर्व व्यवहार करणारा, बघणारा, उठणारा, बसणारा, काम करणारा आहे तो नाम घेतो. त्यानं नाम घेतलं पाहिजे.

हे केंद्र स्थिर असतं. तिथंपर्यंत नाम पोचवलं पाहिजे. हे कायम राहाणारं आहे. आपल्याला हात आहेत, पाय आहेत, डोळे आहेत हे काहीही असेल किंवा नसेल. समजा, अपघातात यांतील काहीही गेलं तरी नाम घेणारा जात नाही,तो असतोच. मग मी त्यालाच धरून राहिलं पाहिजे.

निसर्गदत्त म्हणतात, 'तुम्ही सूर्याबरोबर राहात नाही म्हणून अंधारात जाता-येता.'

आपण पृथ्वीबरोबर राहातो म्हणून प्रकाशात व अंधारात राहातो. तसं भीतीत का वावरतो ? कारण आमचा नाम घेणारा देहाबरोबर बसला आहे. त्यामुळं देह खालीवर की आमचं नाम खालीवर. देहाला गैरसोय झाली की त्याचा परिणाम नामावर होतो.

अगदी हात नसले तरी नाम घेता येतं, याचा अर्थ नाम घेणारा वेगळा आहे. मग मृत्यूची भीती का बाळगावी ? कारण जे जाणार आहे ते शरीर जाईल, हात जाईल, पाय जाईल. शरीराची एवढी काळजी कशाला करायची ? ज्यानं हे शरीर दिलं आहे तो दुसरं शरीर देईलच. साधा माणूसही कृत्रिम अवयव बसवून काम करू शकतो, तर परमेश्वराची क्षमता मला दुसरा देह देण्याची आहे, हे अमान्य का करावं ?

हे लक्षात आल्यावर हा देह जाण्याची एवढी भीती बाळगण्याची गरज नाही, हे कळेल. शरीर गेलं तरी नाम घेणारा शिल्लक राहाणार आहे.

त्याला दुसरं शरीर मिळण्याची यंत्रणा परमेश्वराकडं आहे. आपण आपलं नाम घेणारं केंद्र स्थिर ठेवावं व मला मुक्त करील एवढं नाम घेत राहावं. मग देहाची गरजच उरणार नाही.

ज्या गोष्टीची गरज नाही ती असली काय अन् नसली काय ! आज देहाची गरज आहे म्हणून तो जाण्याची भीती वाटते. एकच देह आहे ही भावना आहे म्हणून भीती वाटते. नाम घेणारा देह आहे असं आपल्याला वाटतं म्हणून हा प्रश्न आहे.

बाबामहाराज सांगत,'नाम आपले सद्गुरू आत बसून घेत असतात. ते आपण मोजावं.' इथंपर्यंत नामाची रेंज आहे. नाम हे आत चालूच असतं. हे नुसतं बोलणं नाही, अनुभव आहे.

मृत्यू हिरावतो तो फक्त देह हिरावतो. हे जे माझ्यापासून काढून घेतलं जातं ते माझं नसतंच, हे लक्षात ठेवावं. म्हणूनच मी केलेली कर्मं तशीच राहातात आणि पुनर्जन्म घ्यावा लागतो.

गाय आपल्या वासराला जशी बरोबर शोधते तसं प्रारब्ध माणसाला बरोबर शोधत येतं. देह हिरावून घेतला जातो त्यामुळं तो माझा नाही. आता या माझ्या नसलेल्या देहाची आपण किती काळजी करायची ते आपणच ठरवायचं. भाडेकरू घराची किती करेल ? तसंच हे आहे.

जी गोष्ट आपली नाही ती आपल्याला परत द्यावीच लागते. अशी गोष्ट परत केल्यावर हलकं वाटतं. आपण संतसत्पुरुषांचे अंतकाळ तपासावे. आपल्याला लक्षात येईल की, त्यांनी शेवटी शेवटी अमुक बंद केलं, तमुक बंद केलं. कारण ते म्हणतात की, जसं शरीर मला दिलं होतं तसं ते मला स्वच्छ परत करायचं आहे. अंतकाळची तयारी त्यांनी किती उत्तम केली आहे, ते पाहावं.

आपल्याला एखादी गोष्ट ज्याची त्याला परत करायला मिळते

आहे, याचा आनंद वाटला पाहिजे. याच्या खाली रोग आहेत. ते फक्त न्यायला निमित्त आहेत. संतांनी देह कसे ठेवले आहेत, हे जरी पाहिलं तरी आपल्याला मृत्यूची भीती वाटणार नाही.

जे माझं आहे, चैतन्य आहे ते हिरावलं जात नाही, हे लक्षात ठेवावं. जे खरं माझं आहे ते जर हा मृत्यू हिरावून घेऊ शकत नसेल तर भीती कशाची ?

*

१९. जोपर्यंत एखादी गोष्ट अमुक तऱ्हेनं घडून यावी असं वाटतं आहे तोपर्यंत व्यवहारानं योग्य प्रयत्न करणं जरूर आहे. या महाराजांच्या वचनाचा अर्थ कसा लावावा व त्यात कोणतं कर्तृत्व अभिप्रेत आहे?

एखादी गोष्ट अमुक तऱ्हेनं घडून यावी असं वाटतं याचा अर्थ मी स्वत:ला स्वतंत्र मानतो. माझी स्वत:ची मतं, बेत, योजना आहेत. त्या अंमलात यायच्या तर प्रयत्न करण्याची गरज आहे. स्वतंत्र अस्तित्वाचा अंशसुद्धा जोपर्यंत माणसात शिल्लक आहे, तोपर्यंत विशिष्टच कर्मं करण्याची गरज लागते. म्हणून मग ती पुरी करण्यासाठी योग्य प्रयत्न करणं जरूर आहे, असं महाराज म्हणतात.

वास्तविक स्वतंत्र अस्तित्व या अर्थानं कर्तृत्वाचा अंश जरी संपला तरीसुद्धा देहाकडून कर्मं होतच असतात. आपण जागेवर बसलो तरी कर्मं सुरूच असतात. ज्यांची देहाची प्रारब्ध संपली त्यांची, संतांची कितीतरी कर्मं या स्वतंत्र कर्तृत्वाच्या अंशाशिवायसुद्धा सुरू असतात त्यासाठी त्यांना वेगळं काही करावं लागत नाही,कारण भगवंत कर्ता असतो. हे खरं कर्तृत्व.

*

२०. विद्यार्थ्यांना अभ्यास करताना नेहमी एकाग्रतेविषयी सांगितलं जातं. मग तसंच नाम घेणाऱ्याला जपाच्या गुणवत्तेबद्दल का सांगितलं जात नाही ?

परमार्थ करायला मुळात कुणी तयारच नसतं. हल्ली बाहेरचं वातावरणही तसं राहिलेलं नाही. परमेश्वराची कुणाला ओळख नाही, गरज वाटत नाही. तरुणपणी तर याचा काही संबंध नाही असं वाटतं. परमेश्वर मानणं बावळटपणाचं वाटतं. म्हणून मनुष्य तिथंपर्यंत जातच नाही, तो नाम घेतच नाही. यामुळं मनुष्याचं कितीतरी नुकसान आधीच झालेलं आहे.

विद्यार्थ्याचं उदाहरण द्यायचं झालं तर उनाड मुलांकडून आपण जशी मेरिटची अपेक्षा करीत नाही, तसं हे आहे. मुळात जर विद्यार्थी शाळेतच जात नाही, तो शाळेच्या नावाखाली उनाडक्या करतो तर त्याच्याकडून आपण काय अपेक्षा बाळगू ? आपण त्याच्याकडून फक्त शाळेत जायची अपेक्षा बाळगू. तसंच थोडं परमार्थाच्या बाबतीत झालेलं आहे.

अशा विद्यार्थ्याला आपण सांगू की, निदान तू शाळेत तरी जा, तासाला तरी बसत जा, लक्षपूर्वक ऐकत जा. मग हे सगळं तो करतो आहे असं आपल्याला कळलं तर आपण त्याला नक्कीच शाबासकी देऊ. मग पुढं तो जर घरीही अभ्यास करायला लागला ते आपल्यासाठी ते आणखी आनंददायक असतं. मग तो दरवर्षी पास होतो. मग आपण त्याच्याकडून पुढच्या अपेक्षा करतो. हे सगळं क्रमाक्रमानं होतं.

पण जर या मुलाचं वर्षच सुटत नाही, अशी परिस्थिती आहे, तर त्याच्याकडून आपण मेरिटची अपेक्षा करीत नाही. जो सहजतेनं अभ्यास

करतो त्याच्याकडून आपण मेरिटची अपेक्षा करू. तेच आपलं जपाच्या व परमार्थाच्या बाबतीत आहे.

आपण जर गुणवत्तेचा आग्रह जपाच्या बाबतीत ठेवला तर ज्याला थोडीफार जी जपाची बुद्धी झाली आहे तोसुद्धा एकाग्रतेच्या नावाखाली जप करायचं सोडून देईल. कारण प्रथम नामाला बसलं की, एकाग्रता होतच नाही. सर्व संतमंडळी असं म्हणतात की, निदान नाम तरी घ्या. एकाग्रता वगैरे पुढच्या गोष्टी आहेत. तुकोबांसारख्या संतांनीही असं म्हटलं आहे की, 'मनी नसो तर नसो, परी वाचे तरी वसो' निदान तोंडानं तरी नाम घ्या.

संत टप्प्याटप्प्यानं अपेक्षा बाळगतात. म्हणून एकाग्रतेविषयी वगैरे सांगत नाहीत. कारण मूळच कुणी करीत नाहीत. त्यामुळं पुढचं सांगताच येत नाही. अभ्यास हा विषय घेतला तर त्याला दृश्याचे विषय आहेत. त्यांना धरून बसता येतं. नामात कशाला धरून बसणार ? नामात ज्याचं कुणाचं नाम घ्यायचं आहे, तोच अदृश्यात असल्यामुळं तिथं मन एकाग्र होत नाही. त्यामुळं एकाग्रतेचा व पुढच्या गुणवत्तेचा विचार पटकन करता येत नाही. एखादं गणितासारखं काही आव्हान असेल तर मन लगेच एकाग्र होतं.पण नामात सारं अदृश्य असल्यानं एकाग्र व्हायला वाव नाही.

नामात मूळ एकाग्रता, अनन्यता याची गरज आहे, यात शंकाच नाही. ती खूप उच्च स्वरूपाची आहे. त्यामुळं जे इथंपर्यंत आलेत, त्यांनी याचा आग्रह धरावा, हे योग्य आहे.

जपात अदृश्याशी सामना असल्यामुळं आपल्याला कृपेनं, शरणागतीनंच पुढं जावं लागतं, एवढं मात्र खरं.

*

२१. सत्याचा मार्ग धरून जर चाललं तर व्यवहाराशी सांगड घालणं अवघड जातं. यासाठी काय करावं ?

हा प्रश्न बरोबर आहे. कारण ही सांगड घालण्याचाच प्रश्न आपण सनातन काळापासून सोडवीत असतो. कारण जिथं मिश्रण आहे तिथं जेवढ्या गोष्टींचं मिश्रण झालेलं आहे, तेवढ्या गोष्टी अस्तित्वात असणार. त्यामुळं त्यांची एकमेकांशी सांगड ही घालावीच लागणार.अगदी श्रीरामाला, कृष्णालाही त्यांच्या काळात परिस्थितीशी सांगड घालावी लागली आहे. संतांनीही आपापल्या काळात आपल्या पद्धतीनं सांगड घातली आहे.

बाबामहाराज सहस्रबुद्धे यांची एक गोष्ट आहे. त्यांच्या काळात एक गृहस्थ त्यांच्याजवळ दिवसभर बसून होते व त्यांचं वागणं न्याहाळीत होते. कुणी जर बाबामहाराजांना जास्त कटकट करू लागला तर ते म्हणत, 'अरे बाबा, तुला माहिती आहे ना की मला कशाची पेन्शन मिळते ? मला इन्व्हॅलिड पेन्शन मिळते.'

ही इन्व्हॅलिड पेन्शन बाबामहाराजांना त्यांच्या गुरूंनी - बीडकर महाराजांनी मंजूर करून दिली होती. कारण त्यांना बाबामहाराजांना वेगळं, बाजूला ठेवून त्यांच्याकडून कार्य करून घ्यायचं होतं. यावरून त्यांनी कुठल्या प्रकारे सांगड घातली होती ते लक्षात येतं.

मग गोष्टीत पुढं असं झालं की, दिवसभर त्या बाजूला बसलेल्या गृहस्थांना वाटलं की, सर्वांची काहीतरी फसगत झालेली आहे. म्हणून ते बाबामहाराजांना म्हणाले की, 'मी तुम्हाला सकाळपासून बघतो आहे. तुम्ही कसं वागताय ते मी बघतो आहे. तुम्ही तर अजिबात वेडे नाही आहात. तरी सगळे लोक तुम्हाला वेडे का म्हणतात ?'

यावर श्री बाबामहाराज त्यांना म्हणाले, 'काही वेळा लोकांना दूर

ठेवण्यासाठी हे सारं करावं लागतं.'

थोरल्या टेंबे स्वामिमहाराजांचीही एक गोष्ट आहे. ते खूप रागीट म्हणून प्रसिद्ध होते. त्यांच्या बरोबरीच्या लोकांनी एकदा त्यांना विचारलं की, 'आपला राग आम्हाला खरा वाटत नाही.' त्यावर ते म्हणाले की, 'हे खरं आहे. बाहेरची परिस्थिती व माणसं बघून आम्हाला क्रोध दाखवावा लागतो. तो खरा नसतो.'

समाजात जरुरीपुरतंच राहावं, मिसळावं. प्रपंच हा खेळ आहे हे समजूनच वागावं. कारण समाज हा खेळासारखेच नियम पाळीत असतो. शेवटी काय जगाची मिरवणूकच चालली आहे, त्यात सामील होणं चांगलं. उगीच आपण बाजूला उभं राहाण्यात काही अर्थ नाही. नाहीतर लोक आपल्याकडंच बघत बसतील. त्यापेक्षा आपण सामील झालो की, सगळे पुढं तरी बघतील. म्हणजे मग आपलं काम होतं.

हे सारं 'वदनी कवळ घेता...' म्हणण्यासारखं आहे. एकदा वदनी कवळ घेता एवढे तीन शब्द मोठ्यानं म्हटले की, मग पुढचा श्लोक लोक पूर्ण करतात. कारण त्यांना लवकर जेवायचं असतं. एवढंच जगाचं महत्त्व आहे. 'खेळाऐसा प्रपंच मानावा' ही श्री महाराजांनी घालून दिलेली सांगडच आहे. प्रपंच सुधारण्याची अपेक्षा ठेवू नये.

म्हणजे एखाद्याला समाजाची सुधारणा वगैरे करायची असेल, समाजकार्य वगैरे करायचं असेल त्यानं ते अवश्य करावं. पण त्यातून काही अपेक्षा ठेवू नये. कारण आपण हट्टानं काही कार्य केल्यावर शेवटच्या टप्प्यात जरी कुणी भ्रष्टाचारी मनुष्य भेटला तरी आधीचं सगळं वाया जातं. त्यामुळं ते ज्या पद्धतीनं असेल ते राहू द्यावं. अशा माणसांच्या चुकांना माणूस जरी शिक्षा करणार नसेल तरी निसर्ग करीलच, ईश्वर करीलच.

कारण ती सत्त्व, रज, तमाची मिश्रणं आहेत. शेवटी हेही लक्षात

ठेवावं की, सत्याचा मार्ग त्रासाचा असतो. तलवारीच्या धारेसारखा असतो. चालताना जरी तो त्रासाचा असला तरी अंतिमत: तो आपल्याला मुक्त करणारा असतो. त्यामुळं जो सत्यानं चालतो त्याला काळजी करावी लागत नाही. विवंचना करावी लागत नाही.

असत्याच्या मागं काळजीचा रोग लागलेला असतो. आज असा माणूस सिंहासनावर बसला तरी उद्याच्या तुरुंगाची भीती त्याला टोचत असते. प्रामाणिक गरीबाला मात्र उशाला दगड घेऊनही निश्चिंत झोप लागते. कारण सत्य सौख्याचं असतं.

सत्य सांभाळणाऱ्याला सत्याचा जो स्वामी म्हणजे परमेश्वर - तो सांभाळीत असतो, हे लक्षात ठेवावं. म्हणजे मग सांगड घालत असताना आपल्या मनाला खात्री राहील, स्थैर्य राहील.

*

२२. साधना कशासाठी करायची असते ?

साधनेला आपल्याला वाव आहे आणि तिची गरजही आहे म्हणून साधना करायची असते. आपल्याला काही ध्येय असेल तर हा प्रश्न उद्‌भवतो. ध्येयच नसेल तर साधनेचा प्रश्नच उद्‌भवत नाही. मग ते ध्येय आत्मज्ञान असेल वा आनंद असेल, समाधान असेल. ही ध्येयं जर असतील तर प्रत्यक्ष साधनेशिवाय मार्ग नाही.ध्येयावर हे सर्व अवलंबून आहे.

*

२३. जगामध्ये चांगली स्थिती येणं हे कधी होणारच नाही का ?
हे अशक्य आहे का ?

हे अशक्य आहे. मात्र जगातील चांगल्या-वाईटाचं प्रमाण फक्त बदलत असतं. जगात सत्त्व, रज, तम या गुणांचं मिश्रण असतं. सत्ययुगात सत्त्वाचं प्रमाण जास्त होतं. पण एका ठरावीक मर्यादेच्या पुढं ते जाऊ शकत नाही. जगात या गुणांचं मिश्रण ठरावीक प्रमाणात असतं. ते तसंच राखणं हे परमेश्वराचं काम असतं.

*

२४. जर असं असेल तर सामाजिक कार्याला काही महत्त्व आहे का?

आपण सृष्टीचे एक भाग आहोत. सृष्टी जेव्हा आकाराला आली तेव्हा मिश्रणानंच आली. तिच्यामध्ये सत्त्व, रज, तम तिन्ही घटक राहाणारच. जगाच्या वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या काळी त्यांची प्रमाणं फक्त वेगळी असतील.

या सृष्टीतल्या झाडांमध्ये विविधता आहे, प्राण्यांमध्ये विविधता आहे. ती विविधता काढून एकाच प्रकारची झाडं, प्राणी हे करणं शक्य नाही. ही विविधता राहाणारच. या सगळ्यांना अस्तित्व आहे. अशोकाच्या झाडाची उंची पेरूच्या झाडाला येणार नाही. अशोकाची उपयुक्तता अशोकाच्या जागी असेल आणि पेरूची पेरूला असेल.

आता चांगल्या सामाजिक व व्यक्तिगत स्थितीचा विचार करू. समाज शुद्ध होणं हे कल्पनेतही शक्य नाही. पण व्यक्ती शुद्ध होणं हे शक्य आहे. सर्व काळात जगातील सर्वच लोक चांगले किंवा सर्वच लोक वाईट असं होणं शक्य नाही. काहीतरी आकाराला येण्यासाठी मिश्रण

असण्याची जरुरी आहे. पंचमहाभूतं एकत्र येऊन सृष्टी बनते. काहीतरी आकाराला यायचं असेल तर मिश्रण व त्यांचं योग्य प्रमाण गरजेचं आहे.

समाज हे बाह्य मिश्रण आहे. त्यात सत्त्वाचं प्रमाण चांगलं राहिलं तर स्वास्थ्य राहातं. ते राहावं म्हणून जी सामूहिक कार्यं केली जातात त्यांना सामाजिक कार्यं म्हणून जरूर महत्त्व आहे. पण त्यानं जगातले सर्व प्रश्न सुटतील असं वाटणं, हा भाबडेपणा आहे. आपण परिस्थितीला सुसह्यता आणण्याचे प्रयत्न करावेत, हे ठीक आहे आणि त्यासाठी व्यक्तिगत शुद्धता लागते आणि ती मात्र पूर्णपणे शक्य गोष्ट आहे.

आपली अंतर्गत मिश्रणं सोडवणं हा आपला प्रश्न आहे. ती शुद्ध करणं आपल्याच हातात आहे. त्याची पूर्ण शुद्धी शक्य आहे. व्यक्ती परमात्मस्वरूप होणं शक्य आहे. पण समाजाची शुद्धी शक्य नाही कारण ते मिश्रण आहे.यात निराश व्हायचं कारण नाही,हा समजुतीचा प्रश्न आहे.

*

२५. आपल्याला कुणी नमस्कार करीत असेल तर काय करावं ?

एक - सामान्यत: अशांना मनापासून प्रतिनमस्कार करावा. दोन - ती व्यक्ती वयानं खूप लहान असेल व आशीर्वादयोग्य असेल तरीही मनानं नमस्कार व प्रत्यक्षात आशीर्वाद द्यावा. तीन - आपल्याला केलेला नमस्कार हा आपल्याला नसून आपल्यात कदाचित परमेश्वराच्या कृपेनं जे काही चांगलं असेल त्याला तो नमस्कार आहे, हे लक्षात ठेवून, ते चांगुलपण वाढवायच्या प्रयत्नाला लागावं. चार - मतलबी नमस्कार ओळखून सावध व्हावं.

*

२६. विकारांचं आपल्या जीवनातलं स्थान काय ?

जशी पंचमहाभूतं भगवंताची आहेत, तसे षड्विकारही भगवंताचेच आहेत. ते आपल्याला कामासाठी वापरायला दिलेले आहेत. इच्छा, लोभ, राग, मत्सर हे विकार आहेत. याबद्दल श्री महाराज म्हणत,'आपल्या जीवनात विकार आहेत, त्याअर्थी त्यांना स्थान असणारच. आपण विकार योग्य रीतीनं वापरायला शिकत नाही.'

उदाहरणार्थ, इच्छा हा विकार पाहू. इच्छा ही दुधारी शस्त्राप्रमाणं आहे. आपल्याला जर इच्छाच नसेल तर आपण अन्नाचा कणही खाऊ शकणार नाही. पण तेच जर जास्त इच्छा असेल तर जास्त अन्न खाऊन स्वास्थ्य जाईल, चुकीचं खाऊन मरणही येईल.

तसंच रागाच्या बाबतीत. राग येणं वेगळं आणि राग आणणं वेगळं. राग आणणं हे म्हणजे आपण विकार वापरणं आहे आणि राग येणं हे म्हणजे विकारानं आपल्याला वापरणं आहे. राग आणता येत असेल तर आपली कामं व्यवस्थित पार पडतात. ज्या ठिकाणी रागाची गरज असते तिथं तो आपल्याला आणता आला तर त्याचा आपल्याला दोष लागत नाही. कारण ते आपलं कर्तव्य असतं. एखाद्या कर्माचा दोष लागणं हे त्या कर्माच्या हेतूवरून ठरतं.

पण आपलं मात्र उलटच होतं. आपले विकारच आपल्याला वापरतात. यावरून मालक कोण आणि नोकर कोण हे आपलं आपल्यालाच ठरवता येईल.

आता मत्सराचा विचार करू. दुसऱ्याचा उत्कर्ष पाहिल्यावर आपल्या मनात मत्सर निर्माण होतो.एखादी वस्तू आपल्याकडं नाही आणि दुसऱ्याकडं आहे असं दिसलं की,त्याच्याबद्दल मनात मत्सर निर्माण होतो.

पण हेही लक्षात घ्यावं की, मत्सराचा योग्य वापर करणं म्हणजे प्रेरणा घेणं आहे. कारण तुमच्या मनातला मत्सर तुम्हाला ती वस्तू महत्त्वाची आहे आणि तुमच्याकडं ती नाही याची सूचना चांगल्या दृष्टीनं देऊ शकतो. त्यामुळं आपल्याला हेही कळू शकतं की, आपणही अशी वस्तू मिळवू शकतो व आपली प्रगती करू शकतो.

मत्सराचा अभाव असेल तर योग्य वापरही करता येणार नाही. मग तुम्हाला हे कळणार नाही आणि असं झालं तर तुमची प्रगतीही होणार नाही. जर उलट झालं म्हणजे मत्सरच जर तुम्हाला वापरायला लागला तर दुसऱ्याकडं असलेली गोष्ट आपण मिळवून प्रगती करण्याचं बाजूलाच राहातं आणि त्याच्याकडची ती गोष्ट कशी नाहीशी होईल, कशी बिघडेल, त्याचं वाईट कसं होईल याचाच विघातक विचार मनात सुरू होतो. ज्यानं अंतिमतः आपलं स्वतःचंच नुकसान होतं.

लोभाच्या बाबतीत विचार करायचा झाला तर लोभ हे इच्छेचंच स्वरूप आहे. सारखं एकाला एक वस्तू अकारण जोडत राहणं म्हणजे लोभ. हा लोभ जर पैशाकडं लागला, प्रमाणाबाहेर गेला तर असमाधान देईल. पण परमेश्वराकडं जोडला की भक्ती बनेल, समाधान देईल.

विकार हे अनैसर्गिक समजून त्यांना तशी वाईट ट्रीटमेंट देऊ नका. त्याचा आपण अनैसर्गिक वापर करतो. विकाराचा सुजाणतेनं, समजून घेऊन वापर करावा. विकार हे नैसर्गिकच आहेत. ते असण्यानं आपलं काही बिघडतही नाही. विकारांच्या योग्य वापराचं कौशल्य शिकणं गरजेचं आहे. म्हणजे त्यांचं जीवनातलं उपयुक्त स्थान लक्षात येईल.

*

२७. श्री गोंदवलेकर महाराजांचं नामाचं प्रेम प्रचंड असतानाही त्यांनी त्यांचा एका शब्दातला परमार्थ 'सावधानता' असा का सांगितला ?

हे खरं आहे. याचं उत्तर मी एका उदाहरणानं देतो. समजा, आपल्याला एका गावाला जायचं आहे. त्यासाठी कसं जायचं, केव्हा जायचं, कोणत्या रस्त्यानं जायचं याला पर्याय असू शकतात. पण घरातून बाहेर जायचं याला काही पर्याय असू शकत नाही. आपण जिथं राहातो तिथून बाहेर पडण्याला तर काही पर्याय नाही.

सावधानतेचं असंच आहे. ज्या देहात मी राहातो, जी देहबुद्धी माझ्या ठिकाणी नकळत बळकट होत जात असते, नुकसान करीत असते, त्याबद्दल सावधान होणं हे महत्त्वाचं आहे. अगदी नाम जरी घ्यायचं झालं तरी माणूस त्याबद्दल सावध पाहिजे.

श्री अंबुराव महाराजांची एक गोष्ट आहे. त्यांचं दासबोधातल्या ओवीवर एकदा विवरण चाललं होतं. भगवंत सर्वत्र भरलेला आहे वगैरे. तेव्हा ते म्हणाले, 'मी विवरण करतो आहे व तुम्ही ते ऐकता आहात, पण यात नामाची आठवण मात्र कुणाला नाही.'

त्यांच्याकडं याबाबतीतली सावधानता इतकी होती की, भगवंताचं विवरण करतानाही त्याच्या नामाचं स्मरण त्यांना होतं. जे आपल्याकडं नाही. म्हणून सावधानतेशिवाय कुठलंही साधन होणार नाही. त्यासाठी सावधानतेला एवढं स्थान श्रींनी दिलेलं आहे.

*

२८. एकच नाम घेतल्यानं ते खोलवर जातं व मुरतं असं म्हटलं जातं. मग संतछायेतील उपासनेच्या वेळी आपण वेगवेगळी नामं घेण्याचा हेतू स्पष्ट करावा.

नामं आपल्याला वेगवेगळी वाटतात. काहींना त्यात एखादं नाम कमी जास्त आहे असं वाटतं. पण खरं म्हणजे मूळ नामांमध्ये भेद नाही. प्रत्येक नाम आपल्या परीनं श्रेष्ठच आहे. ते एकाच भगवंताचं असल्यानं त्यात आपपर भाव नाही. फक्त आपली जशी विविधता आहे तशी देवांचीही आहे. त्या त्या देवतेचं नाम हे तिच्यापर्यंत पोचण्याचा मार्ग आहे.

त्या नामांमध्ये कुठलंही नाम कमी किंवा जास्त नाही. त्यात भेदभाव मुळीच नाही. पण आपणच पंथभेद व इतर कटुता निर्माण केली आहे. त्यामुळं सर्व संतांनी आपल्या वाङ्मयात, उपदेशात याबद्दल सांगितलेलं आहे. अनेकदा आपल्याला असं दिसतं की, एका पंथाचे संत दुसऱ्याच पंथाची उपासना करायला सांगतात. उदा. श्री माणिकप्रभू दत्तपंथीय अवतार असूनही रामनामाबद्दल सांगतात.आपल्याला जे भेद वाटतात ते वाटू नयेत व तितकाच आदर दुसऱ्याच्या पंथाबद्दलही वाटावा, म्हणून हे त्यांनी केलेलं आहे.

आता आपण असा विचार करू की, आपण रामनाम घेणारे आहोत, तरी आपल्याला इतर नामं घेताना कमी आनंद होतो का ? कधीच नाही. ते नामस्मरण करतानाही आपण तितकंच तल्लीन असतो. हे जर लक्षात आलं, तर भक्तीमध्ये आपल्याला पुढं जाता येईल.

हा संदेश आपण सामुदायिकरित्या नाम घेतो तेव्हा सगळीकडं पोचतो. वैयक्तिकरित्या मात्र आपण एकच नाम घ्यावं. त्यामुळं ते खोलवर जातं, मुरतं. *

२९. योगमार्ग, भक्तिमार्ग सर्व मार्ग परमेश्वराकडंच नेतात. योगमार्गात दिवसेंदिवस शरीर बळकट होत जातं. पण भक्तिमार्ग हा प्रभावी असूनही कुठल्यातरी कारणानं भक्तिमार्गात देहभोग सोसावे लागतात. या देहभोगांना भक्तिमार्गात काही संरक्षण नाही का ?

योगमार्गात देहाशी आयडेंटिफिकेशन किंवा संबंध ठेवून त्याचा मार्ग सुरू होतो. भक्तिमार्गात देहाचा संबंध सोडून डिसआयडेंटिफिकेशन करून मार्ग सुरू होतो. देहाशी असलेलं तादात्म्य भक्तिमार्गात सोडायचं असतं, तर योगामार्गात देह हाताशी धरून देवाकडं जायचं असतं.

भक्तिमार्गात आपलं देहाशी असलेलं तादात्म्य सोडून ते भगवंताशी जोडलं की, मग देहाला दुःख आहे की नाही हा प्रश्न उद्‌भवतच नाही. योगमार्गात देहाची तंदुरुस्ती राखण्यासाठी खाणं, पिणं (आहार, विहार), व्यायाम सांभाळावे लागतात. भक्तिमार्गात देहाशी असलेलं तादात्म्य सोडणं हेच मुळात साधन आहे. योगमार्गात देहाला कष्ट द्यावे लागतात, त्यामुळं बळकटपणा येतो, तर भक्तिमार्गात देहभोग आहेत.

योगात देह सुखात ठेवता येत नाही. उदा. हठयोग. यात जी खेचरी विद्या आहे, त्यात जीभ उलटी करून टाळूच्या आतल्या बाजूला म्हणजे आत अमृतबिंदूचा स्राव होतो तिथं लावायची असते. त्याला जिव्हाच्छेदनदोहन म्हणतात. त्यात वस्तऱ्यानं थोडी थोडी जीभ कापायची असते. म्हणजे ती हळूहळू मोकळी होते व उलटी फिरवता येते.

मग पुढं पुढं ती टेकते. इकडं श्वासाच्या अवरोधाचाही अभ्यास लागतो. हे सिद्ध व्हायला बरीच वर्षं लागतात. त्यासाठी बरंच देहदुःख भोगावं लागतं. योगमार्गात हे देहदुःख पत्करलेलं असतं आणि

भक्तिमार्गात हे वाट्याला आलेलं असतं.

योगमार्गात आपण जे ध्येय ठरवलं आहे, त्यासाठीचा त्रास सहन करावा लागतो. साधं पद्मासन म्हटलं तरी त्यात काय कमी त्रास आहे ? भक्तिमार्गात देहाशी असलेलं तादात्म्य सोडणं हेच साधन असल्यानं देहाच्या वाट्याला आलेले कष्ट, कष्ट न वाटणं हीच त्याच्यातली अवघड गोष्ट आहे.

भक्तिमार्गात देहाशी तादात्म्य नसल्यामुळं देवानं दिलेलं सुख किंवा दु:ख दोन्ही गोष्टींचा भक्ताला काही त्रास होत नाही. त्याचं त्याला काही वाटत नाही. उदा. समजा आपला शेजारचा माणूस आजारी पडला त्याचा आपल्याला किती त्रास होतो ? तेवढाच त्रास स्वत:चा देह जरी आजारी पडला तरी भक्ताला होतो.

उलट योगमार्गात देह हे साधन असल्यामुळं त्याला जर त्रास झाला तर साधनच होणार नाही. भक्तिमार्गात तुम्हाला देवाचं संरक्षण आहे. देव आपलं प्रारब्ध आपल्याला भोगायला लावतो, पण त्यासाठीची सगळी मदत तो पुरवतो. आजारपण दिलं तरी त्याबरोबर डॉक्टर देतो, माणसं जोडून देतो.

पण इथं हे लक्षात घेऊ की, खरा भक्त देवाकडं संरक्षण मागतच नाही. विवेकानंद कालीमातेकडं लौकिक असं काही मागायला गेले होते. पण तिथं गेल्यावर त्यांना काही मागायची बुद्धीच झाली नाही. हे भक्ताच्या शुद्ध बुद्धीचं लक्षण आहे. काही मागणं ही अशुद्ध बुद्धी आहे.

योगमार्गात जसं जसं तुम्ही पुढं जाता तसं सिद्धीच्या रूपानं तुम्हाला फळं मिळतात. ही वाटेतली स्टेशनं असतात. भक्तिमार्गात तुमच्या वाट्याला काही येत नाही. कारण काही न मिळण्याचाच तो मार्ग आहे. शेवटी एकदम भगवंतच मिळतो.

इथंही भक्ताचा हात लागून कदाचित एखाद्याचं दुःख दूर होईल, पण भक्त ते करीत नाही. कारण मुळात त्याचं ऑपरेशन देवानं भक्ताच्या हातात ठेवलेलंच नसतं. त्यामुळंच भक्त हे ऑपरेट करू शकत नाही. मुळात त्याचा अहंकार दूर करूनच हे भगवंतानं घडवलेलं असतं. त्यामुळं पुढचे धोके आपोआप टळतात.

योगमार्गात पुढं अहंकार बळकट होत जाण्याचा धोका असतो. अर्थात सावध राहाणाऱ्यांचा अहंभाव कमी होऊ शकतो. भक्तिमार्गात जितका अहंकार कमी होत जातो तितकी प्रगती झाली, असं मानायला हरकत नाही. भक्तीत भगवत्प्रेमाचा जो आनंद मिळतो, तो योगात क्वचितच मिळतो. भक्तीत निरहंकारपणाचा आनंद आहे.

योगी माणूस - मला हे कसं साधत नाही - या जिद्दीनं बसलेला असतो व ते नाही साधलं तर दुःखी होतो. भक्तिमार्गात मात्र भक्त - मला हे साधत नाही, तूच मला साधून दे - या भावनेनं परमेश्वराकडं जातो. साधलं तर त्यानंच साधून दिलं असं म्हणतो. त्यामुळं मुळात देहतादात्म्यच सोडायचं असल्यानं देहदुःखाला स्थान नाही.

भक्तिमार्गात भक्त बरा असला तर जास्त बसून साधन करून आणि बरा नसला तर पडून राहून जमेल ते स्मरणाचं साधन करून ध्येय साधतोच. त्याला संरक्षण किंवा बळकटपणाची गरजच उरत नाही. मागणंही नाही आणि गरजही नाही.

अर्थात या साऱ्यांत योगमार्ग हा मार्ग म्हणून कमी आहे असं म्हणण्याचा अभिप्राय नसून दोन्हींतली देहदुःखाच्या बाबतीतली भूमिका फक्त आपण पाहिली आहे, एवढं लक्षात घ्यावं. मार्ग आपापल्या परीनं श्रेष्ठ आहेतच.

*

३०. परमार्थमार्गावर अर्ध्यावर गेल्यावर पुढं जाणारे साधक फार थोडे असतात, असं श्री महाराजांनी म्हटलं आहे. यामध्ये अर्धा टप्पा कुठला आणि त्यापुढं जाण्यामध्ये कोणते अडथळे असतात ?

परमार्थामध्ये कुठलाही मार्ग जरी अवलंबला तरी त्यात अर्धा टप्पा हा असतोच. उदा. कर्ममार्ग. कर्ममार्गाचा कर्मयोग व्हायला पाहिजे. आधी कर्मं असतात योग नंतर होतो. नुसतीच कर्मं झाली तर निम्मं काम झालं. कृष्णमूर्ती म्हणत, जर माणूस सिनेमाला गेला तर ते एक कर्मं झालं. त्यात तो दोन तास तल्लीन झाला, उद्या कदाचित निरूपणात, गाण्यात तो तल्लीन होईल. आता प्रश्न पुढचा मार्ग चालण्याचा आहे.

'ज्याला वळे त्याला कळे' हा विचार केला तर कळणं हा पहिला निम्मा टप्पा आहे व वळणं हा पुढचा टप्पा आहे. ज्ञानमार्गात कळतं, पण वळण्याची वाटचाल पुढची आहे.

भक्तिमार्गात भाव, भक्ती आहे. ती नसेल तर माणूस प्रपंचही करू शकणार नाही. आत्ता तो भाव फक्त प्रपंचासाठी आहे. तर बदल असा पाहिजे की, तो प्रपंचाच्याऐवजी भगवंतासाठी असला पाहिजे. त्यात टिकणं हे पुढचं निम्मं काम आहे. अर्थात ते काम स्वत:ला बदलण्याचं असतं. म्हणून ते करायला तयार असणारे लोक कमी असतात, असं महाराज म्हणतात.

पदोपदी महाराज, महाराज म्हणायचं आणि आपण आहोत तसंच प्रपंचातल्या सुखसोयीत राहायचं हे असं काम करायलाच खूप लोक तयार असतात. म्हणून श्री महाराज म्हणाले की, परमार्थमार्गावर अर्ध्यावर गेल्यावर पुढं जाणारे साधक फार थोडे असतात.

*

३१. प्रार्थनेला मोठं महत्त्व आहे असं म्हणतात. दुसऱ्याचे आजार बरे व्हावे म्हणून, व्यसन सुटावं म्हणून प्रार्थना करावी का ? अशी दुसऱ्यासाठी प्रार्थना केल्यानं नामसाधना करणाऱ्या व्यक्तीची नामसाधना खर्ची पडते का ?

प्रार्थनेला मोठं महत्त्व आहे, ते का ते प्रथम समजून घेऊ. मानवी प्रयत्नांना मर्यादा आहेत.ते केल्यावर विश्वात्मक असीम शक्तीची मदत मागणं म्हणजे प्रार्थना.म्हणून प्रयत्न झाले की प्रार्थना येते. समजा, एखाद्या आजारी माणसासाठी आपण प्रार्थना करणार आहोत. त्याआधी आपण त्याला बरं करण्याचे प्रयत्न केले आहेत ना ते पाहावं. त्यानंतर प्रार्थना करावी. तिचा उपयोगही होतो.

आपण ज्या व्यक्तीसाठी प्रार्थना केली तिच्याकडून आपल्याला काही स्वार्थ साधायचा आहे का, यावर आपली साधना खर्ची पडते की नाही हे अवलंबून आहे. आपण जर नि:स्वार्थीपणे प्रार्थना केली असेल तर त्यात आपली साधना खर्ची पडत नाही. कारण आपण त्याच्या कल्याणासाठी प्रार्थना केली आहे.

आपल्याकडं विश्वात्मक प्रार्थना त्यासाठी आहे. आपण कोणासाठीही प्रार्थना करू शकतो. उदा. निर्व्यसनता ही सगळ्यांसाठी करण्याची प्रार्थना आहे. त्यात ती विशिष्ट व्यक्ती येतेच.

आपल्या स्वार्थाचा संबंध आला तर साधना थोडी खर्ची पडेल. कारण मग आपण आपल्यासाठी ते काम करून घेतल्यासारखं होईल. आपण प्रार्थना करताना - त्या व्यक्तीच्या कल्याणाचं असेल ते व्हावं - अशी करावी. म्हणजे स्वार्थाचा दोष लागत नाही.

नाम घेणाऱ्या व्यक्तीच्या शब्दाला थोडंफार तरी त्याच्या साधनेमुळं

वजन आहे. म्हणून नाम खर्ची पडण्याची शक्यता आहे. समजा, आपण एखाद्याला बरं वाटावं म्हणून प्रार्थना केली तर त्याला बरं वाटून त्याच्या अकल्याणाचंही व्हायची शक्यता असते. त्याच्या प्रारब्धात हस्तक्षेप व्हायची शक्यता असते. त्यामुळं प्रार्थना करताना - त्याच्या कल्याणाचं आहे ते करा - असं म्हणणं चांगलं.

प्रार्थना जितकी शुद्ध करता येईल तेवढी ती करावी. कल्याणाचं करा असं म्हणण्यानं आणि नि:स्वार्थीपणे प्रार्थना करण्यानं ती प्रार्थना शुद्ध होते.

*

३२. साधनेत प्रगती होते की नाही हे कसं कळतं ?

साधनेतली प्रगती ओळखण्यासाठी अनेकांनी वेगवेगळ्या खुणा दिलेल्या आहेत. पण त्याची खरी खूण आपल्या मनात असते. मनाची जी स्थिती आहे तिच्यावरून बरेच वेळा माणसाला प्रगतीची कल्पना येऊ शकते.

उदाहरणार्थ पाहायचं तर अत्यंत मनाविरुद्ध होऊनसुद्धा आनंदी असणं, देहदु:खं प्रसन्नतेनं सोसणं, पैशाच्या नुकसानी शांतपणे घेणं, कशातही न अडकणं, फार वेळ विषय मनात न राहाणं या साऱ्या प्रगतीच्या खुणा आहेत. सर्व जग आपण किती सहजतेनं घेऊ शकतो यावर ते अवलंबून आहे. निदान आपण प्रपंच तरी किती सहजतेनं घेतो यावर साधनेची प्रगती कळून येते.

*

३३. शिक्षणपद्धतीची सद्य:स्थिती लक्षात घेता शिक्षणाबद्दल विद्यार्थ्यांची व पालकांची भूमिका काय असावी ?

मुळात शिक्षण कशाला म्हणावं हा प्रश्न आहे. ज्यानं माणसाची मुक्तता होते किंवा ज्यानं माणसाला आनंद मिळतो त्याला शिक्षण म्हणावं. जे त्याला बंधमुक्त करतं ते शिक्षण. माणसाकडं असलेल्या सर्व मूलभूत, चांगल्या व विधायक कुवती पूर्णत्वाला नेणं, हे खरं शिक्षण आहे.

असं शिक्षण आज तरी मिळत नाही. त्यामुळं हे विद्यार्थ्याचं वेगळं कर्तव्य असावं. सध्या असलेला अभ्यासक्रम विद्यार्थ्यानं चांगल्यात चांगल्या रीतीनं पूर्ण करावा. आजचं शिक्षण म्हणजे फक्त बाह्य कौशल्य प्राप्त करून देणं. म्हणजे जेणेकरून जास्तीत जास्त पैसे मिळवण्यासाठी ते उपयोगी पडेल तेवढं देणं. ही त्याची मर्यादा आहे.

हा इंग्रजांनी त्यांच्या राज्याच्या सोयीसाठी निर्माण केलेला सनदी अधिकारी व नोकरांचा कारखाना आहे. आपण तो तसाच चालू ठेवला हे आपलं दुर्दैव आहे. पण तो मोठा विषय. कुणाला कळेल तेव्हा बदलेल.

आजच्या शिक्षणानं चांगुलपण निर्माण न होता वाईटपण निर्माण होतं. माणूस गर्विष्ट, अहंकारी होतो.नम्रतेचा अभाव निर्माण होतो. विद्यार्थ्यानं सध्याचं शिक्षण घेताना खरं शिक्षण काय आहे ते लक्षात ठेवावं. ते वेगळं आणि व्यापक असल्यानं ते कसं मिळवता येईल, ते बघावं.

मी एकदा एक प्रयोग केला. शंभर पदवीधर माणसांची यादी मागितली व शंभर चांगल्या लोकांची यादी मागितली. पहिली यादी लगेच पुरी करता आली तर दुसऱ्या यादीच्या वेळी विचार करावा लागला. आजच्या शिक्षणामुळं ही अवस्था झालेली आहे.

आजचं शिक्षण कर्तव्य म्हणून पुरं करावं. ज्याला शिक्षण म्हणजे

काय आहे ते कळलेलं आहे, त्याला हे कर्तव्य पुरं करणं सोपं आहे. त्यानं बाकीचं शिक्षण घ्यावं ज्यामुळं त्याला चांगलं होता येईल, चांगलं वागता येईल, समाजाशी कसं वागावं ते कळेल.

हे शिक्षण आता असल्या इंग्रजी गुलामगिरीच्या शिक्षणपद्धतीत मिळणार नाही. निसर्गात, ज्ञानेश्वरीत, संतांकडं नि नि:स्वार्थी समाजसेवकांकडं मिळेल. ज्याला जिथं ते सोयीचं असेल तिथं त्यानं घ्यावं, पण अवश्य घ्यावं.

नाहीतर नुसते पदवीधर निर्माण होत राहतील, सुशिक्षित, सुजाण, समंजस लोक नाही. मग स्वार्थाचा नि अस्वास्थ्याचा सुकाळ होईल. तो आज आपण अनुभवतो आहोत.

*

३४. भावाचा भावनिकतेशी कितपत संबंध आहे ?

भावनिकतेला थोडी नकारात्मक झाक आहे. अशा प्रकारची भावनिकता भक्तीसाठी आवश्यक आहे असं नाही. भावनिकता ही भावाशी निगडित आहे.कारण मुळात भाव आहे म्हणून भावनिकता येते.पण नुसतीच भावनिकता वाढली तर मनुष्य देवासाठी रडत राहील, पण देव सांगतो ते करायचंच राहून जाईल. परमार्थात भावनिकतेची गरज कमी आहे. भावाची गरज मात्र आहे. नाहीतर माणसाला आपल्या गुरूंबद्दलच काय देवाबद्दलही काही वाटणार नाही. मग प्रगतीची शक्यता नाही. सुदैवानं भाव हा माणसाच्या ठिकाणी सहजपणे असतोच. अगदी कठोर वाटणाऱ्या माणसातही कोरड्या माळावरही खोल झरा असावा तसा भाव असतो. तो कधीतरी व्यक्त होतो, एवढंच.

३५. प्रपंच हा मोठा प्रश्न असून त्याचं निश्चित उत्तर कधीच सापडत नाही व सोडूनही देता येत नाही. प्रपंचाच्या अशा उत्तर न मिळालेल्या प्रश्नामुळंच आपण अपयशी ठरतो. अशा वेळी काय करावं ?

प्रपंच हा प्रश्न नसून आपण केलेल्या कर्मांचं ते उत्तर आहे. एक छोटं उदाहरण पाहू. गाईगुरांना दोरीनं खुंट्याला बांधून त्यांचे मालक आपापल्या कामाला जातात तेव्हा जेवढी त्या दोरीची लांबी असते त्या लांबीपर्यंतच फिरण्याचं स्वातंत्र्य गुरांना असतं. त्याप्रमाणं आपली आपल्याला बांधलेल्या दोरीच्या लांबीविषयी सारखी तक्रार चालू असते. त्यामुळं प्रपंचात असे प्रश्न निर्माण होतात.

पूर्वजन्मांच्या वासनांचे जे परिणाम शिल्लक राहिले तेवढी आपल्या या दोरीची लांबी आहे. हिंडण्याफिरण्याच्या स्वातंत्र्यानं आपण जी नवीन कर्म करून ठेवतो त्यामुळं हा प्रश्न आहे. त्यामुळं - नवे कर्म नको आता - हे जाणून आपला उद्धार आपणच करून घ्यावा.

आपलं आयुष्य कमी असून आपल्याला सोडवायचे प्रश्न वेगळे आहेत याचं भान ठेवावं. काही प्रश्नांना उत्तरं नसतात. असे प्रश्न सोडून द्यावेत हे अत्यंत योग्य आहे. उदा. जगाची उत्पत्ती कशी झाली वगैरे. आपल्याला जसं एकट्याला करमत नाही तसं भगवंतालाही करमत नाही. त्यामुळं विश्वाची निर्मिती झाली, असं वेदान्ताचं म्हणणं आहे.

आपल्याला दुःख आहे हा खरा प्रश्न आहे. प्रपंच हा अपूर्ण आहे. तो अपूर्णच राहील. म्हणून त्याला योग्य स्थान देऊन खरं पूर्णत्व परमार्थात आहे हे शोधायला त्याचा वापर कसा करता येईल, हे पाहावं.

*

३६. मी काही दिवस एक नाम घेतो त्यानंतर नाम बदलतो. पुन्हा काही दिवस ते नाम घेतो. त्यानंतर पुन्हा दुसरं नाम घ्यावं असं वाटतं. हे योग्य आहे काय ?

यात जर आपला आनंद टिकून राहात असेल तर काही हरकत नाही. उगाच प्रपंचाच्या बदलासारखं मात्र ते करू नये. आपण एका देवतेचं नाम घेता, काही वर्षं त्याचं चिंतन,ध्यान करता. त्यानंतर दुसऱ्या देवतेचं नाम घेता, त्याचं चिंतन करता - याला काही हरकत नाही. आपलं मुक्कामाचं नाम अजून यायचं आहे, असं समजावं.

जोपर्यंत तीर्थक्षेत्रांना जावसं वाटतंय तोवर जात राहावं. जोपर्यंत आपल्याला बदलात आनंद वाटतो आहे तोवर नाम बदलत राहावं. तुम्हाला मुक्कामाला न्यायला नामच समर्थ आहे. तेच तुम्हाला तुमचं मुक्कामाचं नाम मिळवून देईल. जेव्हा तुम्हाला नाम बदलता बदलता असं वाटेल की, आता हेच आपलं नाम त्यावेळी तेच तुमचं मुक्कामाचं नाम असेल.

प्रत्यक्ष श्री गणोरे बाबांनी विविध नामांचा अभ्यास केला आहे व शेवटी स्वत:च एक नाम सिद्ध केलं. श्री गुरुदेव म्हणत,'नामाला नामे होतात.' पहिल्या नामातून जेव्हा दुसरं नाम उद्‌भवतं तेव्हा दुसऱ्याला नाम देण्याचा अधिकार प्राप्त होतो.

काही वेळा नामाबरोबरच एका गुरूकडून दुसऱ्या गुरूकडंही जावं लागतं. निसर्गदत्तांनी म्हटलं आहे, गुरू का बदलू नयेत ? गुरू तत्त्वानं सारखेच असतात. फक्त ते आकारानं बदलतात. श्री महाराज, बाबा, स्वामी हे एकच असतात. फक्त त्यांनी रूपं बदलली आहेत.अनेकदा गुरू आपल्या शिष्याच्या प्रगतीसाठी त्याला दुसऱ्या गुरूकडं सोपवतात.

श्री महाराजसुद्धा अनुग्रहासाठी अनेक संतांकडं गेले होते. त्यांनी

महाराजांना मार्गदर्शन केलं, पण पुढं अखेरीला श्री तुकामाईंकडं पाठवलं. वाटेतले गुरू शिष्याला अंतिम गुरूकडं पोचवण्याचं काम करत असतात.

आपण शंभराव्या पावलाला गावाला पोचतो त्यावेळी आधी चाललेली नव्व्याण्णव पावलं चुकीची नसतात. ती आधी चालल्यामुळं मगच आपल्याला शंभरावं पाऊल टाकता येतं. ते तुमचं शाश्वत नाम आहे.

*

३७. नामस्मरण करीत असताना नाम चालू आहे हे जाणवतं. पण त्याचवेळी मनोव्यापारही चालू असतो, असं जाणवतं. या दोन्ही गोष्टी मनाच्या कोणत्या स्तरावर चालू असतात आणि हे मनोव्यापार क्षीण होण्यासाठी काय करावं ?

मनाला एकाच वेळी अनेक गोष्टी करायची सवय असते. म्हणून मनाविषयी जास्त सावध राहावं लागतं. कारण काही गोष्टी सात्त्विक असतात आणि काही असात्त्विक.हे जे मनोव्यापार चालतात,ते तपासावेत. मनोव्यापार जास्त वाढायला आपली जीवनपद्धती कारणीभूत असते. ती तपासावी. उदाहरणच सांगायचं झालं तर अकारण हिंडणं,भुकेऐवजी चवीसाठी खाणं, टी.व्ही.समोर तासन्तास घालवणं, जुन्या प्रापंचिक अकारण गप्पांत तासन्तास घालवणं - या गोष्टी निरुपद्रवी किंवा मनोरंजक वाटल्या तरी ती नकळत जीवनपद्धती होऊन जाते. ती एकदा तशी झाली की, नकळत मनात अनावश्यक मनोव्यापार, विघातक व निरर्थक विषयांचं चिंतन सुरू होतं आणि तेच आपलं नाम पातळ करून टाकतं. म्हणून ही अकारण मनात जाणाऱ्या गोष्टींची जीवनपद्धती बदलण्याची गरज आहे.

*

३८. आम्हाला आपल्यासारखं होता येईल का ? त्यासाठी काय करावं ? काय करू नये ?

हा खरं तर खासगी प्रश्न आहे. त्याचं सामुदायिक उत्तर जेवढं देता येईल तेवढं देतो. तुम्हाला माझ्यापेक्षा खूप चांगलं होता येईल आणि खूप लवकर होता येईल, असं मला वाटतं. मला इथंपर्यंत यायला खूप साधना, प्रतीक्षा व वेळ लागला.

एक गोष्ट सुरुवातीला कृपया लक्षात घ्यावी. कुणासारखं वगैरे होण्याची कल्पना सोडून द्या. मी देवाच्या प्राप्तीसाठी, पूर्णत्वासाठी प्रकट, अप्रकट खूप आटापिटा केला. पण कुणासारखं वगैरे होण्यासाठी अजिबात काही केलं नाही. कारण त्याची गरज नसते. पूर्णता, उत्कृष्टता याचे ध्यास घ्यावेत. कोरांटीचं फूल जेवढं पूर्ण तेवढंच ब्रह्मकमळही फूल म्हणून पूर्णच आहे व दोन्हीही तितकीच स्वतंत्र आणि उत्कृष्ट आहेत.

साधन व चिंतन करताना माझ्या असं लक्षात आलं की, साधना म्हणजे विशिष्ट गोष्ट नव्हे. ती चोवीस तासांची गोष्ट आहे. त्याच वृत्तीनं सगळंच काम करावं. आपण चोवीस तास तर नाम घेऊ शकत नाही. पण पारमार्थिक माणसाचं ऑफिसचं काम हे इतरांपेक्षा वेगळं असलं पाहिजे. आपण ज्या गोष्टींचं मोल घेतो त्या दर्जाचं काम करणं, ही साधना आहे.

अर्धा तास देवासमोर बसल्यावर ज्या वृत्तीमध्ये मी असतो त्याच वृत्तीत उरलेले साडेतेवीस तास असणं ही माझ्या दृष्टीनं साधना आहे. चोवीस तास मला भगवंताचं म्हणून राहता येईल का, हे बघणं म्हणजे साधना आहे. आपण श्री महाराजांचं काम म्हणून प्रत्येक काम करावं. म्हणजे जास्त काळ साधना करणं शक्य आहे.(ती. काकांच्या साधनेच्या खुलाशासाठी 'तू आम्हा सोयरा' हे आगामी पुस्तक पाहावं - संपादक)

*

३९. अनेक वर्षं सत्संगात राहूनही साधनेशिवाय, नामाशिवाय माझं अडतंय, असं वाटत नाही. कल्पनेत मात्र नाम म्हणजे सर्वस्व असावं असं वाटतं. पण तशी कृती घडत नाही. यासाठी काय करावं ?

ही सार्वत्रिक अडचण आहे. आपलं स्वत:चं दर्शन घ्यावं असा हा आरसा आहे. कल्पनेत नाम म्हणजे सर्वस्व असं वाटतं हे नुसतं बौद्धिक आकलन आहे. या कल्पना आदर्श वाचनातून, श्रवणातून निर्माण झालेल्या आहेत. पण वस्तुस्थिती तशी नाही. कल्पना आणि वस्तुस्थिती यांमधला हा फरक आहे.

उदा. भगवंत हे सर्वस्व आहे, हे मला पटलेलं आहे. त्यासाठी नामाशिवाय तरणोपाय नाही, हेही मान्य आहे. समजा या कल्पना आहेत, तर मी माझ्या प्रपंचात गुंग आहे ही वस्तुस्थिती आहे. मी यातून बाहेर पडायला तयार नाही. प्रपंचात इतकं दु:ख आहे, तरी माणसाला त्यातून बाहेर पडावं वाटत नाही. यात चांगलं काही होणार नाही, उलट भगवंताला आपण सोडू नये असं जर त्याला वाटत नसेल तर ही प्रपंचाची भूल आहे. यालाच माया म्हणतात.

कल्पना आणि वस्तुस्थिती यांची जर सांगड घालायची असेल तर नुसती कल्पना करूनही उपयोग नाही आणि नुसती वस्तुस्थिती कळूनही उपयोग नाही. त्यांतील अंतर कमी करायला पाहिजे.

प्रपंचात जसं एकमेकांचं, इतरांचं मन सांभाळलं नाही तर परिणाम लगेच दिसतो, तसं नाम न घेतल्यानं बाह्यत: काहीच फरक पडत नाही, अडत नाही. म्हणून नामाचं तेवढं महत्त्व वाटत नाही. कारण नाम सूक्ष्म आहे. त्याचे परिणामही सूक्ष्म आहेत. आज समजा एखादं झाड नाही

लावलं तर काही बिघडत नाही. कारण ते लगेच काही मोठं होऊन छाया देत नाही. पण जो आज झाडाच्या छायेमध्ये वावरतो आहे, त्याला याची जाणीव असते. हे झाड कुणी लावलं याची तो चौकशी करतो. ज्याला त्याची चिंता आहे त्याला असं जाणवतं की, दुसरं झाड आजच लावण्याची गरज आहे.

नामाच्या बाबतीत एका बाजूनं ते न घेतल्यानं झालेलं नुकसान कळतं. पण त्याची निकड लक्षात येत नाही. प्रपंचात दुसऱ्याचं मन न सांभाळण्यानं झालेलं नुकसान लगेच लक्षात येतं. म्हणून मनुष्य कसंही करून मन सांभाळतो.

नामाच्या बाबतीत असा लगेच परिणाम कधीच होत नाही. लगेच प्रापंचिक बदलही काही होत नाहीत. जसा संस्कारांचा परिणाम लगेच दिसत नाही तसाच नामाचा परिणामही लगेच दिसत नाही. नाम ही आपल्याला मिळालेली एक संधी आहे, हेच कळत नाही. आपलं काय नुकसान होतंय याची कल्पना येत नाही. म्हणून त्याची निकड वाटत नाही. शिवाय नाम घेतल्यानं काय होतं याचीही कल्पना येत नाही. सगळ्यात मोठं कारण म्हणजे नामानं आपलं अडत नाही हा मोठा भ्रम आहे.

आपल्याला तात्कालिक परिणामांची सवय झाली आहे. उदा. भूक लागली, अन्न खाल्लं, भूक भागली, समाधान झालं - हे एखाद्या पशूचंही होतं. त्यात विशेष काही नाही. माणसाला विचार करण्याची क्षमता दिली आहे पण तो ती वापरीत नाही. त्याला उद्याचा विचार, म्हातारपणचा विचार, बंधमुक्तीचा विचार करण्याची गरज आहे. माणसाला वरवर पाहाण्याची सवय झाली आहे. आपलं नाम मुळातच कमकुवत आहे, म्हणून ते निकडीचं वाटत नाही.

खरोखर जो पोळला गेलेला आहे त्याचं नामावाचून अडतं. परमार्थ पोळलेल्यांसाठी आहे असं श्री महाराज म्हणायचे. आपण निवांत आहोत. आपल्याला काही झळ लागलेली नाही. नाम न घेतल्यामुळं मी प्रपंचाच्या आगीत पोळला गेलो आहे, असं कुणाला वाटत नाही.

जेव्हा माणसाला याची कल्पना येईल की, नाम न घेतल्यामुळं मी जन्ममरणाच्या फेऱ्यांत अडकलो आहे, सर्व यातनांतून आपल्याला जन्मोजन्मी जावं लागत आहे, इतकंच काय आजच्या या प्रपंचाच्या देखाव्यातल्या काळज्यांनासुद्धा नाम न घेणं हेच कारणीभूत आहे तेव्हा माणूस नक्कीच जबाबदारीनं, प्राधान्यानं नाम घेईल.

अडकलेला माणूस निदान तुरुंगातून सुटण्याची कल्पना तरी करू शकतो, पण जो तुरुंगात आहे व त्याला ते माहीतही नाही तर तो बाहेर सुटण्यासाठी अर्जही करणार नाही. तशी आपली अवस्था आहे. आपण प्रपंचाच्या तुरुंगाला घर समजतो आहोत. म्हणून आपण निवांत आहोत. ज्याला तो तुरुंग आहे, हे समजतं तो त्यातून बाहेर पडायला बघतो. कारण प्रपंचात कुणी कुणाचं नसतं. सगळा स्वार्थाचा मामला असतो. एखाद्या प्रसंगावरूनही आपल्याला कळतं की, आपण एकटे आहोत. याचं खरं आकलन जेव्हा मनाला होईल तेव्हा नामाचं महत्त्व वाटेल.

यासाठी श्री कृष्णमूर्तींनी एक उदाहरण दिलं आहे. आपलं घर जर पेटलं ते विझवायला पाणी घेऊन येणाऱ्या माणसाच्या केसाच्या रंगाची काळजी आपण करतो काय ? तर नाही. आधी त्यानं आणलेली बादली ओतून आपण नुकसान वाचवायचा प्रयत्न करतो.

तेच गुरूंचं, देवाचं, नामाचं महत्त्व आहे. असं जेव्हा आपलं नामावाचून अडेल तेव्हा नामाचं महत्त्व आपल्याला वाटेल. मग कृतीला काय अवकाश ?

*

४०. प्रपंचात नेहमी न केलेल्या उपासनेशी निगडित अपराधीपणाची भावना असते. त्यासाठी काय करावं ? काय करू नये ?

उपासना होत नाही म्हणून एखाद्याला जर अपराधी वाटत असेल तर ते श्रेष्ठ आहेत असं मी समजतो. ही सावधानता आहे.

यासाठी उपासना वाढवली पाहिजे. प्रपंचाचं आपल्या उपासनेशी असलेलं प्रमाण बघावं. आपल्या प्रपंचातील वेळेच्या गॅप बघाव्यात. आपला कुठला वेळ वाया जातो आहे, हे बघावं. प्रवासाचा वेळ जपासाठी वापरावा. आवरताना, आंघोळ करताना, स्वयंपाक करताना जप करण्याचा प्रयत्न करावा.

नामाला उपाधी नाहीत असं जे सर्व संत सांगतात त्याचा उद्देश आपला वेळ कर्मकांडं पाळण्यात जाऊ नये व आपल्याकडून जास्तीत जास्त जप व्हावा हा आहे. जप करताना विशिष्ट वेळ,जागा,स्नान वगैरे आन्हिकं, माळेचं पावित्र्य इ. गोष्टी असाव्यात. पण त्यावाचून अडून बसण्याची गरज नाही.

यावेळी जपाच्या गुणवत्तेपेक्षाही आपण भगवंतस्मरणात राहातो,हे महत्त्वाचं आहे.नाम कधीही घेतलं तरी ते त्याचं काम करीलच.जसं आपण लक्ष नसताना,टी.व्ही.बघताना,गप्पा मारीत जेवण करतो तेव्हा जेवण कधी संपलं हेही लक्षात येत नाही, पण आपलं पोट तर भरतंच ना ? म्हणजे वरच्या गोष्टी करीत जप करावा असा याचा अर्थ नाही,मुद्दा लक्षात घ्यावा.

आपण प्रामाणिकपणे जर सर्व वेळ उपयोगात आणून जप केला तर मग मात्र आपण अपराधीपणाची भावना बाळगू नये. जर आपल्या नोकरीधंद्यामुळं, अपरिहार्य गोष्टींमुळं आपल्याला उपासनेला वेळ मिळत नसेल तर आपल्या मनात उपासना होत नाही ती व्हावी, ही जी तळमळ

आहे तीसुद्धा एक उपासनाच असते, हे लक्षात ठेवावं.

मनापासून केलेल्या उपासनेचं एक मिनिटसुद्धा एक तास केलेल्या उपासनेच्या बरोबरीचं असू शकतं. त्यामुळं उपासना होत नाही म्हणून निराशा बाळगू नये.

*

४१. नामस्मरण काही वेळा खूप चांगलं होतं, काही वेळा ते चांगलं होत नाही. करणारे आपणच असूनही असं का होतं? ते चांगलं व्हावं म्हणून काय करावं ?

खरं तर 'नामस्मरण करणारे आपण नाही', हे त्याचं उत्तर आहे. काही वेळा नाम चांगलं होतं व काही वेळा होत नाही म्हणजेच ते आपल्या व्यतिरिक्त कुणाच्या तरी हातात आहे. वातावरण अनुकूल असलं तर मनुष्य भरभर चालूनही कमी दमतो. आपल्या नामस्मरणाला जे यश आलेलं असतं त्यामध्ये इतर गोष्टींचा सहभाग असतो. त्यामुळं ते झालेलं असतं. तसंच जेव्हा ते होत नाही तेव्हा त्यांचा सहभाग नसतो. आपण यात एवढीच काळजी करावी की, आपला जो काही सहभाग आहे त्यात आपण चुकत नाही ना ?

दुसरी गोष्ट अशीही पाहावी की, आपण गाडी चालवताना जर खराब रस्ता आला तर गाडी फर्स्ट गिअरमधे घेऊन हळू चालवतो, गाडी बंद करून बसत नाही. उलट जेव्हा चांगला रस्ता येईल तेव्हा वेग घेऊन अंतर कव्हर करतो. असंच साधनेच्या बाबतीतही करता येईल. जेव्हा अनुकूलता असेल तेव्हा साधन वेगानं व जास्त वेळ करावं. प्रतिकूलतेमध्ये साधनात टिकून राहाण्याचा प्रयत्न करावा.

*

४२. प्रत्येकाला जीवनात अध्यात्माची गरज आहे काय ?
असल्यास ती का आहे ?

होय. प्रत्येकाला अध्यात्माची गरज आहे. दृश्याचा व्यवहार करीत असताना अदृश्याचा विचार करणं हे अध्यात्मात अपेक्षित आहे. आपला सर्वसाधारण व्यवहारसुद्धा अदृश्याचा विचार केल्याशिवाय होत नाही. उदा. एखाद्यानं जर आपल्याला प्रश्न विचारला तर त्याचं उत्तर देताना आपण त्याचा हेतू जाणून घेऊन त्याप्रमाणं उत्तर देतो. विचारणारा निखळ जिज्ञासेनं, छद्मीपणानं, काही इतर हेतूनं विचारतो आहे काय याचा अंदाज घेणं हा अदृश्याचाच विचार नाही का ? फक्त तिथंच न थांबता ही घटना घडवणारा खरा कोण आहे, त्याचा हेतू काय असावा -हा विचार करणं व त्याप्रमाणं वर्तन करून समाधानी जीवन जगणं म्हणजे अध्यात्म होय.

या अध्यात्माची जगात प्रत्येकाला नितांत गरज आहे. फक्त ती प्रत्येकाला कळत वा जाणवत नाही. प्रत्येक माणूस अत्यंत मर्यादित अर्थानं व्यवहार सुखाचा होण्यासाठी अदृश्याचा विचार करीतच असतो. पण तो अंतिम सुखासाठी - समाधानासाठी नसतो, जे अध्यात्मात अपेक्षित आहे.

यासाठी कदाचित आध्यात्मिक माणूस आध्यात्मिक समजल्या जाणाऱ्या जपतप, याग, यज्ञ, यात्रा काहीच करीत नसेल. कारण खरं पाहाता अध्यात्मात दृष्टिकोन - भूमिका बदलण्याशी संबंध आहे, जो आपल्या अंतरंगाशी संबंधित आहे. रूढ अर्थानं धार्मिक समजल्या जाणाऱ्या गोष्टींनी हा बदल होईलच असं नाही. किंबहुना बऱ्याच वेळा हा बदल तसा न घडतानाच दिसतो.

यातून बऱ्याचदा माणूस पोकळ अहंकार, द्वेष, हिंसा यांच्याच

आहारी जाताना दिसतो. म्हणून खऱ्याखुऱ्या अदृश्याचा विचार करून जो वागेल तो समाधानी राहील. तो धार्मिक असो वा नसो, धर्म समाजाला विशिष्ट आचारमार्ग घालून देतो की, ज्यामुळं समाजाचा स्तर वाढून, तो समाज अदृश्याचा विचार करून, समाधानी आयुष्याचं ध्येय साध्य करून घेण्यासाठी तयार होतो. पण अध्यात्म या कर्मकांडात, आचारमार्गात न अडकता माणसाच्या वैयक्तिक उन्नती व पूर्णतेसाठी मार्ग दाखवतं.

अध्यात्माची सुरुवात शक्यतो लहान वयापासून व परिस्थितीची अनुकूलता असतानाच करावी. कारण आजपर्यंत मी सुखात असेन पण नंतरच्या क्षणी माझ्यासमोर काय वाढून ठेवलं असेल याची काय कल्पना? दु:खाच्या बडग्याला सामोरं जाण्याची माझी आज काहीच तयारी नाही. मी सुखात असताना दु:खावर उपाय केला पाहिजे. किमान त्याला सामोरं जाण्याची तरी तयारी झाली पाहिजे.

दु:खात हे सर्व समजून घेऊन अंमलात आणण्याची शक्यता जवळजवळ नाहीच. तहान लागल्यावर विहीर खणणं वा पाण्याचा शोध घेणं हे वाईट वा चुकीचं नाही, पण अगोदरच त्याचा शोध घेणं हे जास्त उचित आहे. तसंच वयाच्या बाबतीत आहे. साधारणत: या गोष्टी म्हातारपणी करायच्या असं समजलं जातं, जे पूर्णपणे चुकीचं आहे.

जीवनाच्या सायंकाळी आजवर माझं काय व कसं चुकलं हे यातून एकवेळ कळेल, फार तर शरणागती येऊन त्यातून माणूस समाधानापर्यंत जाऊ शकतो. पण जे जगलेलं आयुष्य वाया गेलं त्याचं काय ? आपल्यामुळं इतरांनाही आनंद मिळाला असता. अशा कलेला आपण वंचित राहिल्यामुळं आजवर आपलं कितीतरी नुकसान झालेलं असेल त्याचं काय ? म्हणून जेवढी लवकर जाणीव होईल व सुरुवात होईल तेवढं चांगलं.

*

४३. साधन करताना येणारे अनुभव खरे असतात का ?

साधन करताना अनुभव येतात. समजा जर मनुष्य गावाला निघाला तर वाटेतली गावं जशी लागतात तसे साधन करताना अनुभव हे येणारच. मी बरोबर दिशेनं चाललो आहे का आणि किती चाललो आहे, हे ते अनुभव दाखवतात. अनुभवाची पहिली खूण मागणं हे साधकाचं कामच आहे. त्यामुळं साधनावर विश्वास बसतो. परंतु पुन्हा पुन्हा खुणा मागत राहाणं, हे प्रापंचिक आहे. एकदा आपल्याला कळलं की, रस्ता बरोबर आहे की मग आपलं काम झालं आहे. त्यानंतरच्या खुणा आपोआप लागणारच आहेत.

आता या खुणांच्या बाबतीत एक लक्षात घ्यावं की, रस्त्यानं चालत जात असताना आजूबाजूला दुकानं लागतात, रहदारी असते, त्याकडं आपलं लक्षही असतं. पण त्यानं आपलं चालणं थांबत नाही. ते सुरूच राहातं आणि राहावंही. रस्त्यावरच्या गोष्टी लागणारच. पण चालणं मात्र सुरूच राहाणार. आता या रहदारी, दुकानांकडं आपण किती लक्ष देऊ? कमीच. खरी खूण पुढचं गाव लागतं की नाही आणि गावी पोचतो की नाही, ही आहे.

तशा इथल्या खऱ्या खुणा नाद, सुगंध इ. नव्हेत. विकारात फरक पडला का, अस्वस्थता कमी झाली का ? अशा स्वरूपाच्या आहेत. कधीतरी आपलं बरोबर चाललं आहे हे सांगण्यासाठी भगवंत काहीतरी खुणा देतो. इंद्रियांच्या पातळीवर काही खुणा मिळतात. त्या कळतात, पटतात अधिक आकर्षक वाटतात. पण खरी खूण अतींद्रियाच्या पातळीवर असते ती म्हणजे निरुपाधिक, शाश्वत समाधान. तो अनुभव खरा.

*

४४. समाजात व्यवहार करताना प्रत्येकाचं व्यक्तित्व जाणण्याची गरज आहे का ?

आपल्या संबंधांचा विचार करताना व्यक्तित्व हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. आपण आपल्या स्वभावाचे कंगोरे जास्तीत जास्त साफ करीत जावं. परंतु संबंधांमध्ये दुसऱ्यांच्या अशा एखाद्या कंगोऱ्याला, स्वभावातील मुद्याला की जो तो माणूस सोडणं अशक्य आहे, त्याच्या अस्तित्वासाठी जो आत्यंतिक जरुरीचा वाटतो तो कंगोरा वा दोष आपण त्याचं व्यक्तित्व म्हणून स्वीकारावा आणि पुढं जावं. त्या दुसऱ्याची अशी व्यक्तिवैशिष्ट्यं मी स्वीकारावी.माझ्यातही सुधारणेला वाव आहे.माझ्या व्यक्तिवैशिष्ट्यातले दोष अधिकाधिक काढून टाकणं हे माझं काम आहे.

निसर्गामध्ये प्रत्येक पान, झाड वा माणसाचा चेहरा वेगळा असतो, दुसऱ्यासारखा नसतो. ही वैशिष्ट्यं निसर्गानंच ठेवली आहे. सर्व माणसं एकाच व्यक्तित्वाची होऊच शकत नाहीत. कारण ती तशीच निर्माण केली गेली आहेत. म्हणून मानवी संबंधांचा विचार करताना संबंधांमध्ये एकमेकांना त्रास देणारे गुणावगुण काढून टाकण्याचा प्रयत्न करणं हे आपलं काम आहे. जो स्वभावदोष काढून टाकता येत नाही, समजत नाही, त्याच्या अस्मितेचा वाटतो, तो दोष म्हणजे त्याचं वैशिष्ट्य आहे असं समजावं.

महाराज असं म्हणत की तेरा जणांना त्यांनी मोक्षाप्रत नेलं. ते कदाचित पन्नाससुद्धा असतील. पण त्या प्रत्येकाला त्यांनी सांगितलेलं साधन हे वेगवेगळं होतं. आनंदसागरांना त्यांनी नामप्रसाराचं, लोकसंग्रहाचं काम दिलं नाही. ब्रह्मानंदांना त्यांनी लोकसंग्रहाचं काम दिलं. एका माळ्याला एकदा नाम दिल्यावर - तू गुरुपौर्णिमेला आलं पाहिजेस - असं सांगितलंही नाही व तो आलाही नाही. पण असा नेम त्यांनी इतरांना मात्र सांगितला.

समाजात राहाताना काही दंभ हा क्षम्य असतो. उदा. डॉक्टर म्हणून वावरताना त्यांना इनशर्ट, टाय वगैरे वापरावा लागतो. व्यवहारात ते आवश्यक समजलं जातं. खरं पाहाता त्या कपड्याशी त्यांच्या कामाचा व ज्ञानाचा काही संबंध नाही. तरीही ते ती बंधनं स्वीकारतात. तो एक प्रकारचा दंभच आहे. पण तो क्षम्य व जगासाठी काही प्रमाणात गरजेचाही आहे.

*

४५. संतनमनमालेमध्ये पाचव्या ओवीत 'महाभूते आणि जाणीव एकचि आहे' असं म्हटलं आहे, त्याचा अर्थ स्पष्ट करावा.

संतांना देह आहे. तो महाभूतांनी आकाराला येतो. त्यामध्ये जाणीव ओतली जाते आणि माणसाचा प्रवास सुरू होतो. अशाच प्रकारे संतांचाही जन्म झालेला आहे. सामान्य माणूस आणि संत यांतला फरक हा की, हा देह म्हणजे मीच असं समजून सामान्य माणूस आयुष्यभर जगतो आणि संत मात्र देह एखाद्या शस्त्रासारखा हातात धरून त्याच्याकडून स्वत:चाच नव्हे तर सगळ्या जगाचा उद्धार करून घेतात. आपल्या शरीराला साधी स्वत:साठीसुद्धा तोशीस सहन होत नाही. दुसऱ्यासाठी तोशीस ही तर कल्पनाच नको. इतकं करूनही आपण दु:खीच होतो.

याउलट संतांनी स्वत:चा देह हाती धरून निरपेक्षपणे कुणासाठी काय काय केलं याची यादीही करणं शक्य नाही. संतांच्या लिहिलेल्या चरित्रापेक्षा न लिहिलेलं चरित्र मोठं असतं एवढं लक्षात ठेवलं तरी पुरे. म्हणून सामान्य मनुष्य आणि संत यांची सुरुवात सारखीच असली तरी शेवट फार वेगळा होतो.

*

४६. बहुसंख्य बुद्धिमान व्यक्तींनी आत्मज्ञान करून घेतल्याचे दाखले इतिहासात सापडतात. उदा. विवेकानंद, समर्थ, ज्ञानेश्वर माउली, गुरुदेव रानडे, श्री महाराज इ. असं असूनही अडाणी माणसाला परमार्थ सोपा असं श्री महाराज का म्हणतात ?

आत्मज्ञान बुद्धिमान माणसांना, महापुरुषांना शक्य असलं तरी ते आपल्यालाही शक्य आहे. हे सांगण्यासाठी श्री महाराज असं म्हणतात. नाम घ्यायला खरं तर अपार बुद्धीची गरज नाही.

नामाची दुसरी बाजू प्रेम आहे. ते तर प्रत्येकाच्या अंत:करणात आहे. प्रपंच मांडला म्हणजे तुम्हाला कशाबद्दल तरी प्रेम आहे, हे नक्की. भले ते चुकीच्या गोष्टींबद्दल असेल. नाम प्रेमाचं साधन आहे. या बुद्धिमान लोकांनी त्यांच्या बुद्धीनं नामाची खात्री करून घेतली व मग ते घेतलं. आपल्याला खात्री करून घ्यायची असेल तर एका मर्यादिपर्यंत करून घेता येईल. त्याच्यापुढं अनुभवच पाहिजे. नाम घेतल्यानं कल्याण होतं, हे कळलं तरी पुरेसं आहे.

बुद्धिमत्तेनं ज्यानं नाम घेतलं त्यानं सूक्ष्माचे व्यवहार करून दाखवले. दुसऱ्याला नामाला लावायचं असेल तर बुद्धी ही पाहिजेच. सामान्य माणसाला त्याची जरूर नाही. त्यामुळं बुद्धी हे फार मोठं साधन आहे, असं नाही. नाम घेऊन मुक्त होण्यासाठी फार बुद्धीची गरज नाही. आपल्याला बुद्धिमत्ता आहे असं जे वाटतं ते आड येतं. त्यामुळं जे सोपं आहे ते अवघड होऊन बसतं.

उदा. नामाचा अर्थ काय, नामाची व्याप्ती किती, त्याची उत्पत्ती कशी झाली असे प्रश्न बुद्धीनं निर्माण होतात. त्यामुळं अशी आड येणारी

बुद्धी असेल तर ती बाजूला ठेवावी असं श्री महाराज म्हणतात. ज्यांना बुद्धीनं खात्री करून घ्यायची आहे त्यांना खात्री पटावी म्हणून बुद्धिमान संतांनी काम करून ठेवलं आहे. शिक्षण, बुद्धिमत्ता यांचा खरा नाम घेण्याशी संबंध नाही. संतांचं ऐकून नाम घेण्याइतकी बुद्धी आपल्यात असली म्हणजे पुरे.

अडाणी माणसाला आपल्याला काही कळत नाही ते कळतं. श्री महाराज म्हणत, मला कळत नाही असं जे म्हणतात ते मला फार आवडतात. परमार्थ हे भावाचं काम आहे, बुद्धीचं काम नाही. समजा एखादं सुगंधी फूल आहे तर आपल्याला त्याचा सुगंध घ्यायला वनस्पतिशास्त्राचं किंवा शरीरशास्त्राचं कितीसं ज्ञान असावं लागतं ? तसंच हे आहे.

*

४७. देव किंवा गुरू यांच्या फोटोकडं पाय करून झोपू नये असं म्हणतात, ते खरं आहे का ?

ज्या ठिकाणी हे फोटो ठेवले आहेत त्या ठिकाणी ते आहेत असं वाटत असेल तर तिकडं पाय करू नयेत. वाटत नसेल तर प्रश्न मिटलाच आहे. जर ते तिथं तर आहेतच पण सर्वत्र आणि सर्वांच्यात आहेत असं वाटत असेल, आणि खरंतर तेच खरं आहे, तर मग सोयीनुसार कुठंही पाय करून झोपलं तरी चालेल. यात व्यवहारातल्या अलीकडच्या जागेच्या अडीअडचणी, इतरांच्या सोयी-गैरसोयी यासुद्धा लक्षात घ्याव्या. शिवाय खरं सांगायचं तर हे सगळे विचार झोपताना करण्यापेक्षा देव, गुरू आपल्या घरात जिथं ठेवले आहेत तिथं ते जरूर आहेत याची जाणीव इतर व्यवहार करताना ठेवली तर त्याची गरज व उपयोग जास्त आहे.

*

४८. झाडांना भावना असतात हे विज्ञानानं सिद्ध केलेलं आहे. त्यांच्यात भावना विकसित झालेली आहे का ? जर भावना विकसित झालेली नसेल तर त्यांच्यात स्पर्धा, द्वेष अशा गोष्टी कशा असतील ? व मग आपण 'सृष्टिसंदेश'मध्ये म्हणतो तसे संदेश ती कसे देऊ शकतील ?

झाडांना भावना असतात ते विज्ञानानं सिद्ध केलेलं आहे. नवीन निर्माण केलेलं नाही. म्हणून विज्ञानानं जे सिद्ध केलेलं नाही ते निर्माण झालेलं नाही असं समजायचं कारण नाही. कारण झाडांना भावना, संदेश देण्याची ताकत पूर्वीच होती. पण त्यावेळी आपल्याला ती सिद्ध करता आली नाही.

आपण विकास म्हणजे स्पर्धा व द्वेष समजू नये. स्पर्धा न करता प्रगती करण्याची कल्पनाच आपल्याला येत नाही, ही मूळ अडचण आहे. कुठल्याही फुलाला दुसऱ्या फुलाकडं बघून त्यापेक्षा चांगलं व्हावं वाटत नाही. ते फक्त आपल्याकडं जे चांगल्यात चांगलं आहे ते विकसित करण्याचा प्रयत्न करतं. स्पर्धा, द्वेष, मत्सर, असूया हे चुकीची वाढ दर्शवतात, विकास नव्हे. आपल्यात असणाऱ्या उत्तमात उत्तम गुणांत वाढ करणं म्हणजे विकास होय.

आपल्याला त्यांनी दिलेले संदेश समजू शकत नाहीत हा त्यांचा दोष नव्हे. हा आपला दोष आहे. आपल्याला त्याची कल्पना नाही, शिकण्याची क्षमता नाही, नम्रता नाही ही उणीव आहे. सृष्टी हे संदेश देत नाही. कसं आदर्श उगवावं हे सांगण्यासाठी सूर्य उगवत नाही. तर स्वधर्म म्हणून उगवतो. सृष्टी तिला दिलेलं काम उत्तमात उत्तम, उत्कृष्टपणे करण्याचा प्रयत्न करते. कोणालाही काही दाखवण्यासाठी सृष्टी काम करीत नाही.

संदेश हे आपल्याला घ्यायचे असतात. सृष्टीमधे संदेश हे पसरलेले असतात. संतही जगाला संदेश द्यायचे म्हणून जगले नाहीत. सीमेवर लढणारा जवानही कोणाला दाखवण्यासाठी त्याग करीत नाही. तर त्याच्या त्यागातून आपण शिकायचं असतं.

श्री दत्तगुरूंनी सृष्टीतील चोवीस गुरू केले होते. कारण त्यांची शिकण्याची क्षमता मोठी होती. संदेश तर झाडांत, दगडांत पडलेले आहेत. आपण संदेश घ्यायला शिकलं पाहिजे.

आपल्या जीवनात घडणारी टाचणीएवढी घटनाही संदेश देते. प्रत्येक जडचेतन जीव हा संदेश देतो ते आपण घेतले पाहिजेत. त्यात प्रगती आपलीच आहे. सृष्टीचे व्यवहार तर होतच राहतील. शाळा चालूच राहील. शिकून घेणारा पास होऊन बाहेर पडेल.

*

४९. १. उपासनेत किंवा वृत्तीत स्थिर होणं म्हणजे काय ?

२. स्थिर झाल्याची लक्षणं कोणती ?

थोडक्यात उत्तर देणं अवघड आहे, पण सारांशानं असं म्हणता येईल की, उपासना किंवा त्या अर्थानं वृत्ती, म्हणजे भगवंताच्या सतत जवळ राहाण्याची स्थिती. ही मुळात मानसिक आहे. ती स्थिर झाल्यानं भगवंत जसा सत्य, शाश्वत व आनंदमय आहे तसं मनानं राहाता येतं. हे मानसिक पातळीवरचं स्वत:ला कळण्यासारखं लक्षण. दुसरं असं की, ही वृत्ती स्थिर असेल तर त्याचा परिणाम आपल्या क्रियांवर म्हणजे वर्तनावर होत असतो. ते वर्तन भगवंताचा प्रत्यय देणारं असणं म्हणजे स्थिर होणं.

*

५०. कृमी, कीटक, मुंग्या, डास आपल्याकडून अजाणतेपणी मरतात याबद्दल काय करावं ?

प्रथम हे अपरिहार्य आहे, हे लक्षात ठेवावं. आपल्याला जर केर काढायचा आहे, तर मुंग्या जायच्याच. त्याशिवाय केरही काढता येणार नाही. अगदी लहान सहान मुंग्या वगैरेंना न दुखवणं हे केवळ संतसत्पुरुषांचं काम आहे. त्यामुळं आपण सामान्य आहोत हे लक्षात ठेवावं. त्यामुळं सामान्य कर्मंच आपल्याला करावी लागणार.

कर्मांचा परिणाम हेतूवर ठरतो. आपला हेतू काही कृमी-कीटक मारणं हा नाही. आपला हेतू स्वच्छता करणं हा आहे. त्यामुळं याचा दोष आपल्याला लागणार नाही. नाहीतर रावणवधाचा दोष रामाला लागला असता. न्यायाधीशाला कैद्याच्या वधाचा दोष लागला असता.

काही वेळेस घरी, शेतात कीटकनाशकंही वापरावी लागतात. शेतात एखादं वारूळ जर असेल तर मुद्दाम ते नष्ट करू नये. त्यांनाही जगण्याचा अधिकार आहे. हे कृमी, कीटक उन्हाळ्यात, पावसाळ्यात त्यांच्या निवाऱ्याच्या जागी पाणी येतं म्हणून बाहेर येतात. ते मुद्दाम कधी कुणाच्या वाटेला जात नाहीत. ते फक्त स्वसंरक्षणार्थ हल्ला करतात.

घरात मुंग्या अन्न शोधत असतात. मुंग्या असल्या तर ज्या अन्नकणाला त्या लागल्या आहेत तो दूर करा. साधं थोडं पाणी जरी त्यांच्याजवळ टाकलं तरी त्या दूर जातील. शक्य होईल तितकं त्यांना दूर करा. त्या जातील. त्यांना मारण्याचीही गरज नाही.

सृष्टीमध्ये जिवांची श्रेणी आहे. कृमी, कीटक हे प्राथमिक अवस्थेतले जीव आहेत. कुत्री, मांजरं हे मध्यम व मनुष्य ही सर्वोच्च निर्मिती आहे. मानवाला टिकवण्यासाठी यांची हत्या चालू शकते. कारण

मानव टिकला पाहिजे. एक मोठा पशू मारणं व हे कृमी, कीटक मारणं यांच्यात फरक आहे. हे जीव माणसापेक्षा कमी दर्जाचे आहेत. राजा जगतो पण सैन्य जातं अशी अवस्था असते. कारण तो जगला तर अगणित प्रजेला आधार मिळेल, ती जगेल.

या छोट्या घटकांचं आयुष्यही कमीच असतं. त्यांनाही त्यांचं प्रारब्ध आहे. त्यांच्या प्रारब्धात जशा रितीनं मरण असेल तसं ते येतं. निमित्त फक्त कुणीतरी होतं. त्यांना मारल्याचा दोष त्याला लागत नाही. मात्र आपण मुद्दाम त्यांची हत्या केली तर त्याचा दोष आपल्याला लागतो.

अगदी झाडंपेडं, दगडांतही जीव आहे. आपल्याला लाकूड मिळवण्यासाठी झाड तोडावं लागतं. त्याचाही दोष आपल्याला आहे. त्यामुळं झाड तोडण्यापूर्वी त्याची पूजा, प्रार्थना करतात. कशासाठी आपण झाड तोडतो आहोत ते झाडाला आधी सांगावं. त्याला ते कळतं. या दोषांचा परिहार दुसरं झाड लावून करता येतो.

आपण झाडांची फुलं, फळं तोडतो. खरं तर त्यांनाही जगण्याचा अधिकार आहे. कधीही झाडं ओरबाडून फुलं, फळं काढू नयेत. त्यांना विचारून, प्रार्थना करून फुलं, फळं फक्त देवासाठी किंवा सात्त्विक कामांसाठी काढावीत. कारण आपण ती सर्वोच्च निर्मिती अर्पण करणार आहोत. 'फुले उमलती देवास द्याया' असं सृष्टिसंदेशात म्हटलंच आहे.

आज देवासाठी फुलं तोडताना आपण झाडाचं कामच करीत आहोत. त्यांना देवापर्यंत पोचवीत आहोत. म्हणून ती जरुरीपुरतीच काढावीत. फूल काढलेलं झाडालाही कळलं नाही पाहिजे इतक्या अलगदपणे ते काढावं.

बाग लावताना आपण त्याची कापणी करतो, तण नष्ट करतो, काटेरी झुडपं काढतो. काही वेळा स्वच्छतेसाठी, सौंदर्यासाठी हे करावं

लागतं. अशा वेळी दुसरीकडं झाडं लावावीत. झाडांना पाणी घालावं. वृक्षसंवर्धनासाठी देणग्या द्याव्यात. प्राण्यांचं दूध काढताना पहिल्यांदा त्यांच्या पिल्लांसाठी ठेवावं. नंतर स्वत:साठी घ्यावं. आपण पृथ्वीला पाय लावतो, तिला प्रथम नमस्कार करावा.

जाणीव असणं हे महत्त्वाचं. सजीव-निर्जीव तोल टिकवण्याचा प्रयत्न करावा. असं असेल तर तुम्हाला विधायकपणे मुक्त होता येतं.

*

५१. देहबुद्धी कमी करण्यासाठी नेमकं काय करायला हवं ?

देहाकडं यंत्र म्हणून पाहावं. ते यंत्र दुसऱ्याचं आहे, हे लक्षात ठेवावं. देह हे अप्रतिम, निसर्गनिर्मित यंत्र आहे. त्याचा कर्ता कोण असेल याची जिज्ञासा वाढीला लागेल असं रोज पाहावं. हे यंत्र ज्यासाठी दिलं आहे त्यासाठीच त्याचा वापर होतो आहे ना, हेही पाहावं. ते यंत्र आपण आपलं समजतो ही देहबुद्धीची सुरुवात आहे.

ते दुसऱ्याचं आहे म्हटल्यानं ती देहबुद्धी नाहीशी व्हायला सुरुवात होईल. त्याच्या कर्त्याचा विचार वाढत जाईल, आपण विश्वस्त आहोत, ते यंत्र माझं प्रारब्ध पुरं करण्यासाठी दिलेलं आहे हे भाव वाढत चालले तर देहबुद्धी आणखी कमी होत जाईल आणि कृतज्ञता वाढीला लागेल. या यंत्राला मुदत आहे आणि ते देताना वापराची पथ्य सांगितली आहेत. ती सदाचार नावानं प्रसिद्ध आहेत, हे लक्षात ठेवावं.

*

५२. १. प्रपंच आणि परमार्थ विरोधी आहेत काय ?
२.सामान्य प्रापंचिकांचा परमार्थाला विरोध का असतो ?
३. त्यांनी ती म्हातारपणची गोष्ट का ठरवली आहे ?

हे परस्पर विरोधी तर नाहीतच. श्री महाराज म्हणाले तसं मनाच्या वेगळ्या ठेवणीनं तोच प्रपंच करणं म्हणजे परमार्थ. याकडं बघण्याचा एक दृष्टिकोन असतो. फरक तेवढा बघू. परमार्थ म्हातारपणी करावा असा समज का निर्माण झाला, ते पाहू. त्यात काही तथ्य आहे.

परमार्थाला लागल्यावर माणसाची कर्मप्रवृत्ती अनेकदा थोडीशी लटकी पडते. हे कर्तृत्व आपलं नव्हे, याची गरज आहे का - असे प्रश्न निर्माण व्हायला लागले की, नेहमीची जी कार्यशक्ती असते आणि जी प्रापंचिकांची सतत वाढत असते ती त्याची लटकी पडायला सुरुवात होते. मग लोकसंग्रहाची त्याला गरज वाटत नाही. फार पैशाची गरज वाटत नाही आणि मग बाकीच्यांपासून त्याला वेगळं पडायला होतं. तिथंच ते विरोधी आहे. हे जगरहाटीच्या विरोधी असल्यानं हे म्हातारपणचं काम आहे असं त्याला वाटायला लागतं.

पण हे जर तरुणपणी झालं तर काय होईल ? आपण चांगल्या आणि वाईट दोन्ही बाजूंनी विचार करू. चांगल्या बाजूनं विचार करायचा म्हटलं तर, तो जर सावध असेल तर तो आपल्या प्रपंचाची व्यवस्थित व्यवस्था करेल. सगळ्या जबाबदाऱ्या, मुलं, बाळं, लग्न या सर्वांची तो बरोबर काळजी घेईलच. पण समजा, तो बेसावध असला तर कर्तव्यांची हेळसांड सुरू होईल. हा धोका आहे.

हेच समजा म्हातारपणी कळलं तर तेव्हा फार काही मिळवायचं राहिलेलंच नसतं आणि मिळतही नसतं. त्यामुळं तो तिथं थांबेल. त्यामुळं

तिथं कर्मप्रवृत्ती काही लटकी पडणार नाही. म्हणून ते म्हातारपणी केलेलं सेफ आहे असं लोकांना वाटतं. ही त्याच्यातली खरी अडचण आहे. त्यांनी जे गणित काढलं आहे ते त्यामुळंच.

आत्तापासून जर तो या नादाला लागला तर उद्या कदाचित हा प्रपंचसुद्धा सोडेल असं वाटतं. म्हणजे भीती वाटते. या सगळ्याची काही गरज नाही असं जर त्याला वाटायला लागलं तर हा हळूहळू एक एक गोष्ट सोडून देईल. घर सोडून देईल, पैसा सोडून देईल, नोकरी सोडून देईल असं वाटायला लागतं. ते भान राहील की नाही याचासुद्धा विचार केलाच पाहिजे. म्हणून त्या दृष्टीनं ते म्हातारपणी करण्याचं साधन समजलं जातं. कारण नोकरी सोडायला म्हातारपणी ती राहिलेलीच नसते. सत्ता सोडायला तीही नसते. घरातलं कोणीही विचारीत नसतं. म्हणून ते म्हातारपणी करणं योग्य वाटतं.

पण मुळात जर पाहिलं तर प्रपंच आणि परमार्थ विरोधी नाहीतच. त्यांचे दृष्टिकोन वेगळे आहेत. आपण कुठल्या बाजूला झुकावं हा प्रश्न आहे. परमार्थ तुम्हाला प्रपंचाकडं अकारण झुकू देत नाही. उदा. प्रपंचामध्ये संचय आहे तर संचयाकडं झुकू देत नाही, लोभाकडं झुकू देत नाही आणि स्वास्थ्य म्हणून विचार केला तर लोभाची माणसाला गरज नसतेच. म्हणजे प्रपंच आणि परमार्थ विरोधी नाहीत, उलट प्रपंचाला परमार्थाची गरज आहे. तरच तो स्वास्थ्याचा होईल. नाहीतर तो लोभ, संचय, असूया, मत्सर यांचा होईल.

म्हणजे प्रापंचिकांनी प्रपंच सेफ आहे हे बहुमतानं ठरवलं, पण हे कुणी विचारात घेतलं नाही की परमार्थही सेफ आहे. उदा. समजा मत्सर कमी झाला तर तो सुखानं जगेल किंवा दुसरे सुखानं जगू शकतील हा विचार ते करीत नाहीत. प्रापंचिकानं यासाठी दृष्ट काढण्याची व्यवस्था

ठेवली आहे, पण तो मत्सर कमी नाही करणार. माणसाचं सारं चुकीच्या प्रवृत्तीसुद्धा टिकवण्याचं एक शास्त्र असतं !

आपण दृष्ट काढतो बरोबर आहे. पण मुळात दृष्टच लागू नये म्हणजे काय तर एखाद्या गोष्टीचा मत्सर वाटू नये, असं खरं असायला पाहिजे. पण माणसानं प्रपंचाला सेफ केलंय आणि असल्या गोष्टींना अनसेफ ठेवलंय. त्याला असले मार्ग काढून दिलेत. मत्सर करू नका म्हणून सांगितलं नाही. असूया करू नका म्हटलं नाही. ते परमार्थ म्हणतो.

उदा. लोभाचं घ्या. अतिसंचयानं दु:ख होतं हे काही सांगायची गरज नाही इतकं समर्थांनीसुद्धा सांगून ठेवलेलं आहे. 'अती लोभ रे क्षोभ तो दैन्यवाणा' असं सांगून ठेवलं आहे. त्या लोभामुळं अक्षरश: दीनवाणेपणा माणसाला येतो.खरोखर लाखो रुपये असलेली माणसं शंभर रुपयांची सूट मिळावी यासाठी दीन झालेली आपण बघतो. शंभर-दोनशे रुपयांसाठी घासाघीस चालू असते. ते शंभर रुपये पडले तरी यांना कळणार नाही.

खरं तर लाख रुपये जवळ असताना तो कसा आरामात असायला हवा, पण तसंही नसतं. त्याची शे-दोनशेची घासाघीस सुरू असते किंवा रिक्षावाल्याचं उदाहरण द्यायचं झालं, तर त्याच्याकडून एक रुपया येणं असेल तर या माणसाचा जीव अगदी वरखाली होतो. काहीही करून त्याच्याकडून तो एक रुपया वसूल करून घेतोच. इकडं आपली इस्टेट कशी संपवावी हा प्रश्न त्याला पडलेला असला तरी हा एक रुपया सोडवत नाही. म्हणजे त्या लोभानं मी दीनवाणा होतो आहे.

रिक्षावाल्यानं तुम्हाला फसवू नये हे मान्य आहे. पण तुम्ही त्याला म्हणू शकता की, नऊ रुपये झालेत, एक रुपया द्यायचा आहे तो राहू देत. आपल्यापेक्षा कितीतरी पट कष्ट करून त्याला तो एक रुपया मिळवायला लागतो. हे जे पुढं बंधनांना कारणीभूत होतं ते सर्व यांना वेळेत समजावं

असं परमार्थ सांगतो. परमार्थ तुमची अनाठायी जाणारी शक्ती वाचवतो. अकारण कर्म वाचवतो.

आजसुद्धा आपण जे म्हणतो की, सामाजिकदृष्ट्या इतकं जे दु:ख निर्माण झालं आहे ते कशातून निर्माण झालं आहे ? प्रपंचाला परमार्थाची जोड नाही म्हणून निर्माण झालं आहे. या प्रपंचाला परमार्थाची जोड असती तर वृद्धाश्रम निर्माण झाले असते का ? अनाथ बालकाश्रम निर्माण झाले असते का ? काहीच झालं नसतं. कारण तो प्रश्न मुळात जिथं कुठं निर्माण झाला तिथंच सुटला असता.

ते वृद्ध तिथं आश्रमात का गेले ? इकडं हा नुसताच त्याचा प्रपंच करायला लागला म्हणून त्याला आईबापाची किंमत कळेना. तेच जर त्याला परमार्थाची दृष्टी असती तर ?

आपण 'पुंडलिकवरदे' म्हणतो. पुंडलिक का एवढा मोठा आहे तर आईबापाच्या सेवेत तो भगवंतसुद्धा आणायला तयार नाही. त्याच्या दृष्टीनं त्याची सेवा मोठी आहे. जो आईवडिलांची सेवा करतो आणि भगवंताला म्हणतो उभा राहा ! असा भक्त श्रेष्ठ आहे. हे एका बाजूला आहे आणि दुसरीकडं वृद्धाश्रम आहे किंवा - तुम्ही त्यांचं काय असेल ते क्रियाकर्म करा, इकडून डॉलरनं पैसे पाठवतो - अशी परिस्थिती आहे. तो तिकडून इकडं चार दिवस यायलासुद्धा तयार नाही.

प्रपंचाला जी परमार्थाची गरज होती ती आपण सांभाळली नाही किंवा आपण ती योग्य प्रमाणात दिली नाही म्हणून असंतुलन आहे. म्हणून सुरुवातीला म्हटलं की, परमार्थ ही अमुक एक क्रिया करण्यापेक्षा जास्त समजूतदारपणा वाढवण्याची गोष्ट आहे. समजली व त्याची जोड मिळाली तर जीवन समृद्ध करील.

*

५३. जीवनात प्रपंच आणि परमार्थाची सांगड का व कशी घालावी?

हे बॅलन्सिंग आहे. ते करीत असावं हे खरं. कुठल्याही बाजूला खाली गेलं तर ते टेकणारच. परमार्थाची बाजू फार जड झाली तरी ते जमिनीलाच टेकणार आणि प्रपंचाची जड झाली तरी ते जमिनीतच जाणार. ते इकडं गेलं तरी मातीमोलच होईल आणि तिकडं गेलं तरी मातीमोलच होईल. ते तरंगत कसं ठेवता येईल ही आपली सांगड आहे.

समजा दिवसभराचं एक कर्तव्य आहे. ते नाही केलं तर मनुष्य दीनवाणा होईल. ते त्याला करावंच लागेल. परमार्थ आहे म्हणून चालणार नाही. पण आता सुटीचा दिवस वाया घालवायच्याऐवजी जर परमार्थात घालवला तर मात्र बॅलन्सिंग होईल. आठ तास कष्ट केल्यावर तीन तास जपाला दिले तर ते चुकीचं होणार नाही. ते बॅलन्सिंग होईल. परमार्थामुळं जर एखाद्याला प्रपंचाची आठवणच उरली नाही तर परमार्थ नक्कीच त्याला सांभाळेल, उचलून घेईल.त्याचा प्रपंचही करील. पण ही फार उच्च अवस्था आहे. ती अपेक्षित धरता येत नाही.म्हणून सांगड हीच घालावी लागेल.

दोन्हींतले धोके काहींना दिसले. त्यांनी स्वत:चा प्रापंचिकांचा धोका तेवढा सोडवून घेतला. काय परमार्थ करायचा तो साठीनंतर करा. असं म्हणून त्यांनी त्यांची सोडवणूक आधीच करून घेतली. पण ज्यांना प्रपंच सेफ करणारी सांगड घालायची आहे त्यांनी पुढं काहीच केलेलं नाही. ते करायला पाहिजे. सांगड कशी घालावी, सुरुवातीला परमार्थ केल्यानं पुढचे धोके कसे टळतात,हे सांगणारं हे शास्त्र आहे.

ते शास्त्र त्या पद्धतीनं अंमलात आणलं तर लहानवयापासून सगळे तयार होतील. अपयशाला तोंड देऊ शकतील. आत्महत्या वगैरे करणार नाहीत. परीक्षेत नापास झालेली मुलं आत्महत्या करतात याचा

अर्थ त्यांना परमार्थ पहिल्यापासून मिळालाच नाही. म्हणून ते असं करायला जातात. नाहीतर त्यांना हे पटलं असतं की, हे काही अंतिम यश नाही, अजून पुढं खूप संधी आहे.

हे लक्षात येण्यासाठी ती सांगड घालण्याचीच गरज आहे.

*

५४. १. सृष्टीची, गुरुपदाची, विश्वात्मकाची इ. नव्या विविध आरत्या करण्यात काही विशेष कारण आहे का ?

२. उपासनेसाठी त्याचा उपयोग कसा करता येईल ?

आपल्याला सगुणाच्या आरत्या करण्याची पारंपरिक सवय आहे. विशेष सवय नसते ती निर्गुण स्वरूपाच्या गोष्टींच्या आरत्यांची. जसे सगुणाच्या आरत्यांचे उपयोग आहेत तसेच अशा निर्गुण स्वरूपाच्या गोष्टींच्या आरत्यांचेही आहेत. सृष्टी, गुरुपद, विश्वात्मक परमेश्वर अशा अनेक गोष्टी या अत्यंत व्यापक आहेत. त्यांची आपल्यावर खूप मोठी कृपा आहे. परंतु आपल्याला त्याची क्वचितच जाणीव असते. ती व्हावी आणि तशी कृतज्ञता व्यक्त करता यावी म्हणून या नव्या आरत्यांची निर्मिती झाली आहे.

या व्यापक असल्यामुळं सर्व पंथ, संप्रदाय अशा गोष्टींच्याही त्या पलीकडं आहेत. त्यामुळं त्यांचा उपयोग कुणाही माणसाला जागृत ठेवायला, कृतज्ञता जपायला, ती व्यक्त करायला म्हणजे अर्थातच साधनेलाही अवश्य करून घेता येईल. विशेषत: विश्वात्मकाची आरती ही कृतज्ञतेबरोबरच आत्मपरीक्षणाचं उत्तम साधन म्हणूनसुद्धा उपयोगी पडते, हा आपला अनुभव आहेच.

*

५५. शरीराला दुखापत झाल्यामुळं सारखा त्रास होऊ लागला. त्यावेळेला एकदम 'देहेदु:ख ते सुख मानीत जावे' हा मनाचा श्लोक आठवला. तर अशा देहदु:खाच्या वेळेला सुख कसं मानावं ?

सुखाची व्याख्या तुम्ही कशी करता यावर ते अवलंबून आहे. समर्थांना सुख म्हणजे हित अभिप्रेत आहे. ते सुख म्हणजे वेदना संपून एकदम आनंदाच्या लहरी येऊ लागल्या असलं काही नाही. त्याचं हित होतं आहे, हे ते बघतात.तेव्हा 'देहेदु:ख ते हित मानीत जावे'हे खरं आहे.

तुमच्या दृष्टीनं तुमच्या आयुष्यामध्ये समर्थांना कितपत महत्त्व आहे ? आपल्या कल्पनेच्या बाहेर महत्त्व आहे. त्यांनी हजारो माणसं त्या मार्गाला लावली. आजही त्या सर्वांचा उपयोग होतो. काल परवा तुमच्या आयुष्यात काही घटना घडून दुखापत झाली आणि त्यातून समर्थांची आठवण तुम्हाला झाली. त्यापूर्वी ती तशी तुम्हाला झाली होती का ?

आज तुम्हाला समर्थांच्या मनाच्या श्लोकाची आठवण का झाली तर दुखायला लागलं म्हणून आठवण झाली. आता तो हात दुखला म्हणून समर्थ आठवले. मग आता हे हिताचं घडलं की अहिताचं, हे ठरवा. आज जर हात दुखला नसता तर अजून आठ दिवस मला समर्थांची आठवण झाली नसती, इतकंच काय पुढं कधी झाली असती कुणास ठाऊक ?

आज श्लोकामुळं का होईना पण आठवण झाली. त्यामुळं समर्थांचं सगळं व्यक्तिमत्त्व आठवलं, मग त्यांनी सोसलेलं सगळं आठवलं. मग आपलं दु:ख ते काय हे जाणवलं. हे सगळं जाणवण्याचं कारण काय ? तर देहदु:ख होतं म्हणूनच. देहदु:ख नसतं तर याची आठवण तरी झाली असती का ?

समर्थांच्या एका स्मरणाचं आपल्या आयुष्यामध्ये काही स्थान असेल आणि ते हिताचं आहे असं जर तुम्हाला वाटत असेल तर ते हित घडवायला केवळ देहदु:खच आज कारणीभूत झालं. बाकी तुम्हाला समर्थांचं स्मरण करायला कुणीही अडवलेलं नाही. मनाचे श्लोक काढून बसू नका, दर्शन घेऊ नका असं कुणी म्हणलेलं नाही. सहज शक्य असतानासुद्धा गेल्या आठ दिवसांत ते आपल्याला शक्य होत नाही आणि देहदु:ख झाल्यावर मात्र पाच मिनिटांत आठवण होते. याचा अर्थ देहदु:ख हिताचं झालं की अहिताचं झालं ?

आपल्या दृष्टीनं देहदु:ख हिताचंच झालं. त्यांना हेच म्हणायचं आहे की, हित हेच आपलं सुख असतं. आपल्या सुखाच्या व्याख्या वेगवेगळ्या आहेत. त्यानुसार आपण सुख समजतो. पण जे हिताचं आहे ते खरं सुखाचं असतं. देहदु:ख तुम्हाला जितकं भगवंताच्या जवळ घेऊन जातं, तितकं दुसरं काहीच घेऊन जात नाही.

सुखातसुद्धा गुरूंची आठवण येणार नाही. पण दु:खात हमखास येते. त्यासाठी म्हणून देहदु:ख ही अत्यंत सुखाची गोष्ट आहे, असं समजून मनुष्य चालला तर तो सुखातच राहील. हे आपल्याला नेहमी अनुभवाला येतं. अपयशाच्या वेळेला, दु:ख, निराशेच्या वेळेला माणसाला भगवंताची आठवण येते. म्हणून जे जे निगेटिव्ह आहे ते ते आपल्याला पॉझिटिव्हकडं घेऊन जातं. त्याच्याकडं आपलं तसं लक्ष नसतं किंवा त्याचा आपल्याला तसा उपयोग करून घेता येत नाही.

म्हणूनच कुंतीनं देवाकडं काही मागितलं नाही. काहीतरी माग, एकदा तरी माग असं भगवंतानं म्हटल्यावर तिनं मागितलेलं आहे. द्यायचंच असेल तर मला दु:ख दे. कारण माणसाचं देहाशी इतकं तादात्म्य आहे की, त्याच्याइतकी तीव्र जाणीव त्याला कशाचीच होत नाही.

त्याच्या आयुष्यात कितीही चांगल्या घटना घडोत, ते घडवणारा कर्ता भगवंत असो, पण देहाला मुंगी जरी चावली तरी त्याचं स्मरण त्याला लगेच येतं. इतकं तादात्म्य माणसाचं दुसऱ्या कशाशीही नाही. तादात्म्यावर हे सगळं अवलंबून आहे. देहाशी तादात्म्य जास्तीत जास्त असल्यानं देहदु:खाचा संबंध जास्तीत जास्त येतो.

काकासाहेब तुळपुळे म्हणायचे, 'दु:खात आपण खऱ्या जगात वावरतो. म्हणून भगवंताच्या जगात वावरतो.' दु:ख हे माणसाचं खरं जग आहे. सुख हे आभास आहे. ज्याला आपण सुख समजतो ते आभासाचं असतं आणि संत बोलताहेत ते हिताचं आणि खऱ्या सुखाचं असतं.

त्यामुळं त्याला जाणारी वाट दु:खाचीच पण जवळची आहे. सुखाची वाट जवळची नाही. कारण सुखात देवाचा विसर पाडण्याची क्षमता आहे, तर दु:खात स्मरण देण्याची ताकत आहे. म्हणून दु:खाचा स्मरणाला उपयोग होतो. म्हणून दु:ख हे सुख म्हणजे हित मानीत जावं.

जो माणूस सुखात असताना भगवंताकडं वळू शकतो तो मुळामध्ये भाग्यवानच आहे. त्याच्याबद्दल काही न बोललं तरी चालेल. पण दु:खात भगवंताकडं वळण्याची जी संधी आहे ती आपल्याला घेता येण्यासारखी आहे. ती भगवंताकडं वळण्याची संधी दु:खाच्या रूपानंच येते.

बँकेच्या नोकरीत ज्यांच्याकडं किल्ल्या असतात त्यांना हा नेहमीचा अनुभव असतो की, जेव्हा रजेची गरज असते तेव्हा आधीपासून अर्ज, विनंती, फोन करूनही किल्ल्या घ्यायला कुणी माणूस तयार होत नाही. पण जर तुम्ही ताप भरून आजारी पडलात आणि तिथंपर्यंतही जाता येत नाही असं असलं तर जी माणसं विनंती करूनही किल्ल्या घ्यायला तयार होत नव्हती ती घरी जीप घेऊन येऊन किल्ल्या घेऊन जातात.

मग असा मिळणारा दिवस हा आपल्याला भगवंताकडं लावता

आला तर ते देहदु:ख सुखाचंच झालं नाही का ? म्हणजे ही जी संधी आहे ती केवळ या दु:खामुळं निर्माण झालेली आहे. नाहीतर ही संधी रजा घेऊनसुद्धा निर्माण करण्यासारखी आहे. पण ती होत नाही.

एरवीच्या सुखाच्या दिवसांतसुद्धा बाजूला राहून एक दिवस त्यानं काही करावं म्हटलं तर त्याला समाजही करू देणार नाही आणि त्याची स्वत:ची मनाची तयारीही असणार नाही. कुठलीही व्यवस्था त्याला अनुकूल असणार नाही. पण दु:खात कुणी चौकशीसुद्धा करायला येणार नाही. आनंदानं देवाच्या स्मरणात राहाता येईल. इतकी चांगली संधी केवळ दु:खानंच मिळेल.

म्हणजे दु:खाकडं कसं बघावं हेसुद्धा शिकण्यासारखंच आहे. देहदु:ख आलं की, माणसाला सगळ्या संधी उपलब्ध होतात. काकासाहेब म्हणायचे त्याप्रमाणं 'आजारपण हा एक तोटा आहे, पण त्याची भरपाई भगवंत करीत असतो. त्याकडं आपलं लक्ष पाहिजे.'

प्रत्येक गोष्टीची देव भरपाई करीत असतो. आजारी पडल्यावर तुमच्याबद्दल अनेकांची सहानुभूती व्यक्त होते. अनेकांचं असलेलं प्रेम व्यक्त होतं. त्यांना ते व्यक्त करण्याची संधी मिळते. तुम्हाला त्या निमित्तानं कळतं की, या माणसाला आपल्याबद्दल प्रेम आहे.

देहदु:खाला इतक्या बाजू असू शकतात. देहदु:ख ही वास्तविक कुणीही नको म्हणेल अशी गोष्ट आहे.पण सत्पुरुष कधीही म्हणत नाहीत की, मला देहदु:ख नको. कारण हेच आहे की, त्यांचं भरपाईवर लक्ष असतं. यामुळं माणसाला दुसऱ्याबद्दल सहानुभूती निर्माण होते. हा काय सोसत असेल याची कल्पना दु:ख स्वत:वर आलं तरच येते.

आपल्या बाजूनं प्रारब्धाची बाजूही आहे. ती तर सगळ्यात महत्त्वाची. माणसाचं प्रारब्ध कमी होणं हा जो देहदु:खाचा हिशेब आहे तो

तर सगळ्यात उत्तम. कारण हलका झाल्याशिवाय मनुष्य चालूच शकणार नाही. त्याच्या डोक्यावर ओझं असेल तर तो वेगानं कसा प्रवास करील ?

हे ओझं खाली ठेवण्याची संधी देहदु:खाच्या रूपानं आलेली असते. त्यावेळी ओझं कमी झालं की, हलकेपणानं पुढची वाटचाल होऊ शकते. ती करता यावी म्हणून देहदु:ख आहे, असं म्हटलं तर सगळं सुखाचंच आहे.

*

५६. साधना करीत असताना सुटलेल्या वासना पुन्हा चिकटण्याची शक्यता असते का ?

साधनेत राहावं लागतं तरच त्या वासना पुन्हा चिकटणार नाहीत. साधनेतून बाहेर गेल्यास परत चित्ताला मलिनता येण्याची शक्यता असते. हातपाय धुवून घरात आलं,आंघोळ करून शुचिर्भूत झालं की मग घरातच राहिलं पाहिजे, हे जितकं खरं आहे तितकंच ते खरं आहे.पुन्हा जर मैदानात जाऊन आला तर काही इलाज नाही.पुन्हा हातपाय धुणं आलं.

नाहीतर मग पूर्ण मुक्त व्हायला लागतं. चित्त पूर्ण वासनामुक्त झालेलं असेल तर हे शक्य असतं. मग काही त्याला स्पर्श होत नाही. भाजलेल्या बीजाला अंकुर फुटत नाही तसं.

आणि जर बीज इतकं भाजलं गेलेलं असेल तर मग चिंतेचं कारण नाही.

*

५७. आपल्या इथले संस्कार पाहाता, बाहेरील चंगळवादी,
भोगवादी परिस्थितीशी आम्ही कसं ॲडजेस्ट व्हावं ?

प्रश्नावरूनच प्रथम हे लक्षात येतं की, आपल्या इथले संस्कार आणि बाहेरची परिस्थिती यांत मुळात फरक आहे. आपले संस्कार चंगळवादी नाहीत. आपली संस्कृती मुळात भोगवादी नाही. ती त्यागवादी आहे.पण सध्याची संस्कृती ही भोगवादी आहे.म्हणूनच ही अडचण आहे.

खरं म्हणजे नुसतं त्यागी किंवा नुसतं भोगी राहाणं मुळात शक्यच नाही. तुम्हाला तुमची मर्यादा ठरवून घ्यावी लागते. किती प्रमाणात तुम्ही त्यागी राहू शकता यावर हे सगळं अवलंबून आहे. गरज वेगळी आणि चंगळ वेगळी. त्याग वेगळा आणि भोग वेगळा. चंगळवाद बाहेर आहे. मग गरज ओळखून राहिलं तर चंगळवादाशी ॲडजेस्ट करून राहाता येतं.

दुसरी गोष्ट, त्यागाची माझी मर्यादा किती आहे, किती प्रमाणात मी त्याग करू शकतो यावर मी किती प्रमाणात भोग स्वीकारतो ते अवलंबून आहे. माझ्या त्यागाच्या तयारीवर भोगवादाशी माझा सामना अवलंबून आहे.

मी उपाशीपोटी तर काम करू शकत नाही. पण काय खाऊन मी काम करू शकेन हे ठरवता येईल. त्यामध्ये चंगळ की भोग हा प्रश्न आहे. तो सोडवताना कुठंपर्यंत मला पुढं जाता येईल तिथंपर्यंत मी ॲडजेस्ट करू शकतो. ही प्रत्येकाची कुवत वेगळी आहे. कारण किती खाल्यावर पोट भरतं, हे ज्याच्या त्याच्या पोटावरच अवलंबून आहे. पण तरीसुद्धा सर्वसाधारणत: किती खाल्यावर पोट भरतं, हे ठरवता येतं.

आता एकच गोष्ट अशी आहे की जी किती खावी म्हणजे पोट भरेल हे सांगता येत नाही आणि ती गोष्ट म्हणजे पैसा.त्याच्या बाबतीत तो

किती ओतला म्हणजे पोट भरतं याचं उत्तर अजूनपर्यंत तरी सापडलेलं नाही. कारण जे ओतत चाललेले आहेत त्यांची पोटं अजूनही भरलेली नाहीत.

त्यामुळं असं लक्षात येईल की, त्याबाबतीत काही ठरवता येत नाही. सगळ्याचं सार आहे ते मूळ पैशामध्ये आहे. चंगळवादाचं, भोगवादाचं मूळ पैशामध्ये आहे. समजा आपण जर असं पाहिलं की, पैसा नसला तर मनुष्य किती भोगवादी राहील ? चंगळ करणं तर त्याला जमणारच नाही. मीठभाकरी मिळणं जिथं मुश्किल आहे तिथं चंगळीची कल्पनाच करू शकत नाही. म्हणजे मग आपण थोडीशी गरीबी स्वीकारली तर बरं होईल असं वाटतं.

याचा अर्थ दैन्यात राहावं असा नाही. दैन्य वेगळं आणि गरीबी वेगळी. दैन्य याचा अर्थ कुठलेही कष्ट न करता किंवा कुठलंही कौशल्य नसताना मनुष्य जर दुसऱ्याच्या जीवावर जगायला जाईल तर त्याला दैन्य म्हणतात. मनुष्य ज्यावेळेला कष्ट करून, प्रमाणात कष्ट करून उरलेला वेळ स्वत:च्या विकासासाठी देईल तर ती गरीबी होईल. ती स्वीकार्य आहे, विधायक आहे. सामाजिक गरजेची आहे.

स्वत:कडं उपलब्ध असलेल्या गोष्टी व्यवस्थितपणे योग्य प्रमाणात वापरून उरलेला वेळ स्वत:च्या विकासासाठी, तो विकास बाह्य वा आंतरिक कसलाही म्हणा, तो करण्यासाठी देईल तर ती बरोबर गरीबीची मर्यादा होईल. समजा आता त्याला पाच कपडे लागतील, पण पन्नास लागणार नाहीत, हे नक्की. हे आता त्यानं ठरवायचं आहे की इथं मला कुठं ॲडजेस्ट करता येईल. असं झालं तर या गरीबीच्या कल्पनेशी मी ॲडजेस्ट करू शकतो. जुळवून घेऊ शकतो.

आता ॲडजेस्ट करताना दुसऱ्या बाजूनं माझ्यावरती बाहेरचे

ताण आहेत. तर याला आपण गरीबी म्हणू नये. म्हणजे ती ॲडजेस्ट करता येईल. विनोबा म्हटले तसं, 'अल्पसंतुष्ट की आत्मसंतुष्ट' आपण आत्मसंतुष्ट आहोत असं जाहीर करावं. अल्पसंतुष्ट आहोत असं चुकूनही म्हणू नये. कारण लोकांना त्यांतला फरक कळत नाही. म्हणून ते आपल्याला नावं ठेवण्याची शक्यता असते.त्यामुळं आपण असं म्हणावं की, 'मला जे कष्ट करून मिळतं आणि जेवढं मिळवण्याची मला गरज आहे तेवढं मिळाल्यावर मी समाधानी असतो' असं खणखणीत उत्तर द्यावं.

मला जे मिळवायची गरज आहे ते मिळाल्यानंतर मी समाधानी असतो. त्यानंतर मी कष्ट जरूर करतो. आळशी राहात नाही. उत्पादक कष्ट करतो, पण ते कष्ट मी माझ्या पोटासाठी करीत नाही. ते मी विकासासाठी म्हणजे समाजाच्या, स्वत:च्या, आंतरिक व बाह्य सर्व प्रकारच्या विकासासाठी करतो. कारण उरलेला जो वेळ राहातो तो माझ्या विकासासाठी गरजेचा असतो. मनुष्य म्हणजे यंत्र नव्हे. पेट्रोल टाकलं की ते बारा काय चोवीस ताससुद्धा काम करील. तेसुद्धा शेवटी गरम होऊन बंद पडतं. यंत्र जे माणसानं निर्माण केलेलं आहे त्यालासुद्धा अशी अवस्था येते की ते त्याच्या ठरावीक क्षमतेपुढं काम करू शकत नाही.

पण मनुष्य जर त्याच्याही पुढं जायचा प्रयत्न करत असेल तर याचा अर्थ हे भोगवादासाठीच किंवा चंगळवादासाठी आहे. दुसरं काही नाही. त्याला त्याच्या गरजेच्या पलीकडं जायचं आहे म्हणून गरजेच्यापर्यंत जाणं ही त्याच्यासाठी ॲडजेस्टमेंट आहे. गरजेचं काय आहे हे आपल्याला कळतं. मनुष्याचं पोट जर दहा घासांनी भरत असेल तर त्याला अकरावा घास चालत नाही. मग त्या दहा घासांची क्वालिटी काय असावी यात पुन्हा चंगळवाद असू शकतो. तेव्हा गरजेवर भरपूर संशोधन करावं.

महाराजांनीसुद्धा म्हटलं आहे, 'गरजेपुरता प्रपंच करावा' हे बरोबर

आहे. पण गरजेपुरता म्हणजे किती ? गरजेची व्याख्याच जर झाली नाही तर पुढचा कितीही प्रपंच केला तरी तो गरजेचाच ठरू शकतो. म्हणून ज्यांचे दहा बंगले जेव्हा होतात, तेव्हा अकरावा त्यांच्या गरजेचाच असतो. कारण त्यांना थंड हवेला इकडं, उन्हाळ्यात तिकडं राहावं लागतं. त्यांच्या पाहुण्यांसाठी एक बंगला लागतो. असं जर होत गेलं ती गरजेसाठी पंधरा बंगलेसुद्धा लागतील. म्हणून गरज काय याचा अभ्यास करावा, असं माझं मत आहे.

ज्यांनी आपलं जीवन घडतं अशा आपल्या शरीराच्या, मनाच्या करमणुकीच्या गरजा कोणत्या याचा आपण विचार करू. समजा उन्हाळ्यात गरम हवा आहे. त्याकाळात त्याला महाबळेश्वरला जाऊन राहायला लागतं, हे मान्य आहे. जसं मनुष्यानं सहा दिवस काम केल्यावर एक दिवस त्याला विश्रांती लागते, हे मान्य आहे. सोलापूरचा, परभणीचा, नगरचा उन्हाळा त्या माणसाला सहन होत नाही. त्यासाठी त्यानं आठ दिवस महाबळेश्वरला येऊन राहाणं, हे बरोबर आहे. पण त्यासाठी त्याला महाबळेश्वरात स्वत:साठी प्लॉट घ्यावा लागेल का, हा माझा प्रश्न आहे.

गरज कशाला म्हणायचं हे आपण ठरवू शकतो. आता वर्षातून आठ दिवस महाबळेश्वराला जाण्यासाठी जो पैसा लागेल तो वर्षभर त्यानं साठवावा याबद्दल काही प्रश्न नाही आणि आठ दिवस तिथं जाऊन आराम करून तो बदल त्यानं करून घ्यावा, यातही काही प्रश्न नाही. कारण त्याशिवाय त्याची तंदुरुस्ती, मनाची, चित्ताची अवस्था चांगली राहाणार नाही. अर्थात ही ज्याची त्याची गरज आहे. त्यानुसार तो हे करू शकतो.

आता हेच त्याला महाबळेश्वरला जावं लागेल की कासच्या पठारावर गेलेलं चालेल हा गरजांच्या संशोधनाचा विषय आहे. कारण तुम्ही क्षणभर जर विचार केलात की, पुण्याहून आपण जेव्हा नवीन

बायपासनं बोगद्यानं येतो, त्यावेळी काही शे-हजार फूट खोल दरी आहे व तिच्यावर एक पूल टाकला आहे. आजची कॉम्प्युटरवर खेळली जाणारी उत्कृष्ट प्रकारची जी रेस मुलं खेळतात त्या ॲनिमेशनमध्ये जे उत्तमात उत्तम वातावरण निर्माण केलेलं आहे, ज्याच्यावरनं गाड्या पळतात ते वातावरण तिथं प्रत्यक्ष आहे.

ते आपल्यापासून अक्षरशः तास-दीडतासावर आहे. ज्याला तिकिटाच्या भाषेत पन्नास किंवा साठ रुपये लागतात. मग तिथं जाऊन एक दिवस जरी मनुष्य बसून राहिला तरीसुद्धा त्याला दोनशे ते तीनशे रुपये खर्च येईल. आता ही त्याची गरज भागवायला वर्षभर त्याला किती मिळवावं लागेल आणि महाबळेश्वरला प्लॉट किंवा बंगला घेऊन ठेवायला किती राबावं लागेल, हे त्यानं ठरवावं. ही गरजेची परिभाषा कशी करायची, सोडवणूक कशी करायची यासाठी उदाहरण म्हणून मी हे सांगितलं.

आता महाबळेश्वरचा बंगला याला वर्षातून आठ ते पंधरा दिवस लागणार आणि उरलेले जे वर्षाचे तीनशे पंचावन्न दिवस राहाणार ते त्याची काळजी करण्यात जाणार.याचा विचार माणसाला जर सुचला नाही तर तो जीवनात अस्वास्थ्याला आमंत्रण देईल. यापेक्षा दुसरं काही होणार नाही.

म्हणून गरजेची शुद्ध व्याख्या करावी आणि गरज ठरवल्यावर त्यावर कायम राहावं की एवढी माझी गरज आहे. या गरजेच्या पलीकडं जाण्याची मला आवश्यकता नाही आणि याच्यात मला काहीही कमीपणा वाटत नाही. कारण उरलेला सर्व वेळ मी, निम्मा माझ्यासाठी व निम्मा समाजासाठी देतो.

गरजेसाठी एखाद्याला, जर नोकरी कमी पैशाची असेल, तर बारा तास काम करावं लागेल. तेच एखादा कुशल कामगार असेल तर ते काम तो सहा तासांत करील. माणसाची कुवत उदाहरण म्हणून आपण समजू

की बारा तास काम करण्याची आहे. त्या माणसाचा महिन्याचा खर्च समजा पाच हजार रुपये आहे आणि ते मिळवायला त्याला बारा तास राबावं लागतं. कारण त्याला कुशलता नाही म्हणा वा संधी नाही म्हणा. अशा वेळी राहिलेला झोपेव्यतिरिक्त जो वेळ असेल तो वेळ तो माणूस स्वत:च्या विकासासाठी देऊ शकेल. यापेक्षा त्याच्याकडून अपेक्षा बाळगण्यात अर्थ नाही.

पण जो कुशल माणूस आहे, जो बारा तासांचं काम सहा तासांत करतो आहे, त्यानं उरलेले सहा तास स्वत:च्या व समाजाच्या विकासासाठी द्यावेत. कारण हा कुशल माणूस जेव्हा बारा तास राबेल तेव्हा तो कामाचे ढीग निर्माण करेल आणि जेव्हा सहा तास राबून तीन तास समाजासाठी व तीन तास स्वत:साठी देईल त्यावेळी तो सर्वत्र शांततेसाठी व्यवस्था निर्माण करील.

सर्व कर्मांमध्ये जगाच्या शांततेसाठी आपण काय केलं असा विचार केला तर मी नुसता गप्प बसलो हीसुद्धा खूप मोठी मदत आहे. मी एखादं समाजकार्य केलं तर हीसुद्धा मोठी मदत आहे. ते काय स्वरूपाचं कार्य करतात याच्यावर अवलंबून नाही. समाजकार्य म्हणून चौकात पाचशे वॅटचे माईक-लाऊडस्पीकर लावून ठेवले, जे गणपतीत आपण पाहातोच, तर याला समाजकार्य म्हणणं म्हणजे समाजाच्या शांततेला मदत आहे की अशांतीला हे आपणच ठरवायचं आहे.

आता जगाची शांतता म्हणजे केवळ आवाज नसणं असं नव्हे. ज्यावेळेला कुशल माणूस तीन तास दुसऱ्यासाठी-समाजासाठी राबतो त्यावेळेला दुसऱ्या माणसाला काही सुखसोयी उपलब्ध करून देऊ शकतो. आपण एका डॉक्टरचं उदाहरण घेऊ. समजा सहा तास काम करून त्याची गरज भागते आहे तर उरलेला वेळ तो ज्यांना औषधं परवडत नाहीत,

चिकित्सेचा खर्च परवडत नाही त्यांच्यासाठी विनामूल्य सेवा म्हणून देऊ शकतो. त्या तीन तासांमुळं गरीबांमध्ये शांतता निर्माण होऊ शकते. अशा अर्थानं इथं शांतता अभिप्रेत आहे.

मग चंगळवाद, भोगवाद आणि त्यागवादाचा समन्वय होईल. गरजा, मर्यादा कळतील, वैयक्तिक व सामाजिक शांतता येईल.जिथं गरजेवर मनुष्य थांबतो तिथं स्पर्धेचं वातावरण नसतं. मनुष्य गरजेच्या पलीकडं जायला लागला की स्पर्धा सुरू होते. कारण तुम्ही महाबळेश्वरला एक प्लॉट घेतला तर मला दोन घ्यावे लागतात. तुम्ही महाबळेश्वरला घेतलेत तर मी महाबळेश्वरला आणि पाचगणीला घेतो, ही माझी अडचण आहे.

हे निर्माण होतं कारण मीच मुळात महाबळेश्वरला प्लॉट घेतले. मी महाबळेश्वरला जायला वर्षातले आठ दिवसांचे पैसे जर साठवत असेन तर त्याच्यामध्ये स्पर्धा निर्माण होत नाही. कारण तोही फारतर आठ दिवसांचे पैसे साठवील. यापेक्षा आणखी काही होणार नाही. म्हणजे स्पर्धा कशी आणि कुठून निर्माण होते ? यापुढच्या चढाओढीनं, गरजेच्या बाहेर गेल्यावर स्पर्धेचं युग निर्माण होतं. स्पर्धेचा पासवर्ड गरजेमध्ये आहे.असं आत्ता तरी आपण समजून चालू. आणखीन उत्तरं मिळाली तर चांगलीच गोष्ट आहे.

ज्यावेळेला मी पोटासाठी जेवतो व माझं पोट भरतं त्यावेळेला माझी पोटाशी कसलीही स्पर्धा नसते.पण ज्यावेळेला मी श्रीखंडपुरी खाणार असेन त्यावेळेला दुसऱ्याची गुलाबजाम खाण्याची स्पर्धा सुरू होते. आपल्याकडं जेव्हा लोकांची व्यवस्था आपण करतो तेव्हा व्यवस्थेमध्ये काय होतं ? मी एक गाडी घेतली तर तो दोन घेतो. कारण माझी गाडी मी मुळात गरज नसतानाच घेतलेली आहे. असं जेव्हा असतं तेव्हा एकाला दोन,दोनाला चार,मग हे मॉडेल घेऊ का ते असं आपलं सुरू होतं.

मी जर गरजेच्या मर्यादेत असेन तर मी कुणाशीच स्पर्धा करण्याचं

कारण नाही. कारण माझं पोट भरलेलं आहे. माझे चार घास मिळालेले आहेत. आता जर स्पर्धा निर्माण झाली तर सेवेत होईल आणि ती होऊ द्यात. तिनं माणसाचं नुकसान व्हायचं नाही. तुम्ही समाजासाठी तीन तास राबता तर मी चार तास राबेन, हे होईल. त्यामुळं झालं तर देशाचं, समाजाचं भलंच होईल.

तेव्हा स्पर्धेचं युग म्हणजे असं काही मोठं विचार करायचं कारण नाही. स्पर्धा म्हणजे दुसऱ्यांशी विघातक तुलना करून स्वत:च्या जीवनात अनावश्यक असलेली धावपळ करणं होय. अशी अकारण स्पर्धा जीवनात टाळण्याजोगी अशी अशांती निर्माण करते. जी माणसं गरजेच्या बाहेर जात आहेत त्यांच्यामध्ये अकारण स्पर्धा आहे. गरजेच्या बाहेर गेलेल्या माणसांनी स्वत:च्या जीवनामध्ये आणि इतरांच्या जीवनामध्ये निर्माण केलेली अशांतता म्हणजे स्पर्धेचं युग आहे.

आणखी एका बाबतीत काही वेळेला तुम्हाला स्पर्धेचा प्रश्न येतो. तुम्हीच मुळात कमी क्वालिटीचं काम करता किंवा करू शकता म्हणून स्पर्धेचा प्रश्न येतो. समजा एक पेशंट आहे. तो तुम्ही तुमच्या तत्परतेनं शंभर टक्के पाहिलेला आहे. तुमची कुवत जेवढी आहे तेवढा पाहिलेला आहे. कुवतीत तर फरक असू शकेल. माझ्यापेक्षा दुसरा एखादा तज्ज्ञ असू शकतो. याचा गुणांशी संबंध आहे, हे जर मला कळलेलं असेल तर त्याच्याशी स्पर्धा करण्याचं मला काहीच कारण नाही. कारण का तर गुणांमध्येच फरक आहे.

कुवतीमध्येच जर फरक असेल तर सत्तर, ऐंशी, नव्वद हा फरक राहाणारच. तो मला का मान्य करता येत नाही ? तो जर मी मान्य केला तर नव्वद मार्क असलेल्याशी स्पर्धा करायचं काही कारणच नाही. माझी कुवत जर साठची आहे तर त्या साठला साठचं काम मी करतो आहे की

नाही ही अडचण आहे.मी साठच्या खालचं चाळीसचं काम करतो म्हणून स्पर्धेचा प्रश्न येतो. कारण तो जर मुळात ऐंशीचा असेल तर तो ऐंशीचं काम करणारच आहे.

मला जर चार तास राबावं लागत असेल तर ऐंशीवाल्याला तीन तासच राबावं लागेल. असं झालं तर त्याला मिळालेला मोकळा वेळ तो समाजसेवेला देईल. तसं जर तो करीत नसेल तर त्या तीन तासांत तो इतरांचं आठ तासांचं तर लुबाडतो, पण पुढं अजून काम करीत राहून पुढच्या अनेक वर्षांचं मिळवून ठेवतो आणि देतही नाही. मग अशांती निर्माण होते.

स्पर्धेचा घोटाळा इथं झालेला आहे. मुळात माझी मला ओळख नाही इथूनच प्रश्न निर्माण होतात. ' स्वत:ला जाणा ' असं का म्हटलं आहे, कारण तिथंच याचं खरं उत्तर आहे. ते नसलं म्हणजे मग पुढचे हे सगळे प्रश्न निर्माण होतात. मी माझ्या गरजेच्या बाहेर जाण्यानं स्पर्धेचं युग घरात आणतो. नाहीतर माझ्या घरात स्पर्धेचं युग असायचं काही कारण नाही.

दोन माणसांमध्ये स्पर्धा निर्माण होते, याचं कारण म्हणजे माझ्या गुणांचं तसंच उणिवांचं आकलन आणि स्वीकार मी करत नाही म्हणून.असं माझं मत आहे.अगदी घरातसुद्धा समजा दोन माणसं आहेत. त्यांतला एक जण बुद्धिमत्तेनं श्रेष्ठ आहे आणि मी समजा बुद्धिमत्तेनं कनिष्ठ आहे. मग माझी बुद्धिमत्ता कनिष्ठ आहे हे मान्य करण्यात अडचण काय आहे ? ती जर मी मान्य केली तर माझ्या बुद्धिमत्तेप्रमाणं जे काम असेल ते मी करेन व जास्त बुद्धिमत्तेचं काम असेल तर ते त्याला सांगेन की,हे तुम्ही करा.

डॉक्टरांचा एखादा पेशंट जेव्हा हाताबाहेर जातो, तेव्हा ते दुसऱ्या एखाद्या डॉक्टरला सांगतात की,हे तुम्ही बघा म्हणून.हे का,तर तिथं माझ्या

नाईलाजानं मला ते आकलन झालेलं असतं. तेव्हा ते स्वत:च्या मनानं, मनापासून मान्य करावं. म्हणून तर गुणांचं आकलन हा पाया आहे. ही स्पर्धा जोपर्यंत मनात असते तोपर्यंत तिचं रिफ्लेक्शन(प्रतिबिंब) आणि परिणामही बाहेर दिसत राहातं.

मी काय करू शकतो, मी जगातली स्पर्धा नष्ट करू शकत नाही. माझ्या गरजेच्या बाहेर मी जायचं नाही एवढं ठरवू शकतो आणि माझ्या गुणांचं,उणिवांचं आकलन आणि स्वीकार मी करू शकतो. त्यामध्ये स्पर्धेची मुळं आहेत. माझी जेव्हा एखादी कुवत नसते, कुवत नसताना मी मान्यही करीत नाही आणि त्यानुसार वागतही नाही त्यावेळेला ज्याची कुवत असते त्याच्याशी स्पर्धा निर्माण होते. माझी कुवत नसताना आणि मला ती मान्य असताना स्पर्धेचा प्रश्नच येत नाही.

तो जर हजार मीटर धावणारा माणूस असेल तर त्याच्याशी शंभर मीटर धावणाऱ्या मी स्पर्धा करायचं काहीच कारण नाही. तुम्ही आहात तिथं उत्कृष्ट होता की नाही यावर तुमची मुक्ती अवलंबून आहे. तुम्ही हजार मीटर धावता की नाही यावर ती अवलंबून नाही.तेव्हा स्वत:चं आकलन असावं, त्याचा स्वीकार असावा. त्यातल्या त्यात जेवढा सर्वांत जास्त एक्सलन्स (उत्कृष्टता) तुम्हाला देता येईल तेवढा द्यावा. स्पर्धा कशातून निर्माण होते, हे लक्षात घ्यावं. त्याचं मूळ गरजा ओलांडण्यात असतं, ते लक्षात ठेवावं. माझ्या गरजा शोधाव्यात.

जर मी गरजांच्या पलीकडं गेलो तर मी अशांततेला निमंत्रण दिलेलं आहे आणि या सर्व लोकांच्या गटामध्ये जाऊन पडलेलो आहे. आता माझं जे व्हायचं ते होईल.अशा प्रकारच्या परिस्थितीला मला सामोरं जावं लागेल. त्यापेक्षा मी माझी गरज ओळखून जर राहिलो तर माझ्याबरोबर स्पर्धेचं युगही मागं हटेल.

एक्सलन्ससाठीची स्पर्धा वेगळी आणि फायद्यासाठी वा दुसऱ्याला खेचण्यासाठीची स्पर्धा वेगळी.त्यामध्ये चांगल्या-वाईट पुन्हा आहेतच. त्यातलं जे वाईट आहे त्याबद्दल आपण बोलतोय. स्पर्धा का निर्माण होते तर गरजेपेक्षा जास्त निर्माण करतो म्हणून. हे लक्षात ठेवलं तर या स्पर्धा टळतील. माझ्याकडं वेळ राहील आणि तो माझ्या विकासासाठी वापरता येईल. आज या सगळ्यामध्ये विकास कुठंच नाही. म्हणून इथं यायची वेळ येते.

ही पैशाची जंगलं झालेली आहेत. त्यातून निर्माण काहीच होत नाही. मग मन:शांतीसाठी उत्तरेत जा, दक्षिणेत जा अशी ही लोकं हिंडत राहातात. कारण त्यांनी मुळातच आपल्या गरजा ओलांडून हे सर्व तयार केलेलं आहे. त्याच्या गरजेला जर त्याला कामच करावं लागत असेल तर त्याला समाजाच्या विकासासाठी सवडच मिळणार नाही, गरजही नाही. कारण त्याच्या गरजेचं काम त्याच्या कुशलतेवर अवलंबून आहे. हे काम केल्यावर त्याचा जो वेळ आहे तो त्यानं स्वत:च्या विकासासाठी द्यावा. म्हणजे समजा तो स्वत:च मौन पाळतोय, तर त्याला शांततेसाठी आणखी कुठं जाण्याची आवश्यकताच नाही.

आता मूळ प्रश्नाची सुरुवात आहे. इथले संस्कार काय आहेत ? एका वाक्यात सांगायचं तर 'माणसाच्या अंतर्बाह्य विकासाचा समतोल' हा इथला संस्कार आहे. आपल्याकडं बाह्य विकासाची परिसीमा गाठणं म्हणजेच संस्कार झाला आहे. तिथं घोळ झाल्यामुळं सर्वत्र अशांतता आणि आपल्या सर्वांच्या वाट्याला असं आयुष्य येतं.

हे फरक लक्षात आले तर बरोबर काय करावं हे लक्षात येईल. त्याचं सर्वांचं मूळ पुन्हा आपले गुणधर्म, कर्मांची निवड, आकलन आणि स्वीकार या गोष्टींशी आहे. हे सर्व जर आपण पाळलं तर समाजाचे प्रश्न

वाढण्याऐवजी कमी होतील. अशांततेचे प्रश्न कमी होतील, शांतता वाढेल. कारण या सर्वांची उत्तरं यामध्येच आहेत. मग आपण समाजकार्य किती करावं, ते कोणत्या प्रकारचं करणं गरजेचं आहे हे ठरेल.

ते प्रसिद्धीचं काम आहे, म्हणून करण्यात येणार नाही. झाड लावायचं, फोटो काढायचा आणि पुढं पाणी घालायला मात्र कुणी नाही. पुढच्या वर्षी त्याच खड्ड्यात झाड लावायचं. हे जे काम आहे ना ते गरजेपोटी नाही.लावलेल्या झाडाला पाणी घालायचं असेल तर तुमचा फोटो निघणार नाही. कारण तुम्ही लावलेल्या झाडाला पाणी घालता आहात. बाहेरचं काम हे असंच चाललेलं आहे.

आहे त्या देवळात पूजा करायला कुणी नाही आणि तुम्ही नवीन देऊळ उभं करताय. खरं म्हणजे जुन्याचा जीर्णोद्धार करावा, त्या देवाला जात जावं हे गरजेचं काम आहे. ते ज्यानं कुणी निर्माण केलं ते गरज होती म्हणूनच निर्माण केलं ना ? सामाजिक घटक आणि गरजा याचा विचार करूनच ते निर्माण केलं.

मग अशी सामाजिक गरजेची कामं मागं पडतात, उपेक्षित राहातात. उथळ आणि सवंग कामांची, वक्तव्यांची आणि प्रसिद्धीची सवय इतकी होते की, ते बरोबर वाटू लागतं. लागलेल्या झाडांना पाणी घालून, त्यांची निगा राखून, कुठल्या फोटो-प्रसिद्धीची अपेक्षा न करता काम करणारा अडाणी वाटतो. इकडं वृत्तपत्रात अन् पडद्यांवर झळकणारे आदर्श वाटतात. मग तसं होण्यात पुन्हा स्पर्धा सुरू होते, ती किती फोल असते हे वेगळं सांगायला नको. म्हणून तो जीर्णोद्धार व पूजा अधिक महत्त्वाची आहे.

एवढे विचार अशा अनेक बाबतीत केले तर निकोप, सरळ, सहज व शांत जीवन जगणं शक्य होतं. त्यात सामाजिक स्वास्थ्य आणि खरी प्रगतीही सामावलेली आहे.

*

५८. मंदिराची गरज आहे की नाही ?
आणि मंदिरांमुळं एवढे गोंधळ का दिसतात ?

मंदिरांची गरज तर आहेच. आदर्शाला कुठंतरी स्थान असावं म्हणून मंदिरांची गरज आहे. अडचण पुढं सुरू होते.

मंदिरांच्या हळूहळू इस्टेटी होतात आणि पूजेचे हक्क निर्माण होतात. त्याचे वारस लागलेले असतात. अनेकदा त्यांना स्वत:ची उपासनेची गरज कळत नाही. मंदिराची त्यापेक्षा कळत नाही. म्हणून हे सगळे प्रश्न निर्माण होतात. त्यांना मंदिरांची खरी गरज कळली असेल तर ते म्हणतील, अरे माझ्या नावावर कशाला, तुझ्या नावावर घे पण मंदिर चालू देत. कारण मला मंदिराची गरज आहे. मंदिराच्या इस्टेटीची नाही. इस्टेट म्हणजे नुसत्या इमारती, जमिनी, उत्पन्न, पैसा एवढंच नसून त्यात पदं, मान, प्रतिष्ठा अशा अनेक गोष्टी येतात. आज जुन्या मंदिरांचे वाद त्याच्यासाठी आहेत. मंदिर, देव व पूजा यांची गरज ओलांडली, ती ओळखली नाही म्हणून वाद आहेत. गरज इस्टेटीची नव्हती, मंदिराची होती. मंदिराची गरज जर असती तर ते कुणाच्या नावावर आहे हा विचार केला नसता. शांततेला जागा आहे आणि आदर्शांना स्थान आहे म्हणून मंदिर आहे.

पुजाऱ्याला काय देवाची गरज नसते का ? फक्त भक्तालाच ती असते का ? तर नाही. ती जशी भक्ताला असते तशी पुजाऱ्यालाही ती असते. हे जर पुजाऱ्याला कळलं तरच त्याची पूजा मनापासून होईल.पण तो जर वारस म्हणून पूजा करायला लागला तर ती मनापासून व्हायची नाही. गरज आहे म्हणून पूजा होत असेल तर त्यानं ती केली काय आणि भक्तानं ती केली काय सारखंच आहे. मग तोही वाद संपला.

मूळ मिळवायच्या हेतूच्या बाहेरचं काही मिळवायचं असलं की

घोटाळा होतो.मूळ घटक जो आहे तो गरजेचा आहे म्हटल्यावर त्याच्यासाठी तुम्ही जे कराल ते बरोबरच असणार. पण त्या घटकाच्या बाह्य काहीतरी मिळवायचं आहे म्हटलं की प्रश्न निर्माण झाला.जे झाड मरतंय त्या झाडाला पाणी घालणं हे नवीन झाड लावण्यापेक्षा जास्त गरजेचं काम आहे.

अशा तऱ्हेनं गरज ओळखून काम करता येईल. पण अशा कामात तुम्हाला प्रसिद्धी मिळणार नाही. तुम्हाला मुळात झाडांबद्दल प्रेम आहे आणि आहे ते झाड जर जगवायचं आहे तर प्रसिद्धीची गरजच काय ? प्रसिद्धी ही माणसाची गरज नाही. पोटाला घास ही माणसाची गरज आहे. त्या कामाचं जे मूल्य आहे ते होतच असतं. झाड तुम्हाला आशीर्वाद देणारच आहे आणि तो अशा वेळेला उपयोगी पडेल की जेव्हा ते डोक्यात पडायची वेळ येईल. उदा. तुम्ही झाडाखालनं पुढं जाल आणि मग ते पडेल वगैरे. हे असमाधानाचं जे झाड आहे ते कधीतरी माणसाच्या डोक्यात पडतंच. त्यावेळेला मनुष्य निभावतो. कारण त्यानं झाडाची पूजा केलेली आहे. म्हणूनच निभावतो आणि झाडाचा आशीर्वाद पोचतो.

तेच मंदिरांचं झालं आहे. आहे ते मंदिर आणि विशेषत: त्यातला देव मला गरजेचा असेल तर त्यासाठी हेच मंदिर गरजेचं नाही. कुठल्याही मंदिरात जा, दर्शन घ्या, उपासना करा, तरून जा. खरा परमार्थ खरोखरच सहज नि सरळ असतो. पण मला त्याच मंदिरात अन् त्याच मूर्तीची उपासना, पूजा हवी कारण ती एका बाजूनं माझ्या हक्काची आहे, मालकीची, वहिवाटीची जागा आहे. दुसऱ्या बाजूनं तिथं येणाऱ्या भक्तांचं नि उत्पन्नाचंही वळण बसलं आहे, त्याचीही मला सवय झाली आहे. आता गोंधळ का आहे ते स्पष्ट आहे.

*

५९. आत्मज्ञानासाठी सद्‌गुरूंची आवश्यकता आहे की नाही ?

स्वत:चा अहंकार व भ्रम स्वत:ला दूर करता आला तर आत्मज्ञान होण्याकरता गुरूंची आवश्यकता नाही. कोणत्याही प्रकारचा अहंकार जर माणसाला स्वत:चा स्वत:ला दूर करता आला तर आत्मज्ञान स्वत:चं स्वत:ला करून घेणं शक्य आहे.

ते होईल की नाही याची जर आपल्याला खात्री नसेल तर सद्‌गुरूची आवश्यकता आहेच आहे. त्याला पर्याय नाही. त्यावेळी सद्‌गुरूच उभा राहील आणि म्हणेल, ठीक आहे. मी सांगतो ते कर म्हणजे तुझं काम होईल. म्हणजे याचा अहंकार जाईल. त्यावर हे सगळं अवलंबून आहे.

आत्मज्ञानात सर्वांत मोठी अडचण अहंकाराची आहे. ती ज्याला स्वत:ला दुरुस्त करता येते त्याला सद्‌गुरूची गरज नाही. ज्याला ती करता येईल की नाही याची खात्री वाटत नाही त्याला सद्‌गुरूंची आवश्यकता आहे.

भ्रमाची अडचण आधीच एक मोठी अडचण आहे. माझ्यात अहंकारही नाही आणि मला आत्मज्ञानही झालं आहे असा भ्रम ती उत्पन्न करते, हे आपण पाहातो. तो भ्रमसुद्धा स्वत:ला दूर करता आला तर गुरूची गरज नाही. भ्रमात गुरू आरशासारखं काम करतो. एखाद्यानं त्याचा चेहराच स्वच्छ ठेवण्याचे खरे व प्रामाणिक कष्ट घेतले असतील तर आरशाची गरज नाही. पण ते विरळाच. एरवी आपण भ्रमात आहोत की नाही हे गुरूच्या आरशात, प्रतिक्रियांतच कळेल.

म्हणून निदान या दोन्हींसाठी तरी गुरूची गरज लागते, पुढं साधनेची गरज लागते ती वेगळीच.

*

६०. गुरुकृपा हा प्रयत्नाचा विषय की प्रारब्धाचा ?

सद्‌गुरुभेट हा प्रारब्धाचा विषय तर सद्‌गुरुकृपा हा प्रयत्नाचा विषय आहे. सद्‌गुरुभेट ही प्रारब्धानं होईल, पण कृपा मात्र प्रयत्नानंच होईल. कारण कृपा आधी असतेच, फक्त तुमच्या प्रयत्नानं तिला आत येता येतं. जसं दार उघडल्यावर सूर्याला आत येता येतं. सूर्य असतोच, पण आपण दार उघडल्यावर त्याला आत येता येतं.

प्रयत्न जर केले नाहीत तर तुमच्या दारात सूर्य असूनही घरात अंधार असू शकतो. कारण तुम्ही दारं, खिडक्या उघडायचेसुद्धा कष्ट घेतलेले नाहीत. दारं, खिडक्या उघडायचे कष्ट घेणं म्हणजे माणसाचे प्रयत्न. तेवढे त्यानं करायला पाहिजेत. तेही जर तो करणार नसेल तर मग प्रारब्धाला तरी दोष कशाला द्यायचा ? प्रयत्नांचीच कमतरता आहे.

पूर्वकर्मानुसार एखाद्याची गुरूची भेट लवकर होते, काहींची थोडी उशीरा होते, काहींची शेवटी शेवटी होते, हे होऊ शकतं. कारण ज्याची त्याची पूर्वकर्म आहेत त्यानुसार गाठ पडायचा काळ मागंपुढं असू शकतो. पण कृपा हा मात्र प्रयत्नांचाच विषय आहे. तुम्ही प्रयत्न करताहात आणि सूर्याची किरणं आत यायला तयार नाहीत असं कधी होईल का ? सूर्य उगवलेला आहे, तो दारात आहे, तुम्ही दार उघडलेलं आहे पण तो आत यायला तयार नाही असं कधी होऊ शकत नाही.

*

६१. वृद्धत्वाची तयारी कशी करावी ?

वृद्धत्वाची तयारी कशी करावी याआधी कृपया वृद्धत्वाची तयारी कधी करावी हे लक्षात घेऊ. वृद्धत्वाची तयारी लहानपणी किंवा तरुणपणीच करावी. विचार करण्याची क्षमता आल्यावर ती करायला लागायला हरकत नाही. प्रौढपणीसुद्धा अशी तयारी करणं अवघड होत जातं, कारण त्यावेळी वृद्धत्व फार जवळ आलेलं असतं, जबाबदाऱ्या खूप वाढलेल्या असतात, कार्यक्षमतांचे शेवट दिसू लागलेले असतात. त्यावेळी असले वृद्धत्वाच्या तयारीचे विचारसुद्धा खूप भीतीदायक वाटतात.

प्रथम लक्षात घ्यावं की, वृद्धत्व हा निसर्गक्रम आहे. शक्ती आणि कर्तृत्वाचा तो उतार आहे. प्रौढपणापर्यंत ज्यानं अहंकार जोपासला आहे, त्यांनाच वृद्धत्व जास्त कठीण जातं.म्हणून त्यातल्या त्यात अहंकार सोडण्याची तयारी ही वृद्धत्वाची सर्वसामान्य तयारी आहे. वृद्धत्वामुळं वर म्हटल्या तशा मर्यादा पडत जात असल्या तरी ते नैसर्गिक असल्यानं योग्य असतं, हे समजून घ्यायची गरज असते. म्हातारपणी दिसत नाही म्हणून पुस्तक वाचता येत नाही असं नसून, दिसत असताना तुम्ही ते वाचलेलं आहे, असं निसर्ग गृहीत धरतो. म्हणून तक्रारीपेक्षा जेव्हा उत्तम दिसतं तेव्हाच वाचण्याची गरज असते. हेच इतर बाबतीतही असतं.

वृद्धत्वाच्या तयारीत समजूत हीच एक महत्त्वाची गोष्ट आहे. एक समजूत असली तर वृद्धत्वातल्या अपरिहार्यता, त्याचा आनंदानं स्वीकार अशा अनेक गोष्टी साधतात. दुसऱ्या बाजूनं वृद्धत्वामध्ये अनेक चांगल्या गोष्टीही असतात. ज्यानं व्यवस्थितपणे आधीचं आयुष्य घालवलेलं आहे त्याला वृद्धत्व स्थैर्य, अनुभवांची श्रीमंती, याही स्थितीत करण्यासारखी कामं शोधणं अशा अनेक गोष्टी करून वृद्धत्वाची तयारी करता येते.

*

६२. दुश्चित्तपणा म्हणजे काय ?

सावधानतेच्या अभावामुळं ज्या अनेक घटना घडतात त्यांतली दुश्चित्तपणा ही एक आहे. आपण जे काम करतो आहोत त्या ठिकाणी चित्त नसणं म्हणजे दुश्चित्तपणा. साध्या भाषेत स्वैपाक करताना स्वैपाकात लक्ष नसणं हे दुश्चित्तपणाचं लक्षण आहे.

याचं मूळ कारण बेसावधता आहे. बेसावधपणा म्हणजे स्वैपाकात लक्ष नसणं असं नाही. बेसावधपणाच्या कितीतरी गोष्टी असू शकतील - घरात लाईट राहील, हिशेबात चूक होईल काहीही होईल. बेसावधपणा असल्यास तो कुठंही प्रतिबिंबित होईल.

सावधानता हा फार मोठा विषय आहे. 'सावधानतेत परमार्थ आहे.' असं महाराजांनी म्हटलं इथंपर्यंत तो मोठा विषय आहे. दुश्चित्तपणा ही त्यातली एक गोष्ट आहे. ही केवळ त्यातली एक दिसणारी गोष्ट आहे.

सावधानता टिकवण्याचा प्रयत्न सावधानता असते तोपर्यंतच शक्य होतो. ही न सुटणारी अडचण आहे. पुन्हा जाग येईपर्यंतचा वेळ गेला, हा याचा तार्किक शेवट (लॉजिकल एंड) आहे. बेसावध झाल्यानंतर होणाऱ्या तोट्यानं तो माणूस जागा झाला तरच पुन्हा सुरुवात होते.

माणसाला बेसावधतेचे, दुश्चित्तपणाचे तोटे लक्षात यावे म्हणूनच खरं तर वाढदिवस साजरे करायचे असतात. सावधानतेत किती वाढ झाली हे पाहाण्यासाठी ते आहेत. यासाठी एक प्रयोग आहे, आपल्यावर सॉरी म्हणायचा प्रसंग किती वेळा आला हे पाहावं आणि असा प्रसंग संतांवर किती वेळा आला हे पाहावं. हा छोटासा पण चांगला प्रयोग आहे. महाराजांनी एखाद्याला सॉरी म्हटलं असं त्यांच्या चरित्रात किती वेळा आढळेल आणि आपल्या आयुष्यात किती वेळा आढळेल ?

*

दुसरी गोष्ट अशी आहे की, सावधानता जरी टिकवता आली नाही तरी नाम टिकवता येतं ना ? नामानं स्मरण निर्माण होतं. हे नामाचं महत्त्वाचं काम आहे. सावध राहायचं लक्षात राहात नाही हा मूळ प्रश्न आहे. सावधानता सुटते म्हणजे सावध राहायचं विस्मरण होतं. नामाच्या स्मरणामुळं स्मरणाची शक्ती वाढून त्यामुळं सावधानता येते, म्हणून नाम सावधानतेशी संबंधित आहे.

नाम घेणं हे स्मरण जागृत ठेवण्याचं काम आहे. सावधानता टिकवण्याच्या प्रयत्नात असताना आपण कधी बेसावध होऊन जातो ते कळत नाही आणि जेव्हा भानावर येतो तेव्हा कळतं की गेले चार-पाच तास आपण पूर्ण बेसावध होतो. ते आयुष्यातले तास आपण वायाच घालवले. ते परत येणार नाहीत. फक्त एक आहे, ते तास जे गेले त्याच्याविषयी जे काही वाटेल त्याच्यानंच काही घडेल. तोच त्यांतल्या प्रगतीचा पुढचा मार्ग आहे.

तुम्हाला त्याक्षणी तळमळ वाटेल की, असं कसं झालं ? चार तास आपल्या लक्षातच राहिलं नाही. राग येणाऱ्याला जसं दोन तासानं भान येतं की आपल्याला राग येऊन गेला. आपण ठरवलं होतं, राग येऊ द्यायचा नाही, पण तो येऊन, जाऊन दोन तास झाल्यावर लक्षात येतं की, राग येऊन आता दोन तास झाले. आपण राग येऊ द्यायचा नाही असं ठरवलं होतं याची आठवणही दोन तासांनी झाली. जसं जसं नामस्मरण वाढतं तसं तसं याची आठवण दीड तासानं, मग एक तासानं अशी लवकर होत जाते.

आपल्याला जे कळलेलं आहे ते कळण्यापासून अंमलात आणण्याचा जो वेळ आहे तो कमी कमी करीत आणणं म्हणजे साधना. ही चांगली व्याख्या आहे. अनेकांना आज कळलेलं वर्षानं अंमलात आणता

येतं. रागासाठी हा काळ समजा दोन तासांचा आहे, तर तो साधनेनं कमी येतो, हे कळतं. साधनेची प्रगती याच्यावर मोजता येते. जे कळलेलं आहे ते अंमलात आणण्याचा काळ आपण किती कमी करू शकलो हा आपला अभ्यास. त्याच्या नोटस्, डायरी काहीतरी ठेवावं. प्रापंचिक भाजी-किराणा यांचे हिशेब ठेवावेत पण तेवढेच. त्यापेक्षा या डायऱ्या कितीतरी महत्त्वाच्या आहेत. त्या मुक्त व्हायला खरी मदत करतील.

सावधानतेचं स्मरण गेलं होतं, ते आलं. ते किती वेळानं आलं, पहिल्यांदा ते चार तासांनी, मग तीन तासांनी नंतर दोन असं काहीतरी होतं. एका बाजूनं नामस्मरणाचा जोर असतो, दुसऱ्या बाजूनं तळमळीचा जोर असतो आणि तिसऱ्या बाजूनं प्रार्थना असते.

अशा तीन बाजूंनी प्रयत्न चालू असतील तर त्याच्यात फरक दिसणारच. नामस्मरणाचा जोर म्हणजे स्मरणाच्या मार्गानं सावधानता टिकवण्याचं काम चालू आहे. दुसऱ्या बाजूनं मला तळमळ आहे की, हे होत का नाही ? मला इतक्या उशीरा कसं लक्षात येतं ? तिसऱ्या बाजूनं हे घडत नाही म्हणून प्रार्थना आहे. प्रत्यक्ष हे सगळं झालं तरी ते घडत नाही म्हणून प्रार्थना आहे.

याला उत्तम मार्ग म्हणजे मानसपूजेतली प्रार्थना. जो थेट संबंध असतो. मानसपूजेचे श्लोक म्हटले आणि स्मरण केलं असेल, डोकं टेकून नमस्कार केला असेल, ती भावना जर त्यावेळी असेल आणि त्याक्षणी महाराजांना प्रार्थना केली असेल की, आज मला स्मरण राहिलं पाहिजे, तर एरवीच्या दिवसांत तुम्हाला दोन तास स्मरण राहात नसेल तर आज ते स्मरण आठ तास राहील. त्यात त्या दिवशी फरक पडतोच. हा अनुभव कुणालाही येऊ शकतो.

आपण जर उत्कटतेनं मानसपूजेमध्ये ती प्रार्थना केली असेल तर

त्या प्रमाणात फरक दिसणारच. तुमची उत्कटता किती असेल यावर ते अवलंबून आहे. तरी सुद्धा प्रमाणाचा फरक नक्की दिसणार. प्रार्थना, तळमळ आणि नामस्मरण हे तिन्ही प्रयत्न जर झाले तर सावधानतेचं गणित बदलतंच.

प्रयत्न आणि कृपा यांची सांगड आहेच, पण प्रयत्न नसतील तर कृपा कशी करायची ?

*

६३. घरात अनेक देव झाले असल्यानं त्यांची पूजाअर्चा नीट होत नाही. रुखरुखही वाटते. अशा वेळी काय करावं ?

मुळात माणसाला दिव्यत्वाची जाणीव रोज देण्यासाठी सगुण देव व मूर्ती आहेत. आपल्या गरजेमुळं, आपल्या कल्पनेमुळं त्या विविध झाल्या आहेत. त्यामुळं रिवाजाप्रमाणं प्रत्येक पिढीत पुरुषाच्या लग्नाबरोबर देवी-बाळकृष्ण येतात, आपण जिथं जातो तिथून पुन्हा मूर्ती आणतोच आणि हळूहळू ही संख्या वाढते. आपण भक्तीचं आवाहन शिकतो पण विसर्जनाचं तत्त्व विसरतो. त्याचबरोबर देव विसर्जन हा भीतीचा विषय झाला आहे. प्रत्येक पिढीबरोबर तिच्या बाळकृष्ण नि अन्नपूर्णा या मूर्ती विसर्जित नको का व्हायला ?

जशी आयुष्यभर मनोभावे पूजा केली तशीच सांगता मनोभावे करून, वाहत्या पाण्यात, संगमावर विसर्जन करावं. त्याला विधी आहेच. नवी पिढी हवे तर देव आणील, ठेवील. संस्कार म्हणून, जाणीव म्हणून एक देव अवश्य असावा. म्हणजे मग पूजाअर्चाही मनापासून व धावपळीच्या युगातही कमी वेळेत होईल. रुखरुख राहाणार नाही. देव आनंदाचा विषय होईल.

*

६४. १. मुलांनी उपासना करावी का ? २. असल्यास का ?
३. तिचं प्रमाण किती असावं ?

मुलं श्वासोच्छ्वास करतात, अन्न खातात, पाणी पितात, अभ्यास करतात. त्याची जशी जेवढी गरज आहे तशीच गरज उपासनेची आहे. उपासनेचं स्वरूप काय असावं हे त्या त्या वयोगटानुसार ठरतं. पण गरज आहे, एवढं नक्की. कारण उपासना ही अंतरंग विशाल, समृद्ध, आनंदी आणि शांत करणारी परमार्थविद्या आहे. तिचं शिक्षण जितक्या लवकर मिळेल तितकं गरजेचं नाही का ?

मी धर्मशिक्षण म्हणत नाही. पण वैचारिक विशालता, मनाच्या यंत्रणेचा उत्तम परिचय, अंत:करण समृद्ध करणारं प्रेम, सहानुभूती, समजूतदारपणा, संवाद, निसर्गाची जाण, त्यातून शिकण्याच्या असंख्य विद्या व दृष्टिकोन, समूहांशी व परिस्थितीच्या बदलांशी सुसंवादी राहाण्याची विद्या, समाजरचना-कायदेकानूंचा गाभा व गरज समजून घेण्याची विद्या, एकान्ताची गरज, सराव, आनंदाची-त्याच्या प्रती-उच्चतर आनंदाची ओळख, उपाधी व उपाधिरहित आनंदाची ओळख, शाश्वत-अशाश्वताच्या कल्पनांची ओळख, त्यांचा व्यवहारातला संबंध व उपयोग, शब्द-नाद-नि:शब्द अशा अवस्थांची कल्पना - अशा असंख्य संकल्पना परमार्थात येऊन जातात. ज्यानं एक जबाबदार, स्वयंपूर्ण, आनंदी, कार्यक्षम तरुण घडतो. म्हणून मुलांना हे सारं देऊ शकणारी उपासना ही आत्यंतिक गरज आहे.

एक साधं उदाहरण घ्या. या गरजेकडं दोन दृष्टींनी पाहाता येतं. आपल्याकडं एक उत्तम वाहन आहे. दुचाकी आहे, चारचाकी आहे. त्याची जुजबी माहिती आपल्याला आहे. फक्त सुरू करणं, बंद करणं,

सारं पाहिलं आहे. तर कुणीही ते हातात घेऊन चालू करू शकतं हे बरोबर आहे. पण हँडल किंवा स्टिअरिंग, ब्रेक असल्या गोष्टींची किंवा वाहतूकनियमांची ओळख नसली तर ?

वाहन तर यंत्रच आहे. माहीतगारानं स्टार्टर मारला तरी सुरू होतं नि अडाण्यानं किक मारली तरी सुरू होईल. पण पुढं काय अनर्थ होईल याची कल्पना आपण करू शकतो ना ? म्हणून गाडी कशी चालवायची हे ती रस्त्यावर चालवण्यापूर्वी शिकायला पाहिजे. म्हणून तर वाहननियम, चालकपरवाने आहेत ना ?

तीच अवस्था मनाची यंत्रणा हातात घेऊन आयुष्यभर देहाची गाडी चालवण्याची आहे. ज्याला या साऱ्या मनाच्या नि त्याचा देहाशी संबंध असलेल्या यंत्रणेचा परिचय उत्तम असेल त्याचे पदोपदी मान-अपमान, हेवेदावे, अहंकार, फसगती, अकारण स्पर्धा, निराशा, खिन्नता असल्या साध्या अपघातांपासून डिप्रेशन, आत्महत्या असल्या गंभीर अपघातांपर्यंत सर्व अपघात या उपासनेमुळं टळतील. म्हणून उपासनेची गरज आहे, ही एक दृष्टी.

दुसरी दृष्टी याच उदाहरणानं पाहू. ती अशी की, आता समजा वाहन चालवायला येतं आहे. पण जर ध्येय नसेल तर कुठं आणि कितीपर्यंत जात राहायचं हे लक्षात न आल्यासारखं अनेकांचं होतं. ते उपासनेमुळं टळतं. पैसा म्हणजे पैसाच मिळवीत सुटतील, सत्ता तर साठच काय ऐंशी वर्षं झाली तरी तिचा लोभ सुटत नाही असं होतं. शेवटी हाकलून दिलं जातं, निराशा येते, कुणाला तरी दोष दिले जातात. कारण उपासनेनं निर्माण होणारं परमार्थातलं सर्वोच्च ध्येय लहानपणीच कळायला हवं होतं ते कळलं नाही. मग बाकी लौकिक ध्येय त्या त्या वयात, त्या त्या प्रमाणात गाठून त्याच्या पुढं जाता आलं असतं. म्हणूनही गरज आहे.

तिसरी गरज अशी की, माणसाच्या मनाला विधायकपणे, सहजपणे वळण देण्याचं हे वय असतं. मतं, आग्रह पक्के झाल्यावर, चुकीच्या जीवनपद्धतीची सवय अंगवळणी पडल्यावर मोडणं अवघड जातं. जमत नाही असं नाही पण कष्ट पडतात. ओल्या मातीच्या गोळ्याला सहजपणे आकार देता येतो. म्हणून उपासनेचं वळण लहानपणीच मिळेल तर बरं आहे, हे सहज पटण्यासारखं आहे. आता राहिला उपासनेच्या प्रमाणाचा प्रश्न.अभ्यास, व्यायाम, घरची कामं यांच्या आड न येईल एवढं उपासनेचं प्रमाण असावं. त्यातही किती वेळ देतो यापेक्षा त्या वेळेत मिळणाऱ्या गोष्टी आवश्यक त्या दर्जाच्या आहेत का, मुक्त मनाकडं नेणाऱ्या आहेत का हा खरा प्रश्न आहे, तो सोडवावा.

*

६५. इच्छा नसताना अनेक गोष्टी कराव्या लागतात,
अशा वेळी मनाची भूमिका काय ठेवावी ?

इच्छा नसताना करावं लागतं याचाच अर्थ आपली इच्छा वेगळी आहे. त्याचा खरा त्रास आहे. तो टाळायचा असेल तर एक - आपली इच्छा बरोबरच असेल असं नसून दुसऱ्याची इच्छा बरोबर आहे असं समजावं. तसा अनुभव व्यवहारातही अनेकदा येतो. दोन - इच्छा नसतानाही करावं लागतं याचा अर्थ भगवंताला माझ्यापेक्षा दुसऱ्याची इच्छा बरोबर आहे असं वाटतं. मग ती भगवंताची इच्छा आहे या भावनेनं काम करावं. म्हणजे उलट आनंद होतो. तीन - शक्य असलं तर स्वत:च्या स्वतंत्र इच्छा टाकून देण्याचाच अभ्यास करावा. कारण निरिच्छता ही मुक्ती आहे.

*

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्त्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)**
चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. **कृपापदावली भाग : १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. **कृपापदावली भाग : २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. **साधनपदावली भाग १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. **सारविस्तार भाग : १ :** चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. साधनप्रेरणा : नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. मेरी यात्रा (हिंदी) : हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

३७. बोधपाठ : आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

३८. एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) : आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

३९. सृष्टिसंदेश : (विवरणासह) : जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

४०. गुरुतत्त्वतरंगिणी : गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत

४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) :
डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

५५. शिदोरी : व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

५६. विचारविसावा : विसावा देणारी विचारांची विद्या

५७. सारविस्तार भाग २ : चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

५८. महाराजांची शाळा : श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

५९. साधनपदावली भाग २ : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

६०. आरतीपुष्पमाला : डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

६१. विनवणीची वाणी : चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

६२. श्रद्धेची पहाट : खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

६३. उपासनामाला : येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

६४. पावनपथ : श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

६५. अनुभवपुष्पे - भाग १ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

६६. कृतज्ञतामार्ग : कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात : आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती) श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

६९. संतबोध : भाग ४ : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार : मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

७१. उत्तरायण -भाग ३ : जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

७२. अनुभवपुष्पे - भाग २ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७३. श्रद्धा : श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

७४. अनुभवपुष्पे - भाग ३ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७५. अर्घ्य : ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

७६. जीवनचिंतन : दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

७७. स्वास्थ्यसंवाद : मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

७८. वचनांजली भाग १ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

७९. अक्षरायण : आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

८०. वचनांजली भाग २ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

८१. भावगीता : श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

उत्तरायण

ही उत्तरं म्हणजे मी अंतिम शब्द किंवा निकाल समजत नाही. अनेकदा उत्तरांना वेळेच्या व सामूहिकतेच्या मर्यादा असतात. त्यामुळं अनेक मुद्यांचा समावेश उत्तरांत होऊ शकला नाही, हे वाचकांनी कृपा करून समजून घ्यावं अशी प्रार्थना आहे. माझी भूमिकाही कुणा मार्गदर्शकाची नाही. शोधकाची आहे. शोधताना, जाताना सापडलं ते समोर ठेवलं आहे. म्हणून याला शंकानिरसन म्हटलं असलं तरी काहींचं पूर्ण निरसन कदाचित होणार नाही, पण उत्तराच्या दिशेनं विचारसूर्याचा प्रवास – उत्तरायण – तरी सुरू व्हावं, एवढी नम्र भूमिका आहे.